६) बौध्दकालीन शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांच्या शारीरिक मानसिक व अध्यात्मिक विकासावर अधिक लक्ष दिले जात होते. त्यामुळे सर्वांगीण विकासास मदत होत होती.
७) विद्यार्थी जीवन संयम व शिस्तप्रिय होते. तसेच गुरु-शिष्य दोघांनाही संयमित जीवन जगावे लागत होते. स्त्रियांचा सहवास पूर्णपणे निषिद्ध होता.
८) बौद्धविहार किंवा मठांमध्ये कोणताही राजकीय दबाव किंवा हस्तक्षेप चालत नव्हता. येथील निर्णय घेण्याचा अधिकार उपाध्याय, गुरूंना होता.
९) गुरू-शिष्य संबंध आदर्श व अनुकरणीय होते. गुरू आपल्या शिष्यावर पुत्रवत प्रेम करायचे तर शिष्य गुरूंना पितृस्थानी मानून त्यांच्या आदेशाचे पालन करायचे, त्यांना सन्मान द्यायचे.
१०) प्राकृत आणि लोकभाषेचा वापर सामान्य विषयांचे शिक्षण देण्यासाठी होत होता.
११) सामूहिक शिक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात येत होता.
१२) शिष्यांच्या ज्ञानात वाढ व्हावी म्हणून वादविवाद पद्धतींचा पुरस्कार करण्यात आला होता.
१३) स्त्रियांना शिक्षण घेण्याची सोय होती. त्यांना भिक्खूणी होता येत असे.
१४) उच्चशिक्षणातील अभ्यासक्रमात तर्कशास्त्र, विधिशास्त्र, वैद्यकशास्त्र, राज्यशास्त्र, खगोलशास्त्र, तत्वज्ञान इ. विषयांचा व पालीभाषेसह बौध्द तत्व ज्ञानाचा समावेश करण्यात आला होता.
१५) शिक्षणाची शैक्षणिक केंद्रे नावाजली होती उदा.- नालंदा, विक्रमशीला.
१६) शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना निवासाची सोय होती. त्यात विद्यार्थ्यांना आवश्यक बाबी पुरविल्या जात.
१७) बौध्द शिक्षणपध्दतीत शारीरिक शिक्षा दिली जात नसे.
१८) भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिष्ठा मिळवून देण्यामध्ये बौध्द धर्माचे सर्वात जास्त योगदान आहे. बौद्ध धर्मामुळे भारतीय संस्कृतीचे विदेशात आदान-प्रदान अधिक प्रमाणात झाले.
१९) आजच्या शिक्षण पद्धतीत बौद्ध शिक्षणपद्धतीतील सर्वात्रिकरणाची संकल्पना उपयुक्त आहे.
२०) बौद्ध शिक्षणपद्धतीतील मौन, प्रार्थना, ध्यान, अष्टांगमार्ग इ. बाबी. नैतिकतेचा विकास करण्यासाठी आजच्या शिक्षण पध्दतीसाठी उपयुक्त आहे.
२१) बौद्ध शिक्षण पद्धतीतील लोकभाषेतून शिक्षण द्यावे हे सद्य:परिस्थित अत्यंत महत्वाचे आहे.
२२) प्रज्ञा, शील, करुणा म्हणजे आजच्या बालकांचे बौध्दिक, शारीरिक व आध्यात्मिक, क्रियात्मक विकास होय.
२३) स्त्री शिक्षणाची प्रेरणा बौध्दशिक्षणातूनच मिळाली.
२४) बौध्दकालीन शिक्षण पद्धतीतील शिक्षक आदर्श व नैतिकतेचे पालन करणारे होते. आजच्या शिक्षणपध्दतीत अशा शिक्षकांची आवश्यकता आहे.

**संशोधनाच्या शिफारशी :-**

१) बौद्ध शिक्षणाप्रमाणे आजच्या विद्यार्थ्यांना बुध्दिवादी व चिंतनशील बनवावे.
२) गौतम बुध्द यांच्या शैक्षणिक विचारांवर परिसंवाद, चर्चासत्रे, व्याख्याने, आयोजित करावे.
३) गौतम बुध्दांचे विचार यासंदर्भात विद्यापीठात अभ्यासमंडळे व संशोधन केंद्राची स्थापना करावी.
४) बी. एड,डी. एड, एम. एड. स्तरावर बौद्धकालीन शिक्षणपध्दतीचा अभ्यासक्रमात समावेश करावा.
५) प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, पदवीस्तरावरील अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांच्या मनात समाजसेवा व राष्ट्रसेवा निर्माण होईल, नैतिक मूल्यांची रुजवणूक होईल, अशा आशयाचा गौतम बुध्दांच्या चरित्रांचा इतिहास समाविष्ट करावा.
६) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता या मूल्यांची रूजवणूक करण्याची व्यवस्था करावी.
७) शांततेसाठी शिक्षण प्रत्येक शाळेत राबवावे.
८) शालेय अभ्यासक्रमामध्ये सत्याचे प्रयोग यांचा समावेश करावा.
९) कमवा व शिका असे उपक्रम शाळेमध्ये आयोजित करावे.
१०) बौध्द शिक्षणाप्रमाणेच आजच्या शिक्षणातून मानवतावादाची आंतरराष्ट्रीयत्वाची भावना रूजवावी.
११) बौद्ध शिक्षणाप्रमाणेच आजच्या शिक्षणातून स्त्रियांचा सन्मान व आदर करण्याची शिकवणूक द्यावी.

१२) बौद्ध शिक्षणाप्रमाणेच आजच्या शिक्षणातून कुठेतरी मनाच्या कोपऱ्यात असलेले जातीयतेचे किल्मिष समूळ नष्ट करावे.

१३) बौध्दकालीन शिक्षण पद्धतीत ध्यान धारणाला खूप महत्व आहे. आज आपण २१ जून हा दिवस योग दिन म्हणून साजरा करतो. फक्त वर्षातून एका दिवसासाठी नाही तर दररोज २० ते ३० मि. शाळा, महाविद्यालयातून योग शिक्षण द्यावे.

१४) आज करोना-१९ मुळे online शिक्षण प्रणाली आमलात आणली आहे. Online पध्दती द्वारे आपण video ची निर्मिती करून विद्यार्थ्यांना मध्ये वेगवेगळ्या मूल्यांची रुजवणूक व योगाचे महत्व निर्माण करू शकतो त्यासाठी सर्व शिक्षकांना online साहित्य तयार करण्याचे प्रशिक्षण द्यावे.

१५) बौध्द शिक्षण पध्दती प्रमाणे आजच्या काळात वसतीगृहाची व्यवस्था आहे मात्र आरोग्यदायी चांगले वातावरण करणे आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ सूची :-**

१) Buch M.B. (१९९१) Fourth survey of Research in education (१९८३ vol- I) New Delhi- N.C.E.R.T.

२) John. Best. JamesV.KHAN, (२००१) Research in education Seventh edition New Delhi prentice hall of India private Ltd.

३) Cousins L.S. Ethical Standards in world Religion Buddhism Expository Times ८६, (१९७४)

४) Aitken, R. The Mind of clover Essay in Zen Buddhist Ethics Berkeley Calif North point press १९८४.

५) डॉ. आंबेडकर बी. आर. (अनु.देवीदास घोडेस्वार) १० मार्च १९९४ दलितांचे शिक्षण, नागपूर समता प्रकाशन.

६) डॉ. आंबेडकर बी.आर. भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म, मुंबई, सिध्दार्थ प्रकाशन.

७) केळूसर के. ए. ५ ऑक्टोबर २००३ गौतम बुध्दाचे चरित्र नागपूर क्षितिज पब्लिकेशन.

८) गंगाधार पानतावणे दि. ५/०१/०६, नागपूर बौध्द साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषण दै. सम्राट.

९) मेश्राम अरुणा, थेरी गाथेतील स्त्री प्रतिमा.

१०) सदानंद रणवीर, (१९९६) मिलींद प्रश्न, युगतः प्रकाशन नागपूर.

११) डॉ. भदन्त आनन्द कोसल्यायन (१९९३) धम्मपद नागपूर बुध्दभुमी प्रकाशन.

१२) डॉ. भदन्त आनन्द कोसल्यायन (१९९३) बौध्दधर्म एक बुध्दिवादी अध्ययन नागपूर बुध्दभूमि प्रकाशन.

१३) डॉ. भदन्त राहुल बोधी (२००१) आदर्श बौद्धांची आचारसंहिता, चेंबर मुंबई.

१४) डॉ. सौ. किरण नागतोडे, (२००७) भारतीय शिक्षणपध्दतीचा विकास, नागपूर विद्या प्रकाशन.

१५) बन्सी बिहारी पंडित व डॉ. आरती सपकाळे, लता मोरे (२००६) भरतातील शिक्षण व्यवस्थेचा विकास नागपूर.

१६) जोशी एम.एस. संपादक भारतीय संस्कृती कोश (खंड ५,८,९) पुणे अनमोल प्रकाशन.

१७) गाजरे मा. फ. (अनुवाद) मिलिंद प्रश्न, नागपूर अशोक प्रकाशन.

१८) उपाध्याय बी. बौध्ददर्शन मीमांसा.

ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# स्वामी विवेकानंद व शिक्षण

**डॉ.मुगळे दिलीप मनोहर**
प्राचार्य
डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज प्रतिष्ठानचे
अध्यापक महाविदयालय, अहमदपूर

सर्व शिक्षणाचा केद्रबिंदू माणूस निर्माण करणे हा आहे. या महान क्रांतिकारी विचाराचे प्रेरक, शिक्षणात मानवतावादी दृष्टीकोनचे उद्गाते, भारतीय धर्म, संस्कृती, आचार विचार व परंपरा याबाबत जाज्वल्य अभिमान बाळगून त्याची देश विदेशात पताका उंचावणारे महान राष्ट्रभक्त, पारतंत्र्याचा काळात निसत्व व मरगळलेल्या अवस्थेतील जनतेला स्वाभिमानाचा व असिम्तेचा महामंत्र देणारे, भारतीय तत्त्वज्ञानाचा दीप प्रज्वलित करून जनसामान्याच्या हिताची अहोश चिंता बाळगणारे संन्यस्तवृत्तीचे स्वामी विवेकानंद थोर तत्वचितक व मानवतेचे श्रेष्ठ पुजारी होते.

भारताच्या या थोर सुपुत्राचे शिक्षणविषयक विचार समजावून घेण्याकरिता, त्याच्या चरित्रातील काही निवडक घटनांचा अभ्यास करणे योग्य ठरेल. प्रत्येक व्यक्ती जे जीवन अनुभवतो त्याचा त्या व्यक्तीच्या विचारसरणीवर प्रभाव पडत असतो. प्रत्यक्ष जीवन वेगळे व व्यक्तीचे विचार वेगळे असे सहसा होत नाही व तसे ते झाल्यास आचार, विचार होत नाही. व्यक्तीचे विचार म्हणजे विचाराची ज़ंत्री नव्हे ते प्रसंगोपात्त कधी लेखनातून तर कधी भाषणातून तर कधी साध्या संभाषणातून प्रगट होत असतात, ही विचारमैतिके एकत्र करून त्याचा सुंदर हार तयार केला तर त्या विचारधनाचे सौंदर्य आणखी खुलून दिसते.स्वामी विवेकानंदानी १८८८ ते १८९१ भारतभर भ्रमण केले. कन्याकुमारी येथील खडकावर बसून त्यांनी आत्मचिंतन केले व भारतीयाची दुर्दशा पाहून त्यांचे डोळे पाणावले. पारतंत्र काळात राष्ट्र निमिर्तीसाठी त्यांनी दिलेली भाषणे म्हणजे उच्च दर्जाची राष्ट्रभक्तीच होती.

**शिकागो येथील सर्वधर्म परीषद :-**

११ सप्टेंबर १८९३ रोजी शिकागो येथील सर्वधर्म परिषदेत भारतीय वेदान्त तत्त्वज्ञान व हिंदू धर्माची सर्वसमावेशकता त्यांनी प्रकषाने निरनिराळ्या धर्माच्या प्रतिनिधीसमोर मांडली. गौरकाय देहयष्टी,चेहऱ्यावर अध्यात्मिक विचाराचे तेज,पेहरावातील साधेपणा,सुस्पष्ट व ओघवतया भाषाशेलीचे वकृत्व यांनी श्रोता वर्गाला जणू वेडच लावले. अमेरिकेतील निरनिराळ्या शहरी त्यांना व्याख्यानाची निमत्रणे आली ती त्यांना स्वीकारूनच भारतीय तत्त्वज्ञानातील समृध्दतेचा जगाला परिचय करून देऊन भारताची वैभवशाली पताका सर्वदूर डौलाने फडकविली.

**स्वामी विवेकानंदाचे तत्त्वज्ञान :-**

पश्चिमात्य शिक्षण पद्धतीतून तयार झालेले स्वामी विवेकानंद हे आंगविद्याविभूषित पदवीधर होते. भारत गुलामगिरीचे जीवन जगत असताना सर्वसमान्य भारतीय जनतेला कोणते शिक्षण तारू शकेल याचा स्वामी विवेकानंदनी विचार केला होता. सर्वदूर केलेल्या भ्रमणाने त्याची दृष्टी व्यापक बनविली व त्याला आध्यात्मिक विचारसरणीचे बैठक लाभल्यामुळे ती अधिक व्यावहारिक ओ दूरदृष्टीची बनली. आपल्या राष्ट्राची गरज व आपल्या परंपरा आणि संस्कृती यांचा संगम आपल्या राष्ट्रीय शिक्षणात असावा असा त्याचा शिक्षणाविषयी प्रधान दृष्टीकोण होता. शिक्षणात अध्यात्म व विज्ञान यांचा समन्वय असावा असे सर्वप्रथम प्रभावीपणे त्यांनीच प्रतिपादन केले.

**स्वामी विवेकानंदानुसार शिक्षण :-**

शिक्षण म्हणजे नैसर्गिक विकास होय. ती एक स्वाभाविक प्रक्रिया आहे. लहानशा बीजाला आवश्यक ते खतपाणी मिळाले की त्याचा विस्तीर्ण वटवृक्ष होतो. खरे शिक्षण ज्याचे त्यानेच करावयाचे असते. नैसर्गिक परिस्थिती निर्माण करून दिली की शिक्षकाचे कार्य संपले. रोपट्याच्या वाढीसाठी जमीन, खत व पाणीपुरवठा उपलब्ध करून दिला की रोपट्याची वाढ नैसर्गिक रित्याच होते.

स्वामी विवेकानंदानी अध्यात्मवादी दृष्टीकोकोणातून शिक्षणविषक विचार मांडले शिष्यत्व संपादन हे एक व्रत आहे. गुरूच्या ठिकाणी सहनशीलता,ज्ञानसंपादनाची लालसा असावी तसेच शिष्याच्या ठिकाणी ज्ञान प्राप्तीची लालसा, विचार कृतीची शुद्धता व गुरुभक्ती असणे चांगल्या शिक्षणाकरिता आवश्यक आहे. शिक्षण हे एकागी प्रक्रिया नाही. श्री.रामकृष्ण परमहंस हे श्रेष्ठ गुरु होते. शिष्याची योग्यता ओळखून ते ज्ञान देत असत.

आजच्या बदलत्या सामजिक परिस्थिती व Mass Education च्या काळात हे अधिक चांगल्या प्रकारे अमलात आणता येत नाही. पण वस्तीग्रहात्मक शिक्षणसंस्था निर्माण करून, विद्याथर्याची वर्गातील संख्या सिमित ठेवण्याचा प्रयत्न करून. गटावर

शिक्षणाची पध्दती (Tutorial periods) यांचा अवलंब करून काही प्रमाणात हे साध्य करता येते. त्यासाठी खाजगी शिकवणी (Private Tuition) पद्धतीच स्वीकारली पाहिजे असे नाही.

**शिक्षणाचे ध्येय :-**

माणूस घडविणे हे शिक्षणाचे प्रमुख ध्येय असले पाहिजे. भारत व भारताबाहेर भ्रमण करतांना शिक्षणातून माणुसकी नाहीशी होत असल्याचे त्यांना दिसून आले . ज्ञानाकरिता ज्ञान न देता मानवतावादी दृष्टी निर्माण करणारे शिक्षण असावे.

**उच्च दर्जाची राष्ट्रभक्ती :-**

भारत देश अति पुरातन थोर संस्कृतीक वारसा असलेला, आत्मिक शक्ती व नैतिक मूल्याचे अधिष्ठान असलेला देश आहे. ग्रीक आणि रोमन संस्कृतीचा उदयही झालेला नव्हता त्याच्या कितीतरी अगोदर आध्यात्मिक शक्तीचे लेणे लाभलेला हा देश पण पारतंत्र्याने स्वत्वहीन झालेला आहे. जे शिक्षण व्यक्तीला जीवन संघर्षकरिता तयार करीत नाही , ज्या शिक्षणामुळे सामान्य व्यक्तीविषयी कळवला निर्माण होत नाही . ज्या शिक्षणामुळे पारतंत्र्याचा बेड्या तोडण्याकरिता सिंहाचे धैर्य व्यक्तीच्या ठिकाणी येत नाही ते कसले शिक्षण. भारतीय तरुणानो, उठा जागे व्हा आपल्या देशतील सामन्य लोकापर्यंत जोपर्यंत शिक्षण पोहचत तोपर्यंत कितीही राजकारण समाजकारण केले तरी त्याचा फायदा नाही असे ते म्हणतात.

**मनाची एकाग्रता :-**

सर्व शिक्षणाचे सर म्हणजे मनाची एकाग्रता ते चंचल असते. म्हणून मनोनिग्रह आवश्यक, मनावर ताबा ठेवण्याचा अभ्यास शिक्षणात महत्वाचा आहे. आध्यात्मिक जीवनात ध्यान्वस्था हि ऐतिहासिकतेपासून अलिप्त होण्याची अवस्था ध्यानयोग म्हणजे मोक्षप्राप्ती द्वार उघडण्याचा योग. प्रत्येकाला मग तो योगी असो की व्यापारी असो, शास्त्रज्ञ असो की विद्यार्थी असो, मनाची एकाग्रता साधली पाहिजे. ज्ञानप्राप्तीची ती गुरुकिलीच होय.
एकलव्याची धनुविर्द्या ग्रहणातील एकाग्रता ही स्वामी विवेकानंदना शिक्षणातील महत्वाचा पद्धतीत अभिप्रेत होती. भराभर विषय शिकण्यापेक्षा एकाग्रचितेने व सारभूत दृष्टीने विषय शिकविण्यावर त्यांचा कटाक्ष होता.

**चरित्र्य संवर्धन :-**

अद्यात्मवादाच्या विचारसरणीप्रमाणे जीवनमूल्यची निशिचीती असते व त्यानुसार मानवी जीवनात तो स्वीकारल्यास मानवी जीवन सुखप्रद बनते. चांगल्या सवयीच्या अवलंब केल्याने चांगले चरित्र्य बनते. काही चुका माणसाच्या हातून घडतील पण चुकातूनही शिकता आले पाहिजे . सरोवरात लाटाचे वतुर्ळा तयार होते. मानवी मनाच्या सरोवरातही अशी वर्तुळे ते खोल ठसा निर्माण करते. चांगली व वाईट कृती याच्या तारतम्याने आपले चरित्र्य बनत असते.

**गुरु शिष्य सबंध :-**

शिक्षणात गुरु शिष्य सबंधचे महत्व स्वामी विवेकानंदानी अतिशय चांगल्या प्रकारे सांगितले आहे. वैदिक काळापासून गुरुशिष्य परंपरेचा श्रेष्ठ वारसा भारतीय संस्कृतीला लाभला आहे. स्वामी विवेकानंदानी योग्य संस्कार शीलसंवर्धन व आत्मिक उन्नतीसाठी गुरुग्रहवास ही कल्पना मांडली आहे. ते म्हणतात.

**स्त्री शिक्षण :-**

स्त्री शिक्षणाचा आधार धार्मिक शिक्षण असावा. चरित्र्यसंवर्धन व नैतिकता त्यामुळे येईल. स्त्रीपुरुषामध्ये समान आत्मा असल्यामुळे विषमता मानणे बरोबर नाही. उपनिषद काळापर्यंत गार्गी मैत्रेयी यांच्या उदाहरणावरून स्त्रीयाचा दर्जा श्रेष्ठ होता असे दिसून येते. स्वामी विवेकानंदाच्या मते स्त्रीयांच्या समस्या सोडविण्याकरिता स्त्रीयांनीच पुढाकार घेतला पाहिजे, त्याच्या अभ्यासक्रमात निरनिराळ्या कला व व्यवहारउपयोगी विषय आले पाहिजेत . झाशीच्या राणीचे उदाहरण डोळ्यासमोर ठेवून अनेक क्षेत्रात स्त्रीयांनी मदुमकी गाजविण्याची गरज आहे. काही स्त्रीयांनी संन्यस्त व त्यागी जीवन स्वीकारावे. स्त्रीयांना सन्मान दिल्याने राष्ट्र मोठे बनते.

**संदर्भ :-**

१. भारतीय व्याखाने: स्वामी विवेकानंद (१९७५) प्रकाशक- स्वामी व्योमरूपानंद, अध्यक्ष श्री रामकृष्ण आश्रम धंतोली, नागपूर ४४००१
२. उच्च जीवनाची साधना. स्वामी विवेकानंद (१९७८) प्रकाशक – स्वामी व्योमरूपानंद अध्यक्ष श्री रामकृष्ण आश्रम धंतोली, नागपूर ४४००१
३. स्वामी विवेकानंद ते आचार्य विनोबा भावे (१९७८) प्राचार्य रा.तु.भगत प्रकाशक – मेहता पब्लिशिंग हाउस, चित्रशाळा भवन,लक्ष्मी रोड पुणे ३०.

# Covid-19 विषयी माध्यमिक स्तरावर् शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांच्या वैज्ञानिक जाणीवेचा तसेच मानसिक स्थितीचा अभ्यास

**मार्गदर्शक**
**डॉ.सुनंदा गोपीनाथराव रोडगे**
प्राचार्य शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड

**मारोती रामराव कदम,**
विषय सहाय्यक, डायट
मुरुड ता.जि. लातूर

**सारांश :**

*प्रस्तुत संशोधनात संशोधकाने **Covid-19** बाबत माध्यमिक स्तरांतील विदयार्थ्यांना माहित असलेल्या सामान्य माहितीचा, त्यांच्यामध्ये निर्माण झालेल्या वैज्ञानिक जाणीवेचा, तसेच विदयार्थ्यांच्या मानसिक स्थितीचा अभ्यास केला आहे. लातूर जिल्हयातील साधारणत: 8 शाळांमधील 8 वी ते 10 वी वर्गात शिक्षण घेत असलेल्या 550 विदयार्थ्यांचा समावेश आहे. यामध्ये लातूर मधील 4 शाळा, उदगीर तालुक्यातील एक शाळा तर अहमदपूर मधील दोन शाळांचा समावेश आहे.*

*यामध्ये इ.8 वी च्या 156, इयत्ता 9 वी च्या 128 तर दहावीच्या 196 तर इतर 70 विदयार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे.*

**प्रस्तावना :**

कोरोना महामारी हा एक जागतिक साथीचा रोग आहे. ज्याने संपूर्ण जग हादरुन सोडले आहे.
जगामध्ये दि.08 ऑगस्ट रोजी 2020 जवळपास दोन कोटी लोक (1,96,65,645) तसेच भारतात एकवीस लाख लोक (21,53,010) तर महाराष्ट्र पाच लाख लोक (5,03,084) पॉझीटीव्ह आढळले आहेत.

पैकी महाराष्ट्रात साडेतीन लाख लोक रिकव्हर झाले आहेत. तर दुर्दैवाने 17 हजार लोकांचा मृत्यू ओढवला आहे. मानवतेसाठी हा संकटाचा काळ आहे. या संकटाच्या वेळी प्रत्येकजण आपआपल्या स्तरावर सहकार्य करीत आहे आणि सेवा पुरवत आहे. देशातील सरकारी कर्मचाऱ्यांची सेवा ही अनोखी, अनुकरणीय आणि प्रशंसनीय आहे. सरकारी कर्मचारी डॉक्टर, पोलीस, निमलष्करी दल: इलेक्ट्रीशीयन, सफाई कामगार या सर्वाचा समावेश होतो. हे दिवस-रात्र सेवाकार्यात मग्न आहेत. अनेक साथीदारांना या सेवेदरम्यान प्राण गमवावे लागत आहेत.

या कालावधीत बालवाडी ते विद्यापीठीय शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्था बंद ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. कोरोना महामारीच्या संकटामुळे विदयार्थ्यांचे मोठया प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत आहे. तरीही शासनस्तरावरुन खूप मोठया प्रमाणावर ऑनलाईन शिक्षणाचे प्रयत्न चालू आहेत. परवाच मा. मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्याहस्ते गुगल क्लासरुमचे उद्घाटन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

प्रस्तूत संशोधनात संशोधकाने माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांच्या मानसिक स्थितीचा आढावा घेतला आहे. तसेच विदयार्थ्यांवर या महामारीच्या संदर्भाने काय सामान्य माहीती आहे याचाही संशोधकाने शोध घेतला आहे. याच बरोबर महामारीच्या बाबत मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोनाची रुजवणूक किती प्रमाणात झाली आहे याचाही आढावा घेतला आहे. याच बरोबर महामारीच्या बाबत मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोनाची रुजवणूक किती प्रमाणात झाली आहे. याचाही आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. शाळा व प्रशासनाची भूमिका या संबंधाने संशोधकाने शोध घेतला आहे.

**पध्दती :**

यासाठी संशोधकाने सर्वेक्षणपद्दतीचा वापर केला असून या अंतर्गत प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे. प्रश्नावली मध्ये 17 प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे.

**विश्लेषण व अर्थनिवर्चन :**

**Covid-19** च्या संदर्भात मुलांना सर्वसामान्य माहितीची चाचपणी करण्यात आली. त्या अंतर्गत संशोधकास पुढील प्रमाणे विद्यार्थ्यांचा प्रतिसाद आढळून आला.

माहे डिसेंबर 2019 मध्ये **Covid-19** ची सुरुवात झाली. ही सुरुवात चीनमधील वुहान शहरातून झाली याची 75% मुलांना माहिती आहे. 19% मुलांनी तो मुंबईतून सुरुवात झाली असे म्हटले आहे. तर 5% मुलांनी टोकिओ तर 1% कोलंबियाचा उल्लेख करतात.

सर्दी-ताप, खोकला ही **Covid-19** सामान्य लक्षणे आहेत. याची माहीती 98 टक्के मुलांना आहे. मात्र 2 टक्के मुले आणखी संभ्रमावस्थेत आहेत.

मा.पंतप्रधान महोदयांनी **'SMS'** बाबत माहीती सांगितली होती की **'SMS'** म्हणजे सॅनीटायझर, मास्क, सोशिअल, डिस्टंस या बाबी जर आपण पाळल्या तर कोरोना पासून आपण दूर राहू शकतो 69.1% मुलांनाच **'SMS'** म्हणजे काय हे समजले आहे.

लॉकडाऊनच्या कालावधीत बाहेर जाण्यासाठी निर्बंध घालण्यात आले होते मात्र 3.7% मुले खेळण्यासाठी बाहेर पडत होती.

कोरोनाच्या जागरुकते बाबत मात्र पहिले लॉकडाऊन कधी सुरु झाले या प्रश्नाला 65% मुलांना मोठा प्रतिसाद दिला आहे.

**Covid-19** हा विषाणू आहे हे 90.6% मुलांना माहिती आहे. मात्र 9.4% मुले त्यास जीवाणू आहे असे म्हणत आहेत.

महामारीच्या कालावधीत लातूरचे मा.जिल्हाधिकारी जी. श्रीकांत हे दररोज फेसबुक लाईव्ह वर लोकांना मार्गदर्शन करत होते. त्याचा खूप फायदा लातूरकरांना झाला 82.7% मुले मा.जिल्हाधिकारी महोदयांना ऐकत होती.

कोरोना संसर्ग टाळण्यासाठी तसेच या महामारीमध्ये सामाजिक स्तरावर, आरोग्यविषयक अडचणी सोडवण्यासाठी डॉक्टर, पोलीस, आरोग्य कर्मचारी यांनी जास्त मेहनत घेतल्याची नोंद मुलांनी केली आहे. याची सविस्तर माहीती पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मदत करण्याऱ्याचे नाव | प्रतिसाद देणाऱ्या मुलांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | पोलीस | 393 | 80.2% |
| 2 | डॉक्टर | 420 | 85.7% |
| 3 | आरोग्य कर्मचारी | 347 | 70.8% |
| 4 | महसूल कर्मचारी | 36 | 7.3% |
| 5 | शिक्षक | 71 | 14.5% |
| 6 | नेतेमंडळी | 37 | 7.6% |

या महामारीच्या काळात आपली प्रतिकार क्षमता चांगली ठेवली पाहिजे असे मत 96.3% मुलांनी नोंदवले आहे. तर प्राणायाम केला पाहिजे असे 30% मुले म्हणतात. काढा करून पिणे आवश्यक आहे. असे 40.6% मुले सांगत आहेत.

तर 475 मुले म्हणजे 96.3% कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी सॅनीटायझर, मास्क वापरणे, सामाजिक अंतर ठेवण्या बाबत सूचविले आहे. याचा अर्थ मुलांमध्ये व्यायाम, प्राणायाम, **'SMS'** काढा पिणे याबाबत चांगली जागरुकता दिसून येते.

या महामारीच्या दरम्यान मुलांच्या मानसिक स्थितीचा अभ्यास केला असता साधारणत: मार्च – एप्रिल 2020 मध्ये 71.9% मुलांच्या मनात भीतीदायक वातावरण निर्माण झाले होय तर 28% मुले भीती निर्माण झाली नसल्याचे सांगतात. कोरोनाच्या भितीमुळे मुलांच्या मनात कोणत्या भावना निर्माण झाल्या ते पुढील कोष्ठकावरुन स्पष्ट होईल.

| अ.क्र. | मुलांच्या मनातील भावना | प्रतिसाद देणाऱ्या मुलांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | शाळेत जायला मिळणार की नाही | 296 | 60.2% |
| 2 | परीक्षा होतील की नाही | 238 | 48.4% |
| 3 | भरपूर लोक मरतील | 285 | 57.9% |
| 4 | घरात बसून कसे रहायचं | 152 | 30.9% |
| 5 | कोणतीच भीती निर्माण झाली नाही | 17 | 35.5% |

यावरून मुलांच्या मनामध्ये भितीदायक वातावरण निर्माण झाले होते. हे लक्षात येते तर 3.5% मुले समाजामध्ये निर्भीड असतात हे लक्षात येते.

कोरोना महामारीच्या दरम्यान आपल्या घरी शेजारचे मित्र, नातेवाईक घरी येत नसल्याची खंत 62.4% मुलांना वाटते तर आपण सुरक्षीत राहण्यासाठी ते लोक आले नाहीत ते चांगले झाले असे 37.6% टक्के मुलांना वाटते.

या कालावधीत शाळा बंद असल्यामूळे मुलांच्या मनात अभ्यासाबाबत खूप प्रश्न होते. मात्र त्यांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न शाळेने चांगला प्रकारे केल्याचे दिसून येते. 98.4% मुलांनी शाळेने अभ्यासात मदत केल्याचे म्हटले आहे.

तसेच या कालावधीत लातूर जिल्हयात मा.मुख्यकार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून सर्व आवश्यक ती काळजी घेवून " कोव्हीड कॅप्टन " ही संकल्पना राबवल्यामूळे 89.8 टक्के मुले आम्हाला अभ्यासात मित्रांनी मदत केल्याचे सांगत आहेत तर 10.2% मुले आम्हाला मित्राची मदत झाली नाही असे नोंदवत आहेत.

'घरी रहा, सुरक्षित राहा' हा मंत्र सर्वांनी जगला पाहिजे असे 100% टक्के मुलांनी सांगीतले आहे तर यापुढील काळात देशातील सर्वांनी मिळून निष्ठेने काम आपल्या देशासाठी केले पाहिजे असे सर्व मुलांनी नोंदवले आहे.

**निष्कर्ष** :

1. **Covid-19** ची सुरुवात जगात कोठून झाली याची 75 टक्के विद्यार्थ्यांना माहीती आहे.
2. **Covid-19** च्या प्रमुख लक्षणाची माहिती मुलांना आहे.
3. लॉकडाऊनच्या काळात 3.7 टक्के मुले बाहेर खेळण्यासाठी जात आहेत.
4. साधारणत: 35 टक्के मुलांना पहिले लॉकडाऊन कधी लागू झाले याची माहिती नाही.
5. 90.6 टक्के मुलांना **Covid-19** या विष्णाणू आहे हे माहीती आहे.
6. प्रशासन स्तरावरची मदत म्हणून मा. जिल्हाधिकारी महोदयांना 83 टक्के मुले ऐकत होती.
7. डॉक्टर, पोलीस, आरोग्य कर्मचारी यांनी खूप मदत योग्य प्रमाणावर केली तर महसुल कर्मचारी शिक्षका,नेतेमडळी यांच्या मदतीचे प्रमाण 7 ते 15 टक्के आहे.
8. 475 म्हणजे 96.3 टक्के मुले सॅनीटायझर,मास्क लावने,सामाजिक अंतर ठेवण्याची आवश्यकता आहे असे सांगतात.
9. व्यायाम,प्राणायाम,काढा, यांना मुले भरभरुन प्रतिसाद देतात याचा अर्थ मुलांच्या वैज्ञानिक जाणीवा प्रगल्भ् होताना दिसत आहेत.
10. 96.5 मुलांच्या मनामध्ये भितीदायक परिस्थिती निर्माण झाली होती तर 3.5 टक्के मुले निर्भीड असल्याचे दिसतात.
11. संवेदनशील मुलांचे प्रमाण 62.4 टक्के आहे.तर संवेदनशील असुनही 37.6 टक्के मुले अत्यंत जागरुक आहेत
12. घरी राहा सुरक्षीत हा मंत्र सर्वानी पाळला पाहिजे ही गोष्ट 100 टक्के मुले सांगत आहे तर महामारीनंतर आपण सर्वानी आपल्या देशासाठी निष्ठेने काम केले पाहिजे असेच 100 टक्के मुलांना वाटते.

**समारोप** :-

अशा प्रकारे कोव्हीड -19 संदर्भात मुलांमध्ये असलेली वैज्ञानिक जाणीव,त्यांची मानसिक सिथती तसेच **Covid-19 च्या बाबतीत असलेली सर्वसामान्यं माहिती 550 विदयार्थ्यांच्या** माध्यमातून संकलित करण्यात आली.ही सर्व माहिती ऑनलाईन मिळवण्यात आली.यापुढेही मुलांना Covid-19 च्या संदर्भात मार्गदशन,समुपदेशन,वेबीनार,झुममिटिंग,फेसबुक, **What's app** च्या माध्यामातुन संपर्कात राहणे अत्यंत आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ सुची** :

1) वाघ न. (2008) उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, पेपर 1 , विभाग सांगली धनंजय प्रकाशन.
2) घोरमोडे के.के. (2006) शैक्षणिक संशोधन, नागपूर विभाग प्रकाशन.
3) www.worldometers info:india

# पर्यावरण जागरूकता विकासात शिक्षकांची भूमिका

**डॉ बालाजी रंगनाथराव लाहोरकर**
प्राचार्य, श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय,
मेहकर, जिल्हा बुलडाणा

**प्रास्ताविक :**

पर्यावरणीय चेतनेचे सुरुवातीचे स्वरूप हे पर्यावरणीय सांसाधनाच्या वापरापुरते मर्यादित होते, परंतु आता ते सध्याच्या शतकाच्या उत्तरार्धापासून सुरू होणाऱ्या पर्यावरणीय चेतनेच्या विविध स्वरूपांच्या अभ्यासाशी संबंधित आहे. सद्यस्थितीत ते एका व्यापक संकल्पनेचे स्वरूप घेत आहे. पर्यावरण जागरूकता ही आज जागतिक मोहीम बणली आहे. समाजातील विविध घटकांतील लोकांना त्यांच्या पर्यावरणाच्या सकारात्मक आणि नकारात्मक बाजूंबद्दल संवेदनशील बनवून त्यांना पर्यावरणाची जाणीव करून देणे हे मुख्य ध्येय समाजातील सर्व घटकांचे असले पाहिजे. आपल्या लोकसंख्येतील बहुतेक सुशिक्षित लोकांना देखील पर्यावरण नीट समजत नाही. ते पर्यावरणीय असंतुलन आणि पर्यावरणातील प्रदूषणाच्या परिस्थितीशी सुद्धा अपरिचित आहेत आणि त्यांच्याशी संबंधित समस्यांबद्दल त्यांना माहिती देखील नाही. मानवी कृतींमुळे पर्यावरणाची घटलेली गुणवत्ता वाढविणे व पर्यावरणाची स्थिती सुधारणे या ध्येयांसाठी जाणीवपूर्वक केलेली कृती म्हणजे पर्यावरण जागरूकता.

सन 1907 मध्ये प्रकाशित झालेल्या मॅन अँड नेचर या पुस्तकात जॉर्ज पर्कीन आणि मार्श यांनी मानव उपयोग करीत असलेल्या नैसर्गिक संसाधनांचा वापर व त्याचे दुष्परिणाम यावर चर्चा केली गेली. पर्यावरणीय समस्यांशी परिचित नसलेले लोक त्यांचे स्वरूप आणि गांभीर्य नीट समजून घेण्याचा प्रयत्न करू शकत नाहीत. त्यामुळे पर्यावरणविषयक जाणिवेचा संबंध संवेदनशीलतेशी आहे, ज्यामध्ये पर्यावरणाबद्दलची आपली धारणा किंवा दृष्टीकोन, म्हणजेच आपण पर्यावरणाकडे कसे पाहतो, पर्यावरणाबाबत आपण किती जागरूक आहोत, हे कळते. ही जागरूकता म्हणजे पर्यावरणाच्या बाबतीत असणाऱ्या मानवाच्या मानसिक जाणिवेचा परिणाम आहे. त्यामुळे तो कायमस्वरूपी नसून बदलत राहतो, त्यासाठी योग्य दिशा देणे आवश्यक आहे. पर्यावरणीय आणि पर्यावरणीय समस्यांबद्दल जागरूकता आणि संवेदनशीलता विकसित करूनच पर्यावरणीय जाणीव विकसित केली जाऊ शकते, ज्यासाठी शाळेशी संबंधित शिक्षकच समाजाचा एक महत्त्वाचा घटक असल्यामुळे खूप महत्त्वाची भूमिका बजावू शकतो.

**पर्यावरण रक्षण एक सामाजिक जबाबदारी :**

ग्लोबल वॉर्मिंग हे जागतिक संकट आहे पण त्याचे उत्तर मात्र सार्वत्रिक आहे, व्यक्तिगत आहे. आपण सर्वांनी जर आपापल्या समजाप्रमाणे पर्यावरणसहयोगी वागायचे ठरविले तरीही हळूहळू हे पर्यावरणावरचे संकट दूर होईल. पर्यावरण रक्षण आणि सुधारणेची मोहीम मोठ्या प्रमाणावर राबविणे ही संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे, परंतु शिक्षक हा समाजाचा एक महत्त्वाचा जबाबदार घटक आहे, त्यामुळे हे उद्दिष्ट साध्य करण्यात त्यांची भूमिका विशेष मानली गेली आहे. शिक्षक वेगवेगळ्या वयोगटातील विद्यार्थ्यांशी व्यवहार करतात. मार्गदर्शकाप्रमाणे तो विद्यार्थ्यांना समाजातील विविध समस्यांची जाणीव करून देऊन त्यावर नवीन आणि यशस्वी उपाय शोधण्यास प्रवृत्त करू शकतो. आजच्या काळात, पर्यावरणीय प्रदूषण ही एक ज्वलंत समस्या आहे जी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे संपूर्ण जगाला त्याच्या शारीरिक, सामाजिक आणि मानसिक स्वरुपात विकृती निर्माण करून प्रभावित करत आहे. त्यामुळे समाजातील बुद्धीमान वर्गातील शिक्षक या विशिष्ट समस्येबद्दल संवेदनशीलता विकसित करण्यात विशेष भूमिका बजावू शकतो, कारण तो शाळेसारख्या प्रयोगशाळेतून समाजाच्या समस्या सुधारण्यासाठी एक संवेदनशील आणि जबाबदार नागरिक असतो.

**शालेय व सह शालेय उपक्रमातून जागरूकता निर्मिती :**

शिक्षक शालेय व सह शालेय उपक्रमातून या जागरूकता निर्मिती उपक्रमांचे आयोजन करून पर्यावरण चेतना विकसित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. सह-अभ्यासक्रमांतर्गत पुढील उपक्रम विद्यार्थी करू शकतात, ज्यामुळे पर्यावरण सुधारेल. शिक्षक स्वतःच्या उपस्थितीत त्यांना प्रेरित करून भौतिक वातावरणाची सध्याची स्थिती सुधारण्यास मदत करू शकतात. कारण शाळेतील विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विषयांचे ज्ञान शिक्षक देत असतात. त्यामुळे त्या विषयासोबतच विविध प्रकारच्या पर्यावरणाची माहिती सहज देता येते. वृक्षारोपण, संवर्धन आणि हिरव्यागार बागांचे संरक्षण. टाकाऊ पदार्थ, कचरा इत्यादी योग्य ठिकाणी ठेवण्याची सवय लावणे. बगीचा, उद्यानांना पर्यावरण स्वच्छ ठेवण्यासाठी जागरुक करण्यासाठी प्रबोधन

करणे, तसेच झोपडपट्ट्यांमधून व गावागावांतून असे उपक्रम सक्रिय स्वरूपात विद्यार्थ्यांना घेऊन राबवणे जेणेकरून सर्वसामान्यांना पर्यावरणाच्या सुधारणेची जाणीव होईल आणि सर्वांचे सहकार्य मिळेल. लोक सहभागात सुधारणा करण्यासाठी लोकांचे वर्ग घेऊ देखील शिक्षक शकतात ज्याद्वारे त्यांचे सहकार्य प्राप्त करून घेत येईल. पर्यावरण, शारीरिक, सामाजिक आणि मानसिक अशा तिन्ही प्रकारांमध्ये निर्माण होणाऱ्या प्रदूषण आणि विकृतींचे विश्लेषण आणि मूल्यमापन करण्यासाठी शिक्षकांची मदत ही अत्यंत महत्त्वाची ठरू शकते. पर्यावरणीय चित्रपट, निबंध, लेख आणि अहवाल विद्यार्थ्यांना आधीच तयार केलेल्या सामग्रीमध्ये आवश्यक सुधारणा करून त्यांना तपशीलवार माहिती देण्यास आणि समजून घेण्यास मदत करू शकतात.

**पर्यावरण चेतना विकसित करण्यात विशेष भूमिका :**

पर्यावरणाच्या सकारात्मक आणि नकारात्मक पैलूंचा सखोल अभ्यास करण्यासाठी शिक्षक विद्यार्थ्यांप्रती आणि विशेषतः समाजाचा विशेष प्रतिनिधी म्हणून विशेष भूमिका बजावू शकतो. शारीरिक, सामाजिक आणि मानसशास्त्रीय विषयांशी संबंधित शिक्षक विद्यार्थ्यांना या क्षेत्रांशी संबंधित नवीन माहिती अवगत करून पर्यावरण सुधारणेकडे क्रांती घडवू शकतात. एखाद्या शास्त्रज्ञाप्रमाणे, शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांसमोर समस्या ओळखू शकतो आणि त्यांचे सकारात्मक आणि नकारात्मक परिणामांचे विश्लेषण करू शकतो आणि प्रत्येक वस्तुस्थिती तर्कशुद्धपणे समजावून सांगू शकतो, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर आणि मेंदूवर थेट आणि सक्रियपणे परिणाम होऊ शकतो. मानसशास्त्रज्ञाप्रमाणे, शिक्षक कुष्ठरोग्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या भावना समजून घेऊ शकतो, मित्राप्रमाणे त्यांची न्यूरोटिकिझम समजून घेऊ शकतो, योग्य संसाधने शोधू शकतो आणि त्यांना सामान्य स्थितीत आणू शकतो आणि त्यांच्यामध्ये लोकशाही वृत्ती विकसित करू शकतो, जेणेकरून ते त्यांची निराशा त्यांच्यावर लादत नाहीत. त्यापेक्षा शाळेमध्ये बदल करून निरोगी मानसिक स्थिती असलेला जबाबदार नागरिक तयार करता येईल. शिक्षक हा समाजाचा प्रतिनिधी सदस्य असल्याने , शिक्षणाची महत्त्वाची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आहे, त्यांचा सामाजिक क्षेत्राशी थेट संपर्क आहे. त्यामुळे सामाजिक वातावरणात निर्माण होणारी आपत्तीजनक परिस्थिती कमी करण्यासाठी तो विशेष भूमिका बजावू शकतो, कारण तो समाजातील एक जबाबदार आणि संवेदनशील व्यक्ती आहे.

**पर्यावरणीय विकृतीचे विश्लेषण :**

जगात जेवढ्या वेगाने पर्यावरणीय प्रदूषण वाढत आहे, त्यानुसार नैसर्गिक संतुलनही बिघडत आहे. पर्यावरण प्रदूषणासारखा असाध्य रोग दूर करण्यासाठी त्याच्या मुळाशी जाण्याची गरज आहे. पर्यावरणीय जाणीवेतील प्रदूषण आणि विकृतींचे विश्लेषण आणि मूल्यमापन करण्यासाठी शिक्षकांची मदत महत्त्वाची ठरू शकते. पर्यावरणीय जाणीवेतील पर्यावरणीय दृष्ट्या विशिष्ट ठिकाणांची, उदाहरणांची ओळख करून देण्यात शिक्षकाची भूमिका महत्वपूर्ण असते. अशा ठिकाणी तो विद्यार्थ्यांना प्रदूषणाच्या परिणामांचा आढावा घेण्यास आणि त्यांची संवेदनशीलता आणि संवेदनशीलता वाढविण्यास मदत करू शकतो. पर्यटनाच्या माध्यमातून शिक्षण: सहली आणि पर्यटनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसमोर विशिष्ट ठिकाणांची उदाहरणे आणि स्वत:चे विकृतीकरण आणि प्रदूषण यांची उदाहरणे सादर करून शिक्षक विशेष भूमिका बजावू शकतात. अशा ठिकाणी प्रदूषणाचे परिणाम पाहण्यासाठी तो विद्यार्थ्यांना त्याच्या अनुभवातून मदत करू शकतो. संपर्क कार्यक्रमांच्या संघटनेत विशेष भूमिका शिक्षक विस्तार कर्मचाऱ्याप्रमाणे विस्तार शिक्षणाच्या माध्यमातून जाऊ शकतो, खेड्यापाड्यातील पालक आणि सामान्य लोकांमध्ये जाऊन पर्यावरण प्रदूषण आणि त्याचे दुष्परिणाम याबद्दल माहिती देऊ शकतो. प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावरील शिक्षक हे कार्य सक्षमपणे पूर्ण करण्यात यशस्वी होऊ शकतात.

आपल्या वातावरणातील सकारात्मक आणि नकारात्मक बाबींचा सखोल अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्याला आपापल्या विषयाच्या शिक्षकांची विशेष मदत मिळू शकते. भारतात पर्यावरणीय जाणीवेचा विकास सातत्याने होत आहे, परंतु तरीही भारतातील ग्रामीण आणि अशिक्षित लोकांमध्ये पर्यावरणीय जाणीवेचा पुरेसा विकास झालेला नाही. त्यामुळे याला जनआंदोलन करणे आवश्यक आहे. पर्यावरण विषयाची योग्य माहिती शिक्षकांच्या माध्यमातून देता येते, थोडक्यात असे म्हणता येईल की, पर्यावरणविषयक समस्यांबाबत जनजागृती करण्यात आणि त्यातून निर्माण होणारी मानवी संकटे समजून घेण्यात आपले शिक्षक अतिशय महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. शिक्षक आपल्या प्रभावाने प्राथमिक स्तरापासून विद्यापीठ स्तरापर्यंत पर्यावरण सुधारणेत क्रांती घडवून आणू शकतो. पृथ्वीवरील संसाधने अमर्यादित नाहीत, जर ही परिस्थिती कायम राहिली तर ती संपुष्टात येतील. पर्यावरणीय आधुनिकीकरणाद्वारे पर्यावरणाचे संरक्षण केले जाऊ शकते. त्यासाठी मनापासून प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**पर्यावरणीय जाणीव विकसित करणे:**

केवळ विद्यार्थीच नाही तर समाजातील सर्व सदस्य जे शिक्षकांच्या संपर्कात येतात, त्यांना आवश्यक माहिती शिक्षकाने व्यावहारिक स्वरूपात किंवा विविध संपर्क कार्यक्रमांद्वारे प्रदान केली पाहिजे जेणेकरून त्यांचे पर्यावरणाचा ऱ्हास होण्यापासून वाचवा. आवश्यक ही शिक्षकाची जबाबदारी असली पाहिजे की त्याने समाजाला पर्यावरण सुधारणेचा विचार करायला लावणारी वाक्येच बनवायची नाहीत तर त्यांची कार्यात्मक तयारीही केली पाहिजे. या कार्याच्या यशासाठी, तो शिक्षणामध्ये पुढील तथ्ये समाविष्ट करू शकतो: राष्ट्रवादाच्या भावनेवर जोर देणे, सामाजिक मूल्ये शिकवण्यासाठी सामाजिक कर्तव्यांची जाणीव आणि धार्मिक सहिष्णुतेवर भर देणे जेणेकरून सामाजिक पर्यावरणीय प्रदूषण कमी करता येईल.

लोकसंख्या नियंत्रणासाठी, शिक्षकांनी पात्र विद्यार्थ्यांना विस्तार कामगार म्हणून आवश्यक प्रशिक्षण दिले पाहिजे आणि अशा शैक्षणिक सहलींचे आयोजन केले जावे ज्यामध्ये हे विस्तारक कार्यकर्ते खेडोपाडी, शहरात जाऊन लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी दृकश्राव्य साहित्य किंवा पथनाट्य वापरतील. लोकांना केवळ सैद्धांतिकच नव्हे तर व्यावहारिक स्वरूपातही त्याचे फायदे आणि तोटे यांची जाणीव करून देऊन ते लोकसंख्या नियंत्रण करून पर्यावरणात होणारे भौतिक आणि गैर-भौतिक प्रदूषण कमी करू शकतात. यासोबतच आर्थिक विविधता, बेरोजगारी हेही पर्यावरणाचा विपर्यास करणारे प्रभावी घटक म्हणून उदयास आले आहेत.

शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांच्या कुवतीनुसार व कुवतीनुसार व आवडीनुसार व्यवसायाची विविध क्षेत्रे अंगीकारण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे देऊन खऱ्या मार्गदर्शकासारखी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. ज्याचा परिणाम म्हणून पदवी, पदव्युत्तर, माध्यमिक स्तरावरील शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन उदरनिर्वाह करता येणार आहे. कृत्रीम फलोत्पादनासोबतच तुम्ही तुमच्या नापीक जमिनीचा वापर करून पर्यावरण शुद्ध करण्यात हातभार लावू शकाल. रात्रीच्या वेळी झाडांना हात न लावणे, हिरवीगार झाडे न तोडणे, घरातील कचरा रस्त्याच्या मधोमध न फेकणे यासारखे विषय, सवयी विद्यार्थ्यांमध्ये बालपणापासून ते किशोरावस्थेपर्यंत शिक्षकांद्वारे विकसित केल्या जाऊ शकतात, ज्याचा आयुष्यभर परिणाम होतो. गरज आहे. ही सर्व सामान्य उदाहरणे आहेत, ज्याचा प्रभाव मोठ्यांच्या वागण्यातही दिसून येतो.

**समारोप:**

त्यामुळे शिक्षक ही एक अशी व्यक्ती आहे जी कुंभाराप्रमाणे त्याला पाहिजे असलेला विद्यार्थी घडवू शकते. आजचा हा विद्यार्थी उद्याचा समाज नेता आहे, ज्याच्या हातून भावी समाजाची रचना होते. नागरिकत्वाच्या गुणांनी ओतप्रोत असलेली व्यक्ती कोणाचेही नुकसान करू शकत नाही. तो केवळ स्वार्थासाठीच नाही तर समाजाच्या हितासाठीही तयार राहतो, सामाजिक नियमन ही एक आवश्यक जबाबदारी मानून पर्यावरण सुधारणा हे त्याच्यापुढे महत्वाचे उद्दिष्ट राहील. म्हणूनच आपल्याला असे म्हणता येईल ही, शिक्षकाद्वारे नवीन निर्मिती प्रक्रियेद्वारे, पर्यावरण सुधारण्याच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका निश्चितच बजावली जाऊ शकते.

**संदर्भ:**

1. पाण्डेय, के.पी. एवं भारद्वाज अमिता (2014), पर्यावरण शिक्षा एवं भारतीय सन्दर्भ, वाराणसी, विश्वविद्यालय प्रकाशन.
2. वर्मा, जी. एस. (2005), पर्यावरण अध्ययन, मेरठ, इंटरनेशनल पब्लिशिंग हाउस
3. अग्रवाल, अनिल एवं अन्य (1982), दी स्टेट ऑफ़ इण्डिया एनवायरनमेंट सेंटर फॉर द स्टडी ऑफ़ एनवायरनमेंट, दिल्ली
4. शर्मा, आर. ए. (2005), पर्यावरण शिक्षा, मेरठ, आर. लाल बुक डिपो
5. https://mr.vikaspedia.in/
6. https://www.maxmaharashtra.com/max-blog

# प्राचीन मंदिराच्या बाह्यांगावरील स्त्री-मूर्ती शिल्प एक सामाजिक शिक्षण

**प्राचार्य. डॉ. राख चंद्रशेखर शेषराव**
अध्यापक महाविद्यालय गंगाखेड

आपल्याकडे धार्मिक पर्यटनाला विशेष महत्व आहे. त्यात मंदिरात जाऊन हार-फुले वाहने, मूर्तीसमोर डोके टेकवणे, याला जास्त महत्त्व दिले जाते. वास्तविक आपल्याकडील प्राचीन मंदिरे ही त्या काळात विशिष्ट हेतूने बांधलेली आहेत. प्रथम आपण देवळात का जातो.ते मनोभावाने देवाचे दर्शन घेण्यासाठी, देव, देऊळ, यांच्या बाबतीत भक्तांच्याही काही भावना असतात. देवळा चा अर्थ 'आत्मानंद' व 'देवाची मूर्ती' याचा अर्थ जागृतीत इंद्रिया द्वारा अनुभवलेल्या गोष्टी, देवळाचा गाभारा म्हणजे दृश्य नव्हे! ती एक विशेष प्रकारची जागृती आहे.तो आत्म्याचा विकास आहे. ती ब्रम्हस्पर्शाची तीव्र तळमळ आहे. देवळातील गाभारा हा दर्शनासाठी राखून ठेवलेला असतो. 'देवळाच्या बाह्यांगणात जमणारे बरेच जण असतात, परंतु देवळाच्या गाभाऱ्यात शिरणारे फार थोडे असतात.' बाह्यांगणातील मूर्ती या पूजेच्या नसतात पण अंतरंगातील मूर्ती या पूजेच्या परमानंद देणाऱ्या असतात. मग या बाह्यांगणातील मूर्तीचे प्रयोजन काय?असा एक प्रश्न पडतो, या मूर्ती व स्त्री-प्रतिमा पुजिल्या जायच्या नसल्यामुळे त्यात कोणती वैशिष्ट्ये असावीत, पण ह्यातील एक सामाजिक जीवनाचे स्थान हे महत्त्वाचे ठरते. त्याचे दर्शन घेण्याणे हे बहिरंग मनावर बिंबते तसे झाले म्हणजे भक्त अंतरंगात किंवा गाभाऱ्यात प्रवेश करण्यासाठी सिद्ध होतो. मंदिराच्या बाह्यांगणातच अशी शिल्पे असण्याची परंपरा फार प्राचीन आहे. ती शिल्पे प्रामुख्याने अप्सराची (सुर-सुंदरी) याक्षिणीची असतात. ती नग्न,अर्धनग्न व श्रृंगाराशी संबंधित असतात, जैन व बैध्द विहारातुन सुरु झालेली ही परंपरा ही चौथ्या, पाचव्या शतका पासून शैव-वैष्णवादी मंदिरातही सुरवात झाली. या श्रृंगारीक ,कामोत्तेजक प्रतिमांचे मूळ उद्दिष्टे हे आहे की अशा प्रतिमा, मुर्ती असतील तर मंदिराचा भक्कमपणा कायम रहातो आणि या वरील मुर्ती व शिल्पे यातुन सामाजिक शिक्षण आपोआप मिळते, अजंठा,वेरूळ,घारापुरी लेण्यामुळेच जगप्रसिध्द झाले.मंदिरांचा विकास आणि विस्तार होत गेला तसीच मंदिरांची वैशिष्ट्येही पुढं काळानुरूप वाढत गेली, त्यापैकी एक म्हणजे बाह्यांगणातील स्त्री- प्रतिमा,( सुर-सुंदरी) स्त्री शिल्पे मंदिरातही दिसू लागली याच सुरसुंदरीची नावे माहिती व त्या मागचे प्रयोजन काय? याची माहितीही पुढीलप्रमाणे आहे.

**सुरसुंदरी:-**

सुरसुंदरी ही भारतीय शिल्प शास्त्रातील एक वैशिष्ट्यपूर्ण संकल्पना आहे. सुरसुंदरी हे शिल्प भारतातील अनेक मंदिराच्या कोरीव कामामध्ये आढळते. 'सुर अथवा देवलोकातून आलेली सुंदर तरुणी असा याचा अर्थ आहे.' सूर सुंदरी म्हणजे 'देवांगणा' होय.

'शिल्प प्रकाश' या ग्रंथात सुर सुंदरींच्या अनेक नावांचा उल्लेख हा पुढीलप्रमाणे केलेला आहे.आलसा, तोरणा,मुग्धा, डालमालिका,पद्मगंधा, दर्पना, विन्यासा, मातृमूर्ती,(पुत्रवल्लभा),मर्दला, नुपुरपादिका, क्षीरार्णवात, सुगंधा, लिलावती, जया, विजया, कर्पूरमंजीरी, शुभगामीनी,चंद्रवल्ली, मरीचीका, शत्रुमर्दिनी, पत्रलेखीका, मेनका, विधिचित्ता, पद्ममीनी, गुढशब्दा, गौरी, उर्वशी, रंभा इत्यादी सुरसुंदरींची माहिती दिली आहे. धर्मापुरी,होट्टल,मंदिरावरील सुरसुंदरी ह्या कामनिय बांध्याच्या,मोहक हालचाली ने लुब्ध करणाऱ्या आहेत. शब्द, स्पर्श, रूप, रस,गंध हे विषय एकटे सुद्धा मारक असतात. मानवाला या सर्व विकारांनी किंवा विषयानी पूर्णपणे ग्रासले तर त्याची स्थिती कशी होईल? म्हणून भक्तगणांनी मंदिरात जाताना कसे सावध चित्त असावे या संबंधीच्या सूचना करणाऱ्या या सुर-सुंदरी आहेत. देवालये ही त्या वेळपासून ते आजपर्यंत सांस्कृतिक केंद्र होती आणि आजही ते आहेत. यातूनच व्यक्तीमधील नीतिमूल्य निर्माण करण्याची जबाबदारीही त्यांच्याकडे होती.पर्यायने सामाजिक शिक्षणाचे ते केंद्रच होते.

प्राचीन काळापासून मंदिराचा उपयोग हा केवळ देवाचे निवासस्थान न राहता. सामाजिक संदर्भ म्हणून केला जायचा. यातून भाविकाचे प्रबोधन (शिक्षण) व्हावे मंदिरात दर्शनाला आलेल्या भाविकाला वाट दाखविण्याचे काम ही स्त्री-प्रतिके, मूर्ती वर्षानुवर्षे करीत आलेली आहेत. मंदिरावर असलेली कोणतीही प्रतिमा, मूर्ती, चिन्हे ही केवळ उगाच कोरलेली नाहीत. त्या मागे एक ठाम वैचारिक बैठक नक्कीच आहे. जसे, शिवमंदिरात गर्भगृहाच्या उंबरठ्यावर एक राक्षसाचे तोंड कोरलेले आहे. (त्याला किर्तीमुख) असे म्हणतात. शिव मंदिरात गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारापाशी दोन सरिताची शिल्पे कोरलेली असतात. ती गंगा व यमुना यांची होत.त्यांच्या हातात जलकुंभ दाखवलेले असतात.तर पायापाशी मकर व कासव यांची शिल्पे कोरलेली असतात.

मंदिराचे प्रथम बाह्य दर्शन घ्यावे, अगोदर बाहेरुन प्रदक्षिणा घालावी.आणि नंतर मंदिरात प्रवेश करावा. मंदिरावरील शिल्पांची रचना सुद्धा तशीच केलेली आहे. मंदिराबाहेरील गोष्टी या मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग किंवा घटक आहेत. हे सर्व बाहेर ठेवूनच निर्मळ मनाने भगवंताचे दर्शन घ्यावे.

















**संदर्भ ग्रंथ :-**

१) डॉ. बी.जी.देग्लूरकर - मंदिर कसे पहावे.
२) डॉ.बी.जी. देग्लूरकर - सुरसुंदरी

३) डॉ. खोकले अविनाश - धर्मापुरी शिल्पकलेचा अभ्यास.

४) डॉ. मारोती चव्हाण - होट्टल:एक ऐतिहासिक दर्शन

# स्वातंत्र्यपूर्व कालखंड आणि शैक्षणिक विचारवंत

**संशोधिका**
**सौ. पांडे अर्चना अशोकराव**
M.A. M.Ed. SET (Education)
प्राथमिक पदवीधर,
जि.प.कें.प्रा. कन्या शाळा, औंढा ना.
ता. औंढा ना. जि. हिंगोली

**मार्गदर्शक**
**डॉ. बालाजी गणपतराव गिरगांवकर**
कॉलेज ऑफ एज्युकेशन
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**Abstract (सारांश) :-**

*शिक्षण हा जीवनाचा आधार आहे. शिक्षणापासून आपण आपणास वेगळे करू शकत नाही. प्रत्येक व्यक्ती हा शिक्षण देणारा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. केवळ त्याच्याकडून आपण काय घ्यावे हे आपणास कळायला पाहीजे. शिक्षण ही जीवन जगण्याची गुरूकिल्ली आहे. जीवन म्हणजे काय? जीवन का जगावे, जीवन कसे जगावे, जीवनाची सार्थकता कशामध्ये आहे, जीवन पूर्ण कसे करावे? आपण जीवनातून काय घ्यावे व इतरांना काय द्यावे? या सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजे शिक्षण होय. म्हणूनच 'शिक्षणाने सर्व काही होत आहे, त्याकरीता आधी शिक्षण घेतलेच पाहीजे'.*

*जीवन शिक्षण ही काळाची गरज बनली आहे आणि आपल्या सर्व थोर शिक्षणतज्ज्ञांनी, विचारवंतांनी, समाजसुधारकांनी जीवन शिक्षणाची धुरा सांभाळली आहे आणि सर्वांना जगण्याची एक दशा आणि दिशा देण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. हे काम अगदी स्वातंत्र्यपूर्व काळापासून होत आहे. शिक्षण आणि अभ्यासक्रमातून प्रकट होणारे फुले, आंबेडकर, गांधीजी, विवेकानंद, टागोर इ. चे विचार आपल्या शिक्षणातून तसेच अभ्यासक्रमातून महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार प्रचारित व प्रसारित होत असतात. या थोर महापुरूषांचे सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक स्वरूपातील विचार आपल्याला प्रेरित व प्रोत्साहित करतात. तेव्हा स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षणतज्ज्ञांचे विचार व आता अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचार निश्चितच येणाऱ्या भविष्यकालीन समस्यांचे निराकरण व उत्तम जीवन जगण्यासाठी दिशादर्शक ठरतील. म्हणूनच स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षणतज्ज्ञांच्या शैक्षणिक कार्याचा व विचारांचा अभ्यास करून नविन अभ्यासक्रमासाठी एक दिशा निश्चितच मिळेल असे वाटते.*

*म्हणूनच हा संशोधन लेख NEP 2020 या नविन शैक्षणिक धोरणाशी सांगड घालणारा आहे.*

**प्रस्तावना :-**

"शिक्षण म्हणजे अपक्व मनाचा परिपक्व मनाशी निकट संबंध येणे". तसेच "शिक्षण म्हणजे उत्तम नागरिक बनवणे होय". या अशा अनेक शिक्षणाच्या व्याख्या आहेत व तयार करता येतील. विविध शिक्षण तज्ज्ञांनी शिक्षणाच्या वेगवेगळ्या व्याख्या केल्या आहेत. या सर्व व्याख्यांमधून एकच गोष्ट दिसून येते ती म्हणजे – "जीवनाच्या सर्व व्यवहारांकरिता महत्त्वाचे असणारे ज्ञान, कौशल्या व जाणीव संक्रमित करणारे संघटित व सातत्याचे अध्यापन म्हणजे शिक्षण होय" – (UNESCO) अशाच प्रकारचे शिक्षण स्वातंत्र्यपूर्व काळात देखील दिले जात होते. स्वातंत्र्यपूर्व काळात दिले जाणारे शिक्षण हे जीवनाभिमुख होते. प्रत्यक्ष जीवनाशी शिक्षणाचा संबंध होता. शिक्षण म्हणजे ज्ञान, कौशल्ये व अभिवृध्दी यांचे संपादन असल्याने तत्त्ववेत्यांनी शिक्षणविषयक सिध्दांत मांडण्याचे प्रयत्न केले. त्याच काही शिक्षण तत्त्ववेत्यांचा म्हणजेच शैक्षणिक विचारवंत व त्यांचे कार्य यांचा थोडक्यात अभ्यास या संशोधन लेखामधून संशोधिका करणार आहे. समग्र मानवजातीच्या कल्याणाचे अंतिम उद्दिष्ट साध्य करताना संशोधन हा एक मौलिक मार्ग आहे, हे ओळखून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संशोधनाकडे पाहिले. म्हणनूच स्वातंत्र्यपूर्व काळातील विचारवंतांनी कोणते शैक्षणिक कार्य केले व कोणते शिक्षणविषयक विचार मांडून तत्कालीन समाजाला शिक्षणाकडे वळवले याचा अभ्यास संशोधिकेने या लेखामधून केला आहे. तसेच सध्या NEP 2020 राबविण्यासाठी किंवा अंमलात आणण्यासाठी सर्व स्तरावरून अभ्यास केला जात आहे. त्यादृष्टीने देखील स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षण हा

महत्त्वपूर्ण अभ्यास आहे. या सर्वांमध्ये महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण सध्या भारतीय स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव (आझादी का अमृतमहोत्सव) साजरा करीत आहोत. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व शिक्षणाची सांगड स्वातंत्र्योत्तर शिक्षणाशी घालून शैक्षणिक विचारवंतांच्या शैक्षणिक कार्यालया उजळणी देण्याचा या संशोधन लेखातून प्रयत्न केला आहे.

**METHODOLOGY (पध्दत) :-**

प्रस्तुत संशोधन विषयावर भाष्य करण्यासाठी संशोधिकेने स्वातंत्र्यपूर्व काळातील विविध शिक्षण तज्ज्ञांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास केला. तसेच स्वातंत्र्यपूर्व काळातील शैक्षणिक विचारवंताचे शैक्षणिक कार्य इथे विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.

1. **राजा राममोहन रॉय** (1772 - 1833) :-

भारतात नविन युग आणणारे, बहुभाषी, धर्मसुधारक, देशप्रेमी राजा राममोहन रॉय यांचा जन्म बंगालमध्ये 18 व्या शतकात झाला. त्यावेळी भारतावर ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य होते. वयाच्या 22 व्या वर्षापासून त्यांनी इंग्रजी भाषेचे शिक्षण घेण्यास सुरूवात केली. पर्शियन, अरबी व संस्कृत भाषांचे शिक्षण त्यांना घरीच मिळाले. 1804 ते 1814 या काळात त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीमध्ये नोकरी केली.

**शैक्षणिक कार्य / विचार :-**

1) आपल्या लेखनाद्वारे सर्व धर्मांतील अंधविश्वास व मुर्तीपुजेचा विरोध केला.
2) हिंदु धर्मातील जातीव्यवस्था, बहुपत्नीत्व, सतीप्रथा, स्त्रियांना शिक्षण न देणे, विधवा पुनर्विवाहास बंदी करणे, धार्मिक कर्मकांड इ. दुष्ट चालिरितींवर त्यांनी आयुष्यभर प्रखर लेखन केले.
3) पर्शियन, इंग्लिश व बंगाली भाषेत विपुल लेखन केले. त्यांना बंगाली भाषेतील गद्याचा जन्मदाता मानले जाते.

2. **महात्मा ज्योतीराव फुले** (1827 – 1890) :-

स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या त्रयीवर नितांत भरवसा ठेवणारे आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठवणारे महात्मा फुले हे महापुरूष होते. म. फुले यांचा जन्म 11 एप्रिल 1827 रोजी कटगुण, सातारा येथे झाला. महात्मा फुले यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्युथर म्हणून ओळखले जाते. ते मानवतावादी विचारांचे होते. त्यांनी मेकॉलेच्या खालत्यास कडाडून विरोध केला. 'शिक्षण हे वरच्या वर्गापासून खालच्या वर्गापर्यंत पाझरत आले पाहिजे' या विचारास फुलेंचा विरोध होता. 'प्रथम उपेक्षितांना शिक्षण नंतर अपेक्षितांना शिक्षण' हे सूत्र अंमलात आणावे, यावर त्यांचा भर होता.

**शिक्षणविषयक कार्य / विचार :-**

1) स्त्री शिक्षणाचा पाठपुरावा
2) प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत
3) प्रशिक्षित शिक्षकाची तरतूद करणे.
4) प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष देणे.
5) ग्रामीण भागातील मुलामुलींचे शिक्षण
6) राष्ट्रनिर्माणासाठी शुद्रांना शिक्षण
7) शिक्षणप्रणालीत आमुलाग्र बदल विचार
8) व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण
9) त्रिभाषा सूत्राचा अवलंब
10) शिष्यवृत्ती व वसतीगृहाची सुविधा
11) शिक्षणविषयक ज्ञान व विचार

म. फुलेंनी स्वत:च्या पत्नीला शिक्षित केले व मुलींना शिकवण्याचे काम करावयास लावले. सावित्रीबाई फुले या महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री-शिक्षिका झाल्या. मुलींना शिक्षण मिळवून देण्यात म. फुले व सावित्रीबाई फुले यांचा मोलाचा वाटा आहे. म. फुले यांनी इ.स. 1848 साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात पहिली मुलींची शाळा काढून तेथील

शिक्षिकेची जबाबदारी स्वत:ची पत्नी सावित्रीबाईवर सोपविली. हीच स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ ठरली. शेतकऱ्यांचे असूड, गुलामगिरी, ब्राम्हणांचे कसब, इ. अनेक पुस्तकांचे लेखन केले.

3. **सावित्रीबाई फुले** (1831 - 1897) :-

3 जानेवारी 1831 रोजी नायगाव ता. खंडाळा जि. सातारा येथे खंडोजी नेवसे पाटील यांच्या पोटी सावित्रीबाईंचा जन्म झाला. 1 जानेवारी 1848 रोजी बुधवार पेठेत मुलींसाठी सुरू केलेल्या शाळेत शिक्षिका म्हणून काम केले.

**शैक्षणिक कार्य :-**

1. पहिली स्त्री शिक्षिका, स्त्री – मुख्याध्यापिका म्हणून काम केले.
2. 19 सप्टेंबर 1851 रास्त वेळेत मुलींची दुसरी शाळा काढली.
3. 15 मार्च 1852 – वेताळपेठेत मुलींची तिसरी शाळा काढली.
4. नॉर्मल स्कुल – फुले दाम्पत्याने शिक्षिका तयार करण्यासाठी नॉर्मल स्कुल काढले.
5. 28 जानेवारी 1853 – बालहत्या प्रतिबंधक गृह उभारले.
6. 'बावनकशी सुबोध रत्नाकर' – हा काव्यसंगृह लिहीला.

समाजाच्या विरोधाला, अत्याचाराला सहन करून मुलींच्या शिक्षणासाठी अहोरात्र झटल्या तसेच मुलींना शिक्षणाची दारे उघडी केली. म्हणूनच आज सावित्रीबाईला आद्यसरस्वती म्हणून गौरवले आहे.

4. **रविंद्रनाथ टागोर** (1861 ते 1941) :-

रविंद्रनाथांचा जन्म एका बंगाली जमीनदाराच्या घराण्यात झाला. त्यांचे स्वत:चे प्रत्यक्ष शाळेत जाऊन फार थोडे शिक्षण झाले. परंतु त्यांनी खूप मोलाचे शैक्षणिक कार्य केले आहे. नोबेल पारितोषिक विजेते गुरूवर्य रविंद्रनाथ टागोरांनी साहित्य, चित्रकला, शिल्पकला या सर्व क्षेत्रांत उत्तुंग कार्य केले. त्यांना साहित्यासाठी नोबेल पारितोषिक देण्यात आले.

**शैक्षणिक कार्य / विचार :-**

1) 22 डिसेंबर 1901 रोजी ब्राम्हचर्याश्रम या नावाने शांतिनिकेतन येथे वसतिगृहयुक्त शाळा काढली. तीच पुढे विश्वभारती विश्वविद्यालय या नावाने नावारूपास आली.
2) ग्रामीण उध्दाराचे कार्य करण्यासाठी त्यांनी इ.स. 1922 मध्ये सुरूल येथे श्रीनिकेतन या संस्थेची स्थापना केली.
3) शिक्षण मातृभाषेचा पुरस्कार करावा.
4) स्त्री-पुरूषांना शिक्षणाची समान संधी देणे.
5) शिक्षणाच्या योगे ग्रामीण विकास होणे.
6) शिक्षणाचा संबंध प्रत्यक्ष जीवनाशी असणे.
7) शिक्षण स्वावलंबी असावे.
8) प्रवेशास स्वत:च्या प्रवृत्तीप्रमाणे व आवडीप्रमाणे शिक्षण घेण्याची अनुमती असणे.

5. **स्वामी विवेकानंद** (1863 - 1902) :-

वेदान्त व विज्ञान यांचा समन्वय करणारे, भारताच्या अध्यात्मिक थोर वारसाची ओळख सर्व जगास करून देणाऱ्या, संन्यास पत्करूनही सामान्य जणांना शिक्षणाचे दरवाजे उघडे करण्यासाठी आग्रह धरणाऱ्या, स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते, मानवतेचे पुजारी, थोर वक्ते स्वामी विवेकानंदाचा जन्म 12 जानेवारी 1863 साली कोलकाता येथे झाला. स्वामी विवेकानंदाचे मुळ नाव नरेंद्र असे होते.

**शैक्षणिक कार्य / विचार :-**

1) इ.स. 1886 मध्ये श्री. रामकृष्ण परमहंसांच्या देहावसानानंतर रामकृष्ण मिशनची स्थापना केली.
2) इ.स. 1888 ते 1891 पर्यंत भारत भ्रमण करून भारताच्या सामाजिक स्थितीचे अवलोकन केले.
3) 11 सप्टेंबर 1893 रोजी शिकागो येथील सर्व धर्म परिषदेत त्यांनी वेदांत तत्त्वज्ञान व हिंदु धर्माची सर्वसमावेशकता या विषयावर आपले विचार मांडले.
4) इ.स. 1897 मध्ये रामकृष्ण सेवा संघाची स्थापना केली.

**आधुनिक शैक्षणिक तत्त्वांचा पुरस्कार केला ती अशी –**

1) सर्वांसाठी शिक्षण
2) विद्यार्थ्यांच्या मातृभाषेत शिक्षण
3) जीवनाच्या तयारीसाठी शिक्षण
4) सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षण
5) विज्ञाननिष्ठा
6) माणसाच्या मुलभूत विकसनशीलतेवर विश्वास
7) स्वयंअध्ययन हेच खरे शिक्षण
8) शिक्षणाद्वारे सहिष्णुतेचा विकास
9) एकाचवेळी एकाच बाबीचे शिक्षण (बी.एफ. स्किनरच्या शैक्षणिक कार्यक्रमाचा (प्रोग्रामिंग) मूळ सिध्दांत)
10) प्रत्यक्ष अनुभवाद्वारे शिक्षण
11) प्रौढ शिक्षण
12) अध्यात्म व विज्ञान यांचा संयोग

6. **महात्मा गांधी** (1869 ते 1948) :-

महात्मा गांधी यांचा जन्म 2 ऑक्टोबर 1869 रोजी गुजरातमधील पोरबंदर येथे झाला. त्यांचे पुर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असे होते. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात जसा गांधीजींचा सिंहाचा वाटा आहे तसाच भारतीय शिक्षण पध्दतीत बदल करण्यात किंवा नविन शैक्षणिक तत्त्वांचा पुरस्कार करून ती तत्त्वे प्रत्यक्ष अंमलात आणण्यात देखील गांधीजींचा सिंहाचा वाटा आहे.

**शैक्षणिक तत्त्वज्ञान / कार्य :-**

1) 1917 मध्ये चंपारण्य जिल्ह्यात ग्रामशिक्षणाचा प्रारंभ केला.
2) 1921 मध्ये गुजरात विद्यापीठाची स्थापना केली.
3) 1937 मध्ये वर्धा येथे शिक्षण परिषद घेण्यात आली व यामध्ये त्यांनी आपल्या नई तालीम, बुनियादी शिक्षा, मुलोद्योगी शिक्षण वा बेसिक एज्युकेशन चा पुरस्कार केला.
4) त्यांनी शिक्षणाचे स्तर तयार केले –
प्रौढ शिक्षण, पूर्व बुनियादी, बुनियादी, उत्तर बुनियादी व उच्च शिक्षण
5) प्राथमिक शिक्षण सात वर्षाचे राहील व त्याचा दर्जा इंग्रजी (इंग्रजी सोडून) मॅट्रिकच्या दर्जाइतके राहील.
प्राथमिक शिक्षण – मॅट्रिकचा दर्जा – इंग्लिश + पुरेसे व्यवसाय शिक्षण.
6) स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला.
7) मुलोद्योगी / बुनियादी शिक्षण पध्दतीत पुढीलप्रमाणे अभ्यासक्रम असावा.
अ) मुख्य हस्त व्यवसाय – पुढीलपैकी कोणताही एक 1. हातमाण व हातसूत 2. सुतारकाम 3. शेती 4. फळे व भाजीपाला 5. चामडयाचे काम 6. स्थानिक परिस्थितीप्रमाणे कोणताही मुलभूत उत्पादनक्षम व्यवसाय.
आ) मातृभाषा
इ) गणित
ई) समाजविषयक अभ्यास (इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र)
उ) चित्रकला
ऊ) संगीत
ऋ) हिंदूस्थानी.

चौथ्या इयत्तेपर्यंत मुला-मुलींना समान अभ्यास व पाचव्या इयत्तेपासून मुलींना घरकाम व गृहशास्त्र हे वेगळे विषय.

8) महात्मा गांधी विशिष्ट धर्माच्या शिक्षणाच्या विरूध्द होते. त्यांच्या मते सत्य आणि अहिंसा या सद्गुणांना पोषक शिक्षण देणे. त्यांच्या मते शिक्षणाच्याद्वारे आत्म्याचा विकास व्हावा.

7. **राजर्षि शाहू महाराज** (1874 - 1922) :-

राजर्षि, युगपुरूष, जनसामान्यांचे कैवारी, क्रियाशील शिक्षणद्रव्य शाहू महाराज यांचा जन्म 1874 साली कागल येथे झाला. 17 मार्च 1884 मध्ये दत्तक विधान व कोल्हापूर संस्थानचे राजे म्हणून राज्यारोहण झाले. 2 एप्रिल 1894 मध्ये त्यांनी राज्यसूत्रे हाती घेतली. आपल्या आमदानीत त्यांनी मोफत सार्वत्रिक शिक्षण, शिक्षणसंस्थांची स्थापना, तळागाळातील लोकांसाठी वसतिगृहे, धार्मिक सुधारणा इ. अनेक महान कार्य केली. ते एक महान लोकनायक, लोकशिक्षक, समाजपरिवर्तक, गरीबांचे कैवारी, शिक्षामहर्षि व समाजसुधारक होते.

**शैक्षणिक विचार / कार्य :-**

1) प्राथमिक शिक्षण :- शाहु महाराजांनी कोल्हापूर संस्थानात 24 जुलै 1917 रोजी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. 4 मार्च 1918 रोजी चिखली येथे पहिली मोफत प्राथमिक शाळा सुरू केली.
2) वसतिगृहांची स्थापना :- 'सर्व समाजासाठी शिक्षणाचे दरवाजे खुले करणे' हे शाहू महाराजांचे धोरण होते. सर्वांत प्रथम त्यांनी सर्व जातीच्या विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह कोल्हापूर येथे सुरू केले. नंतर जातीनिहाय वसतिगृहांची स्थापना केली. म्हणूनच कोल्हापूर 'मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस' असे म्हटले जाऊ लागले.
3) शिष्यवृत्त्यांची सोय :- शिक्षणास आवश्यक ती आर्थिक मदत देण्यासाठी शिष्यवृत्त्या देण्याची योजनाही अंमलात आणली. सन 1911 मध्ये जाहीरनामा काढून दर शंभर मुलांमध्ये पंधरा मुलांना नादारी द्यावयाचे ठरले.
4) स्त्री शिक्षण :- स्त्री शिक्षणासाठी स्वत:च्या सूनेला प्रथम साक्षर केले. तसेच घोडयावर बसणे, ड्रायव्हिंग करणे, शिकार करणे इ. मर्दानी शिक्षण देण्याची व्यवस्था केली.
   स्त्रियांसाठी त्यांनी बालविवाह, विधवा विवाह, हिंदू जैन संमिश्र विवाह इ. विषयी प्रगत कायदे करून त्यांची अंमलबजावणी केली.
5) तसेच उद्योग शाळा, दुय्यम व उच्च शिक्षण, सैनिकी शाळा, संस्कृत शाळा, पुरोहित शाळा, पाटील शाळा, शिक्षण प्रशिक्षण केंद्रे, ग्रंथालय इ. शिक्षणविषयक सुविधा सुरू करून समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे काम केले.

8. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** (1891 ते 1956) :-

भारतीय घटनेचे शिल्पकार, दलितांचे कैवारी, थोर विद्वान, शिक्षणतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म 14 एप्रिल 1891 साली मध्य प्रदेशातील महू या गावी झाला. त्यांचे मूळ नाव भीमराव असे होते. डॉ. आंबेडकरांनी स्वत: उच्च शिक्षण तर घेतलेच पण इतरांना देखील शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

**शैक्षणिक कार्य :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्राध्यापक, प्राचार्य, विविध शैक्षणिक संस्थांचा संस्थापक ही रूढार्थाने शिक्षणक्षेत्राशी संबंधित कामे तर केलीच. परंतु त्यापेक्षा व्यापक असे. लोकशिक्षणाचे व समाजपरिवर्तनाचे महान कार्य केले. नव्या भारताची जडणघडण कशी असावी याचे मार्गदर्शन त्यांनी भारतीय घटनेच्या द्वारे केले. समाजशिक्षक ही व्यापक भूमिका स्वीकारून अनेक शैक्षणिक कामे केली.

1) 31 जानेवारी 1920 पासून अस्पृश्यतेविरूध्द संघर्ष करण्यासाठी व भारतातील विषमता दूर करण्यासाठी मुकनायक हे पाक्षिक सुरू केले.
2) पददलित समाजाला आपल्या अधिकारांची जाणीव व्हावी म्हणून इ.स. 1924 मध्ये बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली.
3) 1927 – बहिष्कृत भारत – पाक्षिक
4) 1929 – जनता – पाक्षिक – प्रबुध्द भारत.

5) 1945 – मुंबई – पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना.
6) 1946 – 20 जून 1946 – मुंबई – सिध्दार्थ कॉलेजची स्थापना.
7) 1950 – मिलिंद महाविद्यालयाची स्थापना.
8) 1956 – सिध्दार्थ कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्सची स्थापना.
9) 1956 – सिध्दार्थ विधी महाविद्यालयाची स्थापना.

तसेच भारतीय घटनादुरूस्ती संयुक्त समितीचे सदस्य (इ. 1932), नेहरू सरकारमध्ये कायदामंत्री, घटना मसुदा समितीचे अध्यक्ष, राज्यसभा सदस्य या नात्याने खूप महत्त्वपूर्ण कामे केली. त्यांच्या मते शिक्षणाद्वारे चारित्र्याचा विकास होणे आवश्यक आहे. चारित्र्यसंवर्धनात प्रज्ञा, शील, करूणा व मैत्री या गुणांचा समावेश होतो. तसेच विद्यार्थ्यांनी स्वत:च्या शिक्षणाचा उपयोग समाजासाठी करावा.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये वरील विचारवंताबरोबरच अरविंद घोष, संत गाडगेबाबा, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, डॉ. झाकीर हुसेन, संत तुकडोजी महाराज, इ. कितीतरी शिक्षण तज्ज्ञांनी स्वत:चे विचार मांडले, त्याची अंमलबजावणी केली व शिक्षणविषयक मोलाचे कार्य केले. या सर्वांचे विचारांची कास धरूनच शिक्षण क्षेत्रात पुढे आमुलाग्र असे बदल घडून आले. अगदी वैदिक काळापासून सुरू झालेले शिक्षणाचे कार्य आतापर्यंत अविरत सुरू आहे.

**चर्चा :-**

वरील सर्व शिक्षणतज्ज्ञांच्या कार्याच्या अभ्यासावरून एक गोष्ट लक्षात येते स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील शैक्षणिक विचार हे आजच्या शैक्षणिक विचाराशी बऱ्याच प्रमाणात मिळते – जुळते आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात देखील व्यवसाय शिक्षण, स्वावलंबनावर भर, कला कौशल्याला वाव, उद्योग व्यवसायाला महत्त्व / वाव देणारे शिक्षण, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत, सैनिकी शाळा, स्त्री शिक्षणाचे महत्त्व, मातृभाषेला प्राधान्य इ. सर्व गोष्टी ज्या आजच्या नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये अंतर्भूत करण्यात आलेल्या आहेत. थोडक्यात स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील शैक्षणिक विचारवंतांचा दृष्टीकोन हा दूरगामी होता. त्याचीच कास धरून आज 21 व्या शतकातील शिक्षणविषयक घडामोडी सुरू आहेत. एकंदरीत स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षणक्षेत्रात मोलाचे कार्य केले आहे.

**निष्कर्ष :-**

वरील विवेचनावरून एवढेच लक्षात येते की, एखाद्या इमारतीचा पाया जितका मजबूत असावयास पाहीजे तेवढीच ती इमारत मजबूत होते. म्हणून स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील शिक्षण हे दर्जेदार व प्रभावी होते. त्यावरच पुढची सर्व शिक्षणविषयक धोरणे, अभ्यासक्रम, पाठ्यक्रम यांची उभारणी झाली आहे. म्हणूनच या सर्व शिक्षणतज्ज्ञांच्या विचारांच्या पायावर नविन शैक्षणिक धोरण 2020 ची इमारत उभारून स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव साजरा केला जाईल. इतकीच या लेखातून अपेक्षा !

**संदर्भ ग्रंथ :-**

1. आपटे, पां, श्री. राष्ट्रीय शिक्षणाचा इतिहास, पुणे.
2. Aggarwal, J.C. Progress of Education in Free India : Modern Indian Education and its problems, New Delhi, 1977.
3. प्रगत शैक्षणिक तत्त्वज्ञान
4. देशमुख एल.जी. (जुलै 2000) शिक्षणाचे तत्त्वज्ञानात्मक व समाजशास्त्रीय अधिष्ठान कोल्हापूर, फडके प्रकाशन

# गुरुकुल शिक्षण पद्धती : एक अभ्यास

**डॉ. लाहोरकर बी. आर.**
प्राचार्य - सिंधुताई जाधव महाविद्यालय,
मेहकर, जि. बुलढाणा.

**केंद्रे भगवान रामकृष्ण**
(संशोधक विद्यार्थी )
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**प्रस्तावना :**

इतिहासाचे अभ्यासाच्या दृष्टीने तीन कालखंडामध्ये विभाजन केले जाते. 1) प्राचीन कालखंड, 2) मध्ययुगीन कालखंड व 3) आधुनिक कालखंड. प्राचीन आणि मध्युगीन कालखंडामध्ये प्रचलित असलेली गुरुकुल शिक्षण पद्धती ही भारतीय संस्कृतीचे एक वैशिष्ट्य मानले जाते. गुरुकुल शिक्षण पद्धतीमध्ये गुरु हे स्वतः एकांतामध्ये राहून ध्यान, मनन, चिंतन, योगाभ्यास करून ज्ञान प्राप्त करत असत आणि आपल्याला प्राप्त झालेले ज्ञान हे आपल्या शिष्यांना देत असत. यासाठी विद्यार्थ्यांना म्हणजे शिष्यांना वयाच्या सातव्या किंवा आठव्या वर्षापासून गुरूंच्या आश्रमामध्ये त्यांच्या सानिध्यात राहून ज्ञानार्जनाचे कार्य करावे लागत. हे शिक्षण साधारणपणे 12 वर्षे चाले. येथे शिष्यांना अनेक प्रकारच्या विद्यांचे शिक्षण दिले जात होते. गुरूंच्या घरी किंवा आश्रमात असताना शिष्याला ज्ञानसाधनेबरोबरच अनेक प्रकारची कामे करावी लागत. यात कपडे धुणे, भांडी धुणे, जेवण बनवणे, इत्यादी. ही गुरुकुल शिक्षण पद्धती पूर्ण भारतभर प्रचलित होती. या शिक्षण पद्धतीमध्ये गुरु शिष्यांकडून कोणतेही मूल्य घेत नसत. शिक्षण पूर्ण झाल्यावर शिष्य गुरुदक्षिणा म्हणून जे काही देत ते आनंदाने स्वीकारले जाई. या गुरुदक्षिणेमध्ये किती आणि काय दिले यापेक्षा कृतज्ञता भाव महत्त्वाचा असे.

**गुरुकुल शिक्षण पद्धतीचे स्वरूप :**

आपण अनेकदा या गुरुकुल शिक्षणपद्धतीविषयी ऐकले वा वाचले असेल. जी पद्धती भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. तिची उपयुक्ता अन्यसाधारण आहे. हे तिचे स्वरूप समजून घेतल्याशिवाय कळणार नाही.

1.**दिनचर्या** : गुरुकुल शिक्षण पद्धतीमध्ये खालील प्रमाणे दिनचर्या होत असे-

* पहाटे लवकर उठून, स्नान-संध्या झाल्यानंतर सूर्यनमस्कार व योगासने घेतली जायची.
* त्यानंतर सकाळी पाठ व्हायचा. यामध्ये नीतिमूल्यांचे शिक्षण दिले जायचे.
* ब्रह्मचर्य व्रताचा एक भाग म्हणून माधुकरी मागणे.
* दुपारच्या वेळी थोडी विश्रांती.
* विश्रांतीनंतर सूर्यास्तापर्यंत पाठ चालायचा.
* सायंकाळी सायंसंध्या व स्तोत्र पाठ.
* अल्पोपहार.
* विश्रांती.

अशा प्रकारचा दिनक्रम गुरुकुलमध्ये चालत असे.

2. **गुरुकुलातील शिक्षण पद्धती** : व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने परिपूर्ण शिक्षणाची येथे सोय केलेली असायची. यात -

**विद्या अभ्यास** — यामध्ये वेद अभ्यास, विधी अभ्यास, इत्यादी अनेक विद्यांचा अभ्यास येथे घेतला जात असे.

**शस्त्र अभ्यास** — यात धनुष्यबाण चालवणे, भाला फेकणे, गदायुद्ध करणे, तलवारबाजी, इत्यादी बाबतचे शिक्षण दिले जाई.

**शास्त्र अभ्यास** — शास्त्र अभ्यासामध्ये धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, भाषाशास्त्र, वेदशास्त्र, राज्यशास्त्र, इत्यादी शास्त्रांचा अभ्यास करून घेतला जाई.

**योग अभ्यास** : योगशास्त्रात ध्यान धारणा, योगासने, हटयोग, राजयोग यांचे प्रशिक्षण दिले जाई .

याचबरोबर येथे दरोज नवीन पाठ घेतला जात असे. यामध्ये सुरुवातीला मागील झालेल्या पाठाची उजळणी व्हायची. त्यामुळे त्यांची आकलन क्षमता लक्षात यायची. त्यानंतर नवीन पाठ व्हायचा. गुरु आपल्या शिष्यांना बरोबर घेऊन जंगलामध्ये फेरफटका मारत. नकळतपणे शिष्यांची परीक्षा घेतली जाई. कालावधी पूर्ण झालेल्या आणि परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या शिष्यांना घरी पाठवले जाईल.

**3. अर्थसहाय्य :**

गुरुकुलातील शिक्षण शिष्यांना पूर्णपणे मोफत दिले जाईल यासाठी कुठलाही मोबदला शिष्यांकडून घेतला जात नसे किंवा शासनाकडूनही कसल्या प्रकारची मदत या आश्रमाला किंवा गुरुकुला दिली जात नव्हती तर लोकांकडून मिळालेल्या धनावर येथील व्यवहार चालत असत.

**4. शिक्षण प्रणालीचे वेगळेपण :**

समाजामध्ये काही मुले ही अलौकिक बुद्धिमत्ता घेऊन जन्माला आलेली असतात. एखादा अभ्यासक्रम पूर्ण करण्यास सर्वसामान्य विद्यार्थ्यांना जर दहा वर्षे लागत असतील तर अशी मुले हा अभ्यासक्रम दोन ते तीन वर्षांमध्ये सहज पूर्ण करू शकतात. त्याला लागलीच पुढील अभ्यासक्रमाचे शिक्षण देण्याची सोय येथे असे. प्रचलित शिक्षण पद्धतीमध्ये मात्र ती सोय दिसून येत नाही. हे या शिक्षण पद्धतीचे वेगळेपण आपल्याला सांगता येईल.

➢ **गुरुकुल शिक्षण पद्धतीचे महत्त्व :**

आजही आपल्याला कुठे-कुठे गुरुकुल पद्धतीचे शिक्षण दिले जात असल्याचे दिसून येते. मात्र काळाच्या ओघात त्यात बरेचसे बदल झालेले आहेत. सध्याच्या कुठल्याही शिक्षण पद्धतीमध्ये पुस्तकी ज्ञानाला महत्त्व असल्याचे आपल्याला जाणवते. पूर्वीच्या आणि आताच्या गुरुकुल शिक्षण पद्धतीमध्ये बराचसा फरक आहे. गुरुकुलाचे नियम, पद्धती, स्वरूप पूर्वीसारखे राहिलेले नाही. या महान शिक्षण पद्धतीचे महत्त्व आपल्याला खालील प्रमाणे सांगता येईल -

**अ - नियमितता :**

गुरुकुल शिक्षण पद्धतीतील जीवन हे अनेक नियमांनी बंदिस्त केलेले असल्यामुळे या नियमाच्या चाकोरीमध्ये राहूनच शिष्याला आपले दैनंदिन जीवन जगावे लागत. त्यामुळे त्याच्या जीवनाला एक प्रकारची शिस्त लागत असे. दररोज सकाळी सूर्योदयापूर्वी उठणे, दररोज स्नान करणे, ध्यान, पूजपाठ करणे, अभ्यास करणे, या सर्व बाबी गुरूच्या सान्निध्यात व त्यांच्या मार्गदर्शनाखाली करत असल्यामुळे त्यांना नियमबद्ध जीवनाची सवय होत होती.

**ब — श्रमप्रतिष्ठेची जोपासना :**

सकाळी उठल्यापासून साफसफाई करणे, स्नान करणे, कपडे धुणे, स्वयंपाक बनवणे, त्यासाठी लागणारी सर्व पूर्वतयारी करणे, इतरांना सहकार्य करणे ही सर्व कामे येथे शिष्याला करावी लागत असल्यामुळे त्याला काम करण्याची सवय लागत असे आणि ती पुढे त्याला जीवनभर उपयोगी पडत असे.

**क - स्वावलंबन :**

मुले घरी असली की ती प्रत्येक लहान मोठ्या गोष्टींसाठी आईवडिलांवर अवलंबून राहतात. गुरुकुलात मात्र शिष्यांना स्वतःची सर्व कामे स्वतःच करावी लागत. त्यामुळे ते स्वावलंबी बनतात. मानवी जीवनामध्ये स्वावलंबन हा अतिशय महत्त्वाचा गुण आहे. तो तेथे त्यांना शिकायला मिळतो.

**ड - ब्रह्मचर्य पालन :**

गुरुकुलात किंवा आश्रमात शिष्यांना वयाच्या 18 ते 20 वर्षांपर्यंत म्हणजेच शिक्षण पूर्ण होईपर्यंत राहावे लागत व तोपर्यंत ब्रह्मचर्याचे पूर्ण पालन करणे बंधनकारक असे. त्यामुळे विद्यार्थी हे तेजस्वी, चारित्र्यसंपन्न आणि संयमी बनत. ते शारीरिकदृष्ट्या सुदृढ व निरोगी बनत.

याच बरोबर आणखीही काही फायदे या गुरुकुल शिक्षण पद्धतीचे आहेत. ते खालील प्रमाणे -

1) संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो.
2) आपापल्या बौद्धिक कुवतीप्रमाणे मुक्त शिक्षण घेण्याची संधी मिळते.
3) मन शांत, प्रसन्न व निष्काम होते.

4) शरीर तंदुरुस्त राहते.
5) व्यक्तीच्या जीवन जगण्याला एक प्रकारची शिस्त लागते.
6) व्यक्ती स्वावलंबी जीवन जगू शकतो.
7) जीवनात आलेल्या प्रत्येक बऱ्या-वाईट प्रसंगाचा धीराने सामना करता येतो.
8) श्रमप्रतिष्ठेची सवय लागते.
9) ब्रह्मचर्य पालनाचे महत्त्व समजते.
10) परिस्थितीशी समायोजन साधता येते.
11) सहकार्याची भावना वाढीस लागते.
12) मानसाचा सामाजिक, बौद्धिक, शारीरिक व मानसिक विकास होतो.
13) नीतिमूल्यांचे शिक्षण मिळाल्यामुळे जीवनाला मूल्यांची साथ मिळते.
14) पर्यावरणाबाबत जाणीव जागृती होते.
15) निसर्गाशी जवळीक वाढते.
16) पशुपक्ष्यांविषयी आपुलकीची भावना निर्माण होते.

**समारोप**

इतिहासाच्या आधुनिक कालखंडात हळूहळू ही शिक्षण पद्धती लोप पावत गेली आणि आताची ही पुस्तकी ज्ञानाला महत्त्व देणारी, अर्थार्जनासाठी शिक्षण हा उद्देश असलेली शिक्षण पद्धती उदयाला आली. सध्याच्या शिक्षण पद्धसाठी अनेक आयोग झाली, अनेक समित्या स्थापन झाल्या, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक उद्दिष्टे ठरविली गेली. त्या दृष्टीने प्रयत्नही झाले. मात्र शेवटी ही आताची शिक्षण पद्धती बालकांच्या बौद्धिक विकासाच्या बाबतीतच केंद्रित होत असलेली आपल्याला दिसून येते. म्हणून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी व कौशल्य विकासासाठी आजही भारतीय गुरुकुल शिक्षण पद्धतीचे महत्त्व अबाधित आहे असे आपल्याला म्हणता येईल.

**संदर्भ :**

1) https://mr.wikipedia.org/w/ index.php?title=गुरुकुल_शिक्षण&oldid=1915356
2) https://www.hindujagruti.org/hinduism-for-kids-marathi/1093.html
3) https://mr.quora.com/गुरुकुल-शिक्षणपद्धती-काय
4) http://rajuthokal.blogspot.com/2013/06/blog-post_8726.html
5) https://marathi.webdunia.com/article/guru-pournima-marathi/gurupurnima-111121500017_1.html

# स्वातंत्र्यपूर्व कालखंड-प्राचीन भारतीय शिक्षणपद्धती

**सहाय्यक प्रा.नांगरे नूतन कृष्णराव**
आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा

**डॉ. बालाजी जी. गिरगावकर**
प्राचार्य,कॉलेज ऑफ एज्युकेशन, विष्णूपुरी नांदेड

**प्रास्ताविक-**

भारतीय संस्कृतीचा कालखंड खूप मोठा आहे. या कालखंडातील इ. स. पूर्व १००० ते इ.स. १२०० पर्यंतचा कालखंड म्हणून ओळखला जातो. या प्राचीन कालखंडाचेही चार उपखंडामध्ये रूपांतर केले आहे. वैदिक काळ, उपनिषद काळ, धर्मशास्त्र काळ आणि पुराणकाळ असे हे चार उपखंड होत.

प्राचीन काळातील शिक्षणाची सुरुवात धर्मासाठी झाली. धर्मग्रंथ संस्कृत भाषेत असल्यामुळे ते सामान्य जनांना समजत नसत. कोणीतरी विद्वानांनी ते समजून सांगावे लागत. येथेच आचार्यांची आणि गुरूंची आवश्यकता भासली. त्याकाळात पुस्तके, धर्मग्रंथ, ग्रंथालये उपलब्ध नव्हती. ज्ञान संपादन करण्यासाठी गुरुगृही जावे लागे. शिक्षणाची सुरुवात घरीच होत असे. वाचन, लेखन, गणन वडील किंवा पंतोजी करीत. नंतर उपनयनाचा संस्कार होई व गुरुगृही विद्या संपादन करण्यासाठी जावे लागे.

**प्राचीन भारतीय समाज-**

प्राचीन काळात एकूण वातावरण धर्मावर आधारलेले होते. धर्माचे प्राबल्य असल्यामुळे समाजातील घटकांवर धर्माचा पगडा होता. विद्यार्थ्यांवर धार्मिक संस्कार मोठ्या प्रमाणावर होत असत. अभ्यासक्रमात धर्म आणि तत्त्वज्ञान या विषयांना प्राधान्य असल्यामुळे चित्तशुद्धी, इंद्रियनिग्रह, अंतर्मुखता तसेच आत्मोद्धार यांना विशेष महत्व होते. प्राचीन भारतीय शिक्षणात व्यक्तिगत आचरणावर कडक बंधने होती. शीलसंवर्धन आणि धर्माचरण ही शिक्षणाची प्रमुख कार्य होती. ज्ञानसाधनेच्या मदतीने आत्मसाक्षात्कार व्हावा आणि मोक्षप्राप्तीच्या दृष्टीने अभ्यासकाची वाटचाल व्हावी असा कटाक्ष होता. या प्रकारच्या शिक्षणात सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक दिली जात असे. राजघराण्यातील राजपुत्र आणि सामान्य घराण्यातील मुलगा यांना सारखी वागणूक दिली जाई. आश्रमात राहणाऱ्या सर्वांनाच भरपूर श्रम करावे लागत. एकमेकांना सहकार्य करावे लागे. आश्रमात श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन, सहकार्य, त्याग इत्यादी गुणांची जोपासना होई. विविध मूल्यांची जोपासना होऊन चारित्र्याची जडण-घडण होत असे. या शिक्षणात शौर्य, धैर्य, सत्यता, धर्माचरण, सदाचार, संयम, समता, बंधुभाव हे गुण अंगी बाळगणे, प्रसंगी त्यांची परीक्षा घेणे आणि त्यांचे चारित्र्य घडविणे यासाठी विशेष प्रयत्न केले जात असत. प्रत्येक व्यक्तीचे जीवन यशस्वी होण्यासाठी प्रत्येकाला चरितार्थासाठी उपयुक्त शिक्षण दिले जात असे. गुरुगृही दिल्या जाणाऱ्या शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाची तयारी होत असे. अभ्यासक्रमात चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचा समावेश असल्याने जीवनोपयोगी शिक्षण प्राप्त होई. वंशपरंपरागत चालत आलेल्या व्यवसायांचे शिक्षण पुढील पिढीला मिळत असे. त्यामुळे व्यक्ती स्वावलंबी होत आणि व्यवसायाचा स्वत:साठी आणि समाजासाठी उपयोग करीत. प्राचीन भारतीय शिक्षणात गुरूचे स्थान सर्वश्रेष्ठ होते. गुरूजनांना अत्यंत आदराने वागवीत. शिकविण्याचे कार्य अत्यंत पवित्र मानले जाई. गुरूंचा शब्द मोलाचा मानला जात असे. राजगृही आणि राजदरबारात गुरूंना फार महत्त्व दिले जाई. शिक्षणाचे पवित्र कार्य करणारे ऋषी हे केवळ शिष्यांचेच मार्गदर्शक नसत तर साऱ्या समाजाला योग्य मार्ग दाखवीत. या ऋषिमुनींचे चारित्र्य फार उच्च दर्जाचे असे. त्याकाळचा शिक्षकवर्ग बुद्धिमत्ता, विद्वत्ता, तळमळ, निष्कलंक चारित्र्य, त्याग, तपस्या अशा गुणांनी संपन्न होता. गुरूंचे व्यक्तिमत्त्व समाजात आदर्श मानले जात असे. त्याकाळच्या गुरूंनी शिष्यांचेच नव्हे तर संपूर्ण समाजाचे उन्नयन करण्याचे काम हाती घेतलेले असल्यामुळे त्यांची समाजातील प्रतिमा अतिशय उज्ज्वल होती. एकूण प्राचीन भारतीय शिक्षणाची ध्येये फारशी व्यापक नव्हती. तथापि, ती सर्वसमावेशक असून समाजाच्या विकासाला पोषक होती. आधुनिक शिक्षणाला पाया म्हणून प्राचीन शिक्षणातील चांगल्या तत्त्वांचा आधार लाभला आहे.

**गुरुकुल पद्धती-**

उपनयन संस्कारानंतर गुरुगृही राहून विद्यार्थ्यांना वेदविद्या संपादन करावी लागे. त्याकाळी छापण्याची कला ज्ञात नव्हती त्यामुळे पुस्तके उपलब्ध नसत. गुरूच्या मुखातून विद्या ग्रहण करावी लागे. पाठांतरावर खूप भर दिला जाई. विद्यार्थ्यांना म्हणजेच शिष्यांना गुरूंच्या कुटुंबात राहावे लागे. गुरूंची सेवा करावी लागे. गुरूंच्या घरची कामे करावी लागत. सर्व सुखांचा त्याग करून शिस्त अंगी बाणावी लागे, आत्मसंयमन करावे लागे, विविध व्रते आचरावी लागत. या पद्धतीत गुरु सामान्यपणे धर्मोपदेशक असत. अर्थातच, त्यामुळे धार्मिकतेवर तसेच धर्मनिष्ठतेवर फार भर दिला जाई. गुरुगृही धार्मिक आचरण असे. ते काटेकोरपणे

पाळले जाई. त्यामुळे शिष्य धर्मनिष्ठ होत, ते धर्मनिष्ठ झालेच पाहिजेत ही अपेक्षा असे. या शिष्यांना संसारत्याग करण्याची दीक्षा न देता त्यांनी उत्तम गृहस्थाश्रमी व्हावे, व्यवसायाचे शिक्षण घेऊन समाजाचा एक चांगला घटक व्हावे ही इच्छा असे. प्राचीन भारतीय शिक्षणाची ध्येये ही त्या काळातील तत्त्वज्ञानावर आधारित होती. प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाचा आधार धर्म होता. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर धर्माचा प्रभाव होता. जीवनाचे अंतिम ध्येय मोक्षप्राप्ती असल्यामुळे शिक्षणविषयक ध्येयांवरही या विचारांचा पगडा होता.

**प्राचीन भारतीय शिक्षणाची ध्येये पुढीलप्रमाणे होती**

१.चारी पुरुषार्थांची साधना आणि मोक्षप्राप्ती
२.ज्ञाना साठी ज्ञान संपादित करणे
३.शिष्यांचे चारित्र्य संवर्धन करणे
४.व्यक्तिविकासातून समाज विकास साधणे
५.भारतीय संस्कृतीचे रक्षण आणि संवर्धन करणे.

**चारी पुरुषार्थांची साधना आणि मोक्षप्राप्ती**

मानवाच्या सर्व कृती त्याच्या इच्छेतून निर्माण होत असतात. पुरुषार्थ या भारतीय संकल्पनेत चांगली जीवनपद्धती सामावली आहे. तत्त्वज्ञांनी धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे चार पुरुषार्थ सांगितले आहेत.

१. धर्म: धृ-धारयति ,धारयते म्हणजे धारण करणे. यापासून धर्म हा शब्द तयार झाला आहे. चांगले वर्तन, चांगली कृती धारण करणे; धर्म म्हणजे सदाचार होय. धर्मामुळे चांगल्या व वाईट गोष्टी आपणास समजतात. व्यक्तीस चांगली जीवनपद्धती अनुसरण्यास धर्माची मदत असते. जीवनाचे नियंत्रण करण्याचे सामर्थ्य धर्म या कल्पनेत सामावले आहे.
२. अर्थ: अर्थ म्हणजे संपत्ती, पैसा होय. ऐहिक जीवन जगण्यासाठी अर्थाचा उपयोग होतो. प्रत्येक मानवास अर्थ आवश्यक आहे कारण त्याशिवाय मानवास जगणे अशक्य होईल जेवढे आवश्यक धन असेल तेवढे मिळवावे. कष्टाने मिळवावे. अर्थ हे माणसाचे साधन असावे साधनाने साध्याची जागा घेतली की सारे बिघडून जाण्याची शक्यता असते.
३. काम: ही माणसाची एक सहजप्रवृत्ती आहे. मानवाला कामप्रवृत्तीतून तृप्ती व समाधान लाभते. संयमित कामप्रवृत्तीतून सुखी जीवनाचा लाभ होतो. काम प्रवृत्ती ऐहिक जीवनातील सुखाशी संबंधित आहे. कामप्रवृत्तीतील स्वैराचार माणसाला नेस्तनाबूत करतो.
४. मोक्ष : माणसाच्या जीवनाचा हा सर्वश्रेष्ठ हेतू आहे. मोक्ष हे त्यांचे अंतिम ध्येय आहे. मोक्ष म्हणजे परमानंद होय. हा परमानंद ध्यानधारणेतून तसेच ईश्वर भक्तीतून प्राप्त होऊ शकतो मोक्ष हे पारलौकिक मूल्य आहे. प्राचीन भारतात जीवनाचे सर्वश्रेष्ठ ध्येय आत्मसाक्षात्कार असल्यामुळे शिक्षणाचे ध्येय तेच निश्चित झाले. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीला आपल्या मूळ स्वरूपाची जाणीव व्हा हा हेतू होता. मायेच्या आवरणामुळे आपण परमेश्वराचा अंश असूनही आपणास ती जाणीव ह नाही. अविद्या म्हणजे माया. या मायेचा पडदा दूर केला की, आपणास स्वतः ची जाणीव होई सम्यक ज्ञानाचा साक्षात्कार होईल. माणसाला भौतिक बंधनांपासून मुक्त करणारी विद्या प्र झाली पाहिजे. मानवी जीव अज्ञानामुळे अपुरा आहे. शाश्वत सुखाचे सामर्थ्य शिक्षणाच्या माध्यम व्यक्तीस प्राप्त होऊ शकेल.

**ज्ञानासाठी ज्ञानप्राप्ती :**

या काळात ज्ञानाला, विद्येला विशेष महत्त्व होते. ज्ञानाच्या उपासनेतून भारतीय तत्त्वज्ञान निर्माण झाले. वेद, उपनिषदे, पुराणे, महाकाव्ये इत्यादी ग्रंथांतून ज्ञान संपादन करण्याचा प्रयत्न प्राचीन भारतातील शिक्षणातून केला जात असे. ज्ञान हा एक सद्गुण मानला जात असे. अनेक धर्मग्रंथांचा अभ्यास करावा व आपले ज्ञान वाढवावे. प्रकांड पंडित व्हावे अशा ईर्षेने ज्ञान मिळविले जात असे. भक्तियोग आणि कर्मयोगाप्रमाणे ज्ञानयोग हाही आत्मोन्नतीचा एक मार्ग असल्यामुळे ज्ञानप्राप्ती हे शिक्षणाचे महत्त्वाचे ध्येय होते. ज्ञान देणे आणि ज्ञान घेणे या दोन्ही गोष्टींना यज्ञाइतके महत्त्व दिले जाई. आत्मोन्नतीसाठी ज्ञान प्राप्त करून घेणे व ते इतरांपर्यंत पोहोचविणे हे त्याकाळी परमकर्तव्य मानले जाई.अध्यात्माविषयीचे ज्ञान शाश्वत आणि चिरंतन होय. ब्रह्मज्ञानाची प्राप्ती करून मोक्षप्राप्ती करून घेण्याचा प्रयत्न या ज्ञानसाधनेतून केला जात असे. ज्ञानासारखी दुसरी पवित्र वस्तू कोणतीही नाही. आत्मविद्या सोडून अन्य विद्यांना अविद्या मानले जाई. आत्मविद्येचे स्वानुभवावर आधारलेले ज्ञान खरे ज्ञान मानण्यात येई. अशा प्रकारे प्राचीन भारतातील शिक्षणविषयक ध्येयात ज्ञान संपादनाला विशेष महत्त्व दिले जात असे.

चारित्र्यसंवर्धन : प्राचीन काळातील शिक्षणविषयक कल्पनांत केवळ पंडित होणे, ज्ञानी होणे किंवा विद्वान होणे एवढाच अर्थ अभिप्रेत नव्हता. नुसत्या शब्दज्ञानाला महत्त्व दिले जात नसे. तर नैतिक वागणूक, सदाचार, सद्गुण यांना विशेष प्रकारचे महत्त्व असे. धर्मानुसार आचरण करणाऱ्या चारित्र्यसंपन्न असणाऱ्या व्यक्तीस विशेष मान दिला जाई. नैतिक मूल्ये रुजविणे आणि त्यांना चारित्र्यसंपन्न करणे हे शिक्षणाचे ध्येय होते.उपनयन संस्कारानंतर छात्र गुरुगृही अध्ययनासाठी जात. गुरूच्या आश्रमात त्यांना नियमांचे काटेकोरपणे पालन करावे लागे. शिष्यांना स्वतःची कामे स्वतः करावी लागत. गुरूचीही कामे शिष्यांना करावी लागत. त्यामुळे स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा शिष्यांच्या अंगी निर्माण होत असे. गुरुकुलात शरीर, बुद्धी आणि मन या तिन्हींचा समतोल विकास साधला जात असे. त्यातून चारित्र्याची जडण-घडण होई. चारित्र्य जडण-घडणीत सदाचार, सद्विचार, सत्य, त्याग, प्रेम, दया, संयम, क्षमा इत्यादी गुणांचा समावेश होतो.

प्राचीन काळात शिक्षण देत असताना शिष्याची, विद्यार्थ्यांची नीतिमत्ता आणि सद्भावना विकसित केली जाई. इंद्रियनिग्रहाकडे कटाक्षाने लक्ष पुरविले जाई. गुरूच्या सान्निध्यात शिष्याला राहावे लागल्यामुळे गुरूच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा शिष्यांच्या मनावर उमटत असे. गुरूच्या आश्रमातील वातावरण चांगले असल्यामुळे त्या वातावरणाचाही एक चांगला संस्कार शिष्याच्या मनावर होई.

**व्यक्तिविकासातून समाजविकास-**

प्राचीन भारतातील शिक्षणव्यवस्थेत व्यक्तीच्या विकासाबरोबर सुस्थित, समृद्ध आणि गतिशील असणाऱ्या समाजाच्या विकासाचा विचार केलेला दिसून येतो. व्यक्तीच्या विकासातही केवळ आत्मिक विकासावर भर दिलेला नाही. अध्यात्मिक विकासाबरोबरच पुरुषार्थसाधना, आश्रमव्यवस्था, समाजातील घटकांविषयी कर्तव्य, निष्काम कर्मयोगी यांनाही महत्त्व दिलेले दिसून येते. एका चांगल्या समाजाची निर्मिती करणे हाच त्यामागील हेतू आहे.

पुरुषार्थसाधनेसाठी अस्तित्वात आलेली आश्रमव्यवस्था समाजविकासास पोषक राहीलअशी दक्षता घेतलेली दिसून येते. ब्रह्मचर्य आश्रमात ज्ञानग्रहणाबरोबर व्यक्तीचा विकास साधण्यावर भर दिला जाई. प्रत्येक शिष्य ज्ञानी व चारित्र्यसंपन्न कसा होईल हे पाहिले जाई. त्याने संपादित केलेले ज्ञान तसेच विविध क्षमता समाजहितासाठी कशा उपयोगात आणता येतील हे पाहिले जाई. गृहस्थाश्रमातसुद्धा समाजाच्या विकासासाठी व्यक्तीने आपले जीवन अर्पित करावे अशी अपेक्षा होती. वानप्रस्थाश्रमात जाणे म्हणजे नव्या पिढीसाठी जागा रिकामी करून देणे. नव्या पिढीतील व्यक्तींना मार्गदर्शन करून समाजहित साधण्याची कल्पना त्यात अंतर्भूत होती. संन्यास घेणाऱ्या व्यक्तीनेही शेवटी नामस्मरण करीत मुक्तपणे जीवन घालवावे. तत्वज्ञानाचा आधार घ्यावा अशी अपेक्षा होती.देवऋण, पितृऋण,ऋषिऋण या ऋणांतून मुक्त होण्याचा मार्ग प्राचीन काळातील शिक्षणात सांगितला आहे. वेदविद्येचा अभ्यास करून ऋषिऋणातून प्रजोत्पादन करून पितृऋणातून व धार्मिक कृत्ये करून देवऋणातून मुक्त होता येते. अशा प्रकारे व्यक्तिविकासातून सामाजिक कर्तव्यपालनाची पर्यायाने समाजविकासाची व्यवस्था प्राचीन भारतीय शिक्षणपद्धतीत केलेली दिसून येते.

व्यावसायिक शिक्षण स्वतंत्रपणे देण्याची व्यवस्था त्यावेळच्या शिक्षणप्रणालीत नसली तरी परंपरेने चालत आलेले शिक्षण, व्यावसायिक शिक्षण पुढील पिढीस मिळत असे, त्या व्यवसायाचा त्या व्यक्तीस स्वतःसाठी तसेच समाजासाठी उपयोग करता येत असे. समाजाच्या रक्षणासाठी, संवर्धनासाठी व विकासासाठी वेदविद्या, क्षात्रविद्या, शेती, व्यापार व अन्य व्यवसायांचा उपयोग केला जात असे.

**भारतीय संस्कृतीचे जतन, रक्षण आणि संवर्धन:-**

प्रत्येक पिढी काही परंपरा, मूल्ये आचार-विचार, कला यांचे जतन करीत असते. या जोपासनेतून संस्कृतीचा उदय होतो. भारतिय संस्कृती ही अशीच प्रदीर्घ परंपरा असलेली संस्कृती आहे. भारतीय संस्कृतीला वैदिक वाङ्ममयाची व श्रेष्ठ तत्त्वज्ञानाची बैठक आहे. अशा या भव्य, उदात्त, सर्वसमावेशक भारतीय संस्कृतीचा वारसा पुढील पिढीला देण्याच्या विचारातून हे ध्येय निश्चित झाले. प्राचीन काळापासून संस्कृतिचे जतन, रक्षण आणि संवर्धन करण्याचे ध्येय ठरविण्यात आले.

**समारोप -**

एकूण प्राचीन भारतीय शिक्षणाची ध्येये धर्मधिष्ठित व तत्त्वज्ञानप्रधान होती. धार्मिक आचरण, शुद्ध चारित्र्य तसेच संयम इत्यादी वृत्तींच्या विकासावर त्यात अधिक भर दिला होता भारतीय जीवनविषयक ध्येये आणि शिक्षणविषयक ध्येये परस्परावलंबी व परस्परपूरक होती.

**संदर्भ पुस्तके**

1. प्राचीन भारतीय शिक्षणपद्धती- अकोलकर ग. वि.
2. भारतीय शिक्षणप्रणालीचा विकास- प्रा.प्रीती पाटील
3. उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण-डॉ. सुरेश करंदीकर

# स्वातंत्र्यपूर्व भारतातील शिक्षक शिक्षण

**श्री. डॉ . गोपाळ रामराव पवार**
प्राचार्य,
स्वामी विवेकानंद शिक्षण महाविद्यालय, उदगीर., जि. लातूर (महाराष्ट्र राज्य)

**गोषवारा:-**

*देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी, स्वातंत्र्यपूर्व भारतातही अध्यापन हा श्रेष्ठ व्यवसाय मानला जात होता. शिक्षक शिक्षण प्रणाली ही देशातील सर्वात मोठी मानली जाते. शिक्षकांना समाजात आदर आणि आदर होता. त्यांच्या निवडीची नोकरी कर्तव्ये अत्यंत परिश्रमपूर्वक आणि साधनसंपत्तीने अंमलात आणली गेली. हे सुनिश्चित केले गेले की त्यांच्याकडे आवश्यक पात्रता आहे आणि ते इच्छित उद्दिष्टे पूर्ण करण्यास सक्षम असतील. स्वातंत्र्यपूर्व भारतात शिक्षक शिक्षणाच्या क्षेत्राला मान्यता देण्यात आली होती. असे मानले जात होते की जेव्हा शिक्षकांकडे पुरेशी कौशल्ये आणि क्षमता असतील, तेव्हाच ते विद्यार्थ्यांना समाधानकारक ज्ञान देऊ शकतील आणि समाजाच्या कल्याणाला चालना देऊ शकतील. या शोधनिबंधात प्रामुख्याने विचारात घेतलेल्या क्षेत्रांमध्ये भारतातील शिक्षक शिक्षणाचा इतिहास, स्वातंत्र्यपूर्व भारतातील शिक्षकांची तयारी, उपनिषद कालखंड, बौद्ध काळ, मध्ययुगीन काळ आणि आधुनिक कालखंड यांचा समावेश होतो.*

***कीवर्ड:-** अभ्यासक्रम, निर्देशात्मक धोरणे, ज्ञान, व्यवसाय, शिक्षक शिक्षण.*

**प्रस्तावना:-**

अध्यापन हा केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील इतर देशांमध्येही सर्वात जुना आणि प्रतिष्ठित व्यवसाय म्हणून ओळखला जातो. जरी वेळोवेळी शिक्षण पद्धतीत बदल आणि परिवर्तन झाले. भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात प्रचलित असलेली शिक्षणपद्धती सध्याच्या काळापेक्षा वेगळी आहे. जे बदल झाले आहेत ते मुख्यत्वे नियम, धोरणे, अध्यापन-अध्यापन प्रक्रिया, शिकवण्यासंबंधी धोरणे, शाळा आणि वर्गातील पर्यावरणीय परिस्थिती आणि विद्यार्थी आणि शिक्षक तसेच विद्यार्थी यांच्यातील अटी आणि नातेसंबंध यांच्या संदर्भात आहेत. भारतातील शिक्षक शिक्षणाचा इतिहास हा शिक्षणाच्या इतिहासाइतकाच जुना आहे. भारतामध्ये जगातील सर्वात मोठी शिक्षक शिक्षण प्रणाली आहे. देशातील शिक्षकांचे शिक्षण 2500 ईसवीसनपूर्व जन्मलेले मानले जाते.

हिंदू संस्कृतीच्या प्रारंभी, अध्यापन मुख्यतः वेदांचे ज्ञान देण्यावर केंद्रित होते. हिंदू समाजातील चार वर्गांपैकी ब्राह्मण समाजाचे शिक्षक म्हणून काम केले. त्यांनी समाजाच्या कल्याणासाठी स्वतःला झोकून दिले. व्यक्तींमध्ये ज्ञान संपादन, संवर्धन आणि संवर्धन हे ब्राह्मणांचे प्रमुख कर्तव्य मानले जात असे. स्वातंत्र्यपूर्व भारतात, शिक्षकांना विशेष दर्जा आणि स्थान देण्यात आले होते आणि त्यांना उच्च सन्मान दिला जात होता. शिक्षकांची निवड आणि तयारी ही कार्ये खूप महत्त्वाची मानली गेली आणि ती परिश्रमपूर्वक राबवली गेली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष दिले. दुसरीकडे, विद्यार्थ्यांनीही शिक्षकांबद्दल आदर आणि आदर व्यक्त केला. शिक्षकांना काही वेळा त्यांच्या कामात सक्षम विद्यार्थ्यांनी मदत केली होती, जे मॉनिटर म्हणून काम करत होते. ही पद्धत विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या पदावर आणण्याची पद्धत होती. ही प्रणाली प्राचीन शिक्षण पद्धतीचे योगदान होते.

**भारतातील शिक्षक शिक्षणाचा इतिहास:-**

प्राचीन शिक्षण पद्धतीपासून सध्याच्या शिक्षणपद्धतीपर्यंत शिक्षक शिक्षण कार्यक्रमात बदल आणि परिवर्तने सुरू होतात. समाजाच्या स्थानिक आणि जागतिक गरजांनुसार ते आकार आणि विकास घडवू लागते. भारतातील शिक्षक शिक्षणाच्या इतिहासाचे दोन भागात वर्गीकरण करता येईल. पहिला भाग स्वातंत्र्यपूर्व भारतातील शिक्षकांच्या शिक्षणाशी संबंधित आहे, जो देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंतच्या प्राचीन शिक्षण पद्धतीपासून सुरू होतो.

दुसरा भाग स्वतंत्र भारतातील शिक्षक शिक्षणाशी संबंधित आहे, म्हणजे देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाची प्रगती ही शिक्षकांकडे असलेली कौशल्ये आणि क्षमतांवर अवलंबून असते. ते असे आहेत, जे केवळ व्यक्तीच नव्हे तर समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी अतुलनीय योगदान देतात. या कारणास्तव, अध्यापन हे सर्व व्यवसायांचे तत्त्व मानले जाते.

शिक्षक शिक्षणाचा इतिहास व्यक्तींना दृष्टीकोन आणि दृष्टीकोन संप्रेषित करतो की त्यात सर्व औपचारिक आणि अनौपचारिक क्रियाकलाप आणि अनुभवांचा समावेश आहे ज्यामुळे व्यक्तींना शैक्षणिक संस्थांमध्ये जबाबदार्या अत्यंत प्रभावीपणे स्वीकारण्यात मदत होईल. या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्ती त्यांची कौशल्ये आणि क्षमता अशा रीतीने विकसित करू

शकतात की ते त्यांची नोकरीची कर्तव्ये सुसंघटित पद्धतीने पार पाडू शकतील. शिक्षक शिक्षणाचा इतिहास प्राचीन काळापासून ज्ञात आहे, जिथे गुरूंना गुरू मानले जात होते आणि शिक्षण घेत असताना शिष्य गुरूंच्या घरी राहत होते. गुरूंनी शिष्यांना स्वतःच्या मुलांप्रमाणे वागवले आणि त्यांची काळजी घेतली

त्यांच्या गरजा आणि गरजा. दुसरीकडे, शिष्यांनीही गुरूंना त्यांच्या वडिलांप्रमाणे आदर दाखवला आणि गुरुकुलाच्या म्हणजेच शाळेच्या सर्व सूचनांचे पालन केले.

**स्वातंत्र्यपूर्व भारतातील शिक्षकांची तयारी:-**

प्राचीन भारतात, शिक्षण हे प्रामुख्याने वेदांवर आधारित होते, म्हणजे ऋग्, यजुर, साम आणि अर्थर्व आणि वेदांग, म्हणजे शिक्षा, चंद, व्याकर्ण, निरुक्त, कल्प आणि ज्योतिष. प्राचीन काळात योग्य शिक्षणसंस्था स्थापन झाल्या नसून, गुरुकुल पद्धतीचा प्रसार होता. गुरुकुल पद्धतीत, गुरु आणि शिष्य यांच्यातील नातेसंबंधावर अधिक भर दिला गेला. शिक्षणाचे आणखी एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे वैयक्तिक शिक्षण पद्धती.

धार्मिक शिक्षणावर सर्वाधिक भर दिला गेला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान आणि कौशल्यांचे प्रशिक्षण दिले नाही तर त्यांना नैतिकता आणि नैतिकतेचे प्रशिक्षण दिले. वास्तविक जीवनात शिक्षणाची तरतूद करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना पुरेसे प्रशिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी सराव, तोंडी स्पष्टीकरण दिले.

संकल्पनांवर प्रभुत्व मिळविण्यासाठी, विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवण्याच्या तंत्राचा वापर केला. त्यांना शिक्षकांनी दिलेल्या संकल्पना आणि पाठ योजना समजल्या आणि नंतर त्या पुरेशा लक्षात ठेवल्या.

शिक्षकांची तयारी ही मुख्यत्वे शिकवण्याच्या पद्धती आणि त्यांच्याद्वारे आचरणात आणलेल्या शिकवण्याच्या धोरणांवर आधारित होती. मौखिक स्पष्टीकरण हे प्रमुख क्षेत्रांपैकी एक होते ज्यावर जोर देण्यात आला होता, परंतु या पद्धतीशिवाय, इतर पद्धती देखील होत्या ज्या शिक्षकांनी वापरल्या होत्या. इतर पद्धती ज्या व्यवहारात आणल्या गेल्या त्या म्हणजे चर्चा, वादविवाद, कथा इत्यादी.

सत्कर्मांच्या कामगिरीवर आणि कोणाचेही नुकसान न करणे यावर महत्त्व ठेवण्यात आले. शिक्षकांनी शिष्यांना कथा सांगितल्या जेणेकरून ते संकल्पना पुरेशा प्रमाणात शिकू शकतील. काही प्रकरणांमध्ये शिष्य शिकवण्यात गुंतले आणि त्यांनी पुढे त्यांच्या शिक्षकांनी शिकवलेल्या पद्धतींचा अवलंब केला. अध्यापन कौशल्ये शिकण्यासाठी ज्या इतर तंत्रांचा सराव केला गेला ते अनुकरण आणि पुनरावृत्ती होते. या पद्धतींमुळे विद्वानांचे शिक्षकांमध्ये रूपांतर होण्यास मदत झाली.

शिक्षकांच्या अनुपस्थितीत, सामान्यत: कुशाग्र आणि बुद्धिमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांना वर्गाला शिकवण्यासाठी कर्तव्ये सोपवली गेली. त्यामुळे शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांना शिकवण्याचे कौशल्य विकसित करता आले. जेव्हा शिक्षकांचा विद्यार्थ्यांबद्दल असा दृष्टिकोन असतो की ते कुशाग्र, तेजस्वी आणि बौद्धिक आहेत, तेव्हा ते पुढील धड्याच्या योजनांवर प्रभुत्व मिळवतात आणि स्वत: ला तयार करतात. मग ते या विद्यार्थ्यांवर त्यांच्या अनुपस्थितीत वर्ग घेण्यावर पूर्ण विश्वास ठेवतात. या उद्देशासाठी, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड, एकाग्रता आणि प्रेरणा विकसित करणे आवश्यक आहे. गुरुकुलमध्ये, विद्यार्थ्यांनी शैक्षणिक ज्ञानाव्यतिरिक्त इतर क्षेत्रांचेही प्रशिक्षण घेतले, ज्यात घरगुती जबाबदाऱ्यांचे व्यवस्थापन, पशुधनाचे संगोपन, जंगलातून लाकूड आणणे इत्यादींचा समावेश होतो.

विद्यार्थ्यांनी त्यांचे जेवणही शिक्षकांच्या घरीच मिळवले, त्यामुळे त्यांना जेवण तयार करण्यातही मदत करणे आवश्यक होते. या पद्धतीने शिष्यांनी धार्मिक शिक्षण, नैतिकता आणि नैतिकता, घरगुती जबाबदाऱ्यांचे व्यवस्थापन, पर्यावरणाचे रक्षण, आरोग्य सेवांच्या गरजांची काळजी घेणे आणि इतर शैक्षणिक संकल्पनांचे संपूर्ण प्रशिक्षण घेतले.

**उपनिषद कालखंड:-**

उपनिषद काळात, गुरु किंवा शिक्षक हे चांगल्या गुणांचे मूर्त स्वरूप, ज्ञानाचा झरा आणि अध्यात्माचे निवासस्थान होते. शिक्षकांची निवड आणि तयारी यासाठी साधनसंपत्ती आणि कल्पकता या गुणांची गरज होती.

ऋग्वेदानुसार, शिक्षकाची निवड केली गेली आणि नंतर त्याला कार्यक्षमतेने शिक्षण आणि प्रशिक्षित केले गेले. शिक्षकांना अभ्यासक्रमाच्या दृष्टीने ज्ञान असणे आवश्यक होते. त्यांचा समाजात मोठ्या प्रमाणात आदर आणि कौतुक होत असे. उपनिषद काळातील अध्यापन हे शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडे दिलेले वैयक्तिक लक्ष म्हणून ओळखले जात असे. या काळात शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले. विद्यार्थ्याला स्वीकारण्याचे स्वातंत्र्य शिक्षकावर आहे आणि एकदा तो स्वीकारल्यानंतर त्याचे शिक्षण आणि शिक्षण समाधानकारक रीतीने होईल याची खात्री करणे हे शिक्षकाचे नैतिक कर्तव्य बनले. विद्यार्थ्याला त्याच्या शिक्षकाची निवड करण्याचे स्वातंत्र्य देखील होते.

ISSN 2349-638X www.aiirjournal.com

या काळात, ज्ञान तोंडी दिले जात असे, कारण लेखन नंतरच्या टप्प्यावर विकसित झाले. स्पष्टीकरण ही एक महत्त्वाची अध्यापन पद्धती मानली गेली. शिक्षकांनी वापरलेल्या शिकवण्याच्या पद्धती शिष्यांनी अंगिकारल्या आणि शिक्षकांच्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सुपूर्द केल्या. सुयोग्य शिक्षकांनी स्वतःच्या पद्धती तयार केल्या आणि उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना विषयाचे ज्ञान अर्थपूर्ण केले. ऐकणे, अर्थाचे आकलन, सामान्यीकरणाकडे नेणारे तर्क, मित्र किंवा शिक्षकाकडून पुष्टीकरण आणि अर्ज या पाच पायऱ्या होत्या ज्या प्राचीन भारतात प्रचलित असलेल्या धार्मिक सत्याचा अर्थ ओळखण्यासाठी अंमलात आणल्या गेल्या होत्या.

**बौद्ध कालखंड:-**

या काळात शिक्षकांच्या भूमिकेत बदल झाला. ज्ञान आणि विविध विषयांच्या विकासामुळे शिक्षकांना त्यांचे ज्ञान वाढवता आले. शिक्षकांना ज्ञानाच्या विविध शाखांमध्ये प्राविण्य प्राप्त करणे आवश्यक होते. धार्मिक शिक्षणावर भर देण्यात आला होता, परंतु धार्मिक शिक्षणाव्यतिरिक्त, धर्मनिरपेक्ष विषय देखील महत्त्वाचे मानले जात होते. बौद्ध काळात उच्च शिक्षणाची केंद्रे तक्षशिला आणि नालंदा होती. या काळात शिक्षकांच्या ताणाची औपचारिक पद्धत उदयास आली. या काळात शिक्षक शिक्षणाचे महत्त्व विस्तारू लागले.

बौद्ध धर्माचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असलेल्या मठप्रणालीसाठी प्रत्येक नवशिक्याने स्वत:ला गुरू (उपजय) च्या देखरेखीखाली आणि मार्गदर्शनाखाली ठेवणे आवश्यक होते. शिष्य अतिशय काळजीपूर्वक उपाज्जयाची निवड करायचा आणि त्याला अत्यंत आदर दाखवायचा. उपाज्जयाला नवशिक्या, सद्धिविहारिका यांच्याकडे त्याच्या जबाबदाऱ्या पार पाडणे आवश्यक होते. त्याला आध्यात्मिक मदत द्यावी लागेल आणि शिष्यांमध्ये धर्माद्वारे शिक्षणाचा प्रसार करावा लागेल. ज्या पद्धतींचा सराव करण्यात आला त्यात शिकवणे, प्रश्न मांडणे, सूचना आणि उपदेश यांचा समावेश होतो. शिक्षकांनी शिष्यांच्या गरजा काळजीपूर्वक पहायच्या होत्या. मौखिक पठण, प्रदर्शन, वादविवाद, चर्चा, प्रश्न-उत्तर, कथा आणि बोधकथा यांचा समावेश असलेल्या शिकवण्याच्या पद्धतींचा समावेश होता. विहार आणि मठशाळांमध्ये हेतू-विद्या किंवा प्रेरक पद्धतीचा अवलंब केला गेला आणि त्यातून शिष्यांच्या बुद्धीला प्रशिक्षित केले गेले. बुद्धिमत्तेचा आणि वक्तृत्वाचा गौरव करण्यात मदत करणारा एक विषय म्हणून तर्कशास्त्राचा परिचय देण्यात आला.

**मध्ययुगीन कालखंड:-**

मुस्लीम देशांत शिक्षणाला मोठा मान दिला जात असे. शिक्षकी पेशाशी निगडित व्यक्तींना सन्मान देण्यात आला. मुस्लिम शासकांनी त्यांच्या अधिपत्यामध्ये शाळा (मक्तब) आणि मदरसे (महाविद्यालये) आणि ग्रंथालयांची स्थापना केली. मक्तबमध्ये विद्यार्थ्यांना कुराणातील सूचना देण्यात आल्या, ज्याचे त्यांना पाठ करायचे होते आणि वाचन, लेखन आणि अंकगणित देखील शिकवले जात होते. शिक्षणाचे माध्यम फारसी होते, परंतु अरबी भाषेचा अभ्यास अनिवार्य मानला जात असे. मदरशांमध्ये व्याकरण, वक्तृत्वशास्त्र, धर्मशास्त्र, तर्कशास्त्र, तत्वमीमांसा, साहित्य, न्यायशास्त्र आणि विज्ञान या विषयांचा समावेश होतो. मदरशांमध्ये विद्वान लोक शिक्षक म्हणून कामाला लागले. शिक्षकांच्या तयारीची पद्धत ही मुख्यतः जुन्या शिक्षकांच्या सरावाची दीक्षा मानली जात असे. काही प्रकरणांमध्ये, शिक्षकांनी त्यांच्या अनुपस्थितीत कुशाग्र आणि बुद्धिमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांना शिकवण्याची जबाबदारी दिली. शिक्षकांना केवळ त्यांच्या विद्यार्थ्यांकडूनच नव्हे, तर समाजातील इतर सदस्यांनीही आदर दिला होता. धड्याच्या योजना आणि संकल्पना लक्षात ठेवणे ही सर्वात प्रचलित शिकवण्याच्या पद्धतींपैकी एक होती जी वापरली जात होती. शिक्षकांनी मौखिकपणे विद्यार्थ्यांना ज्ञान आणि संकल्पना समजून घेण्याची तरतूद केली. व्याख्यान पद्धत बहुतेक अवलंबली गेली. विद्यार्थ्यांना त्यांचे ज्ञान आणि क्षमता वाढवण्याच्या मुख्य उद्देशाने पुस्तके वाचण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. विज्ञान विषयात किंवा वैद्यकशास्त्रात प्रात्यक्षिक चाचण्या आणि असाइनमेंटचे आयोजन होते. धर्म, तर्कशास्त्र, तत्वज्ञान आणि राजकारण यांसारखे विषय शिकवण्यासाठी विश्लेषणात्मक आणि प्रेरक पद्धती वापरण्यात आल्या.

शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी आणि तयारीसाठी, कोणताही विशेष शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम नव्हता, परंतु शिक्षकांना त्यांच्या नोकरीची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या आणि अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या अध्यापन पद्धतींबद्दल चांगली माहिती होती.

**आधुनिक कालखंड:-**

ब्रिटीश राज्यकर्ते भारतात येण्यापूर्वी युरोपियन धर्मप्रचारकांनी प्रथम विद्वान आणि नंतर शिक्षक प्रशिक्षण संस्था स्थापन केल्या. डॅनिश मिशनऱ्यांनी कलकत्त्याजवळ सेरामपूर येथे शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी शाळा स्थापन केली. मद्रासमध्ये, डॉ. अँड्र्यू बेल यांनी मॉनिटरीअल सिस्टीमच्या प्रयोगाची सुरुवात केली, ज्याने शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचा आधार बनवला. हे इंग्लंडमध्ये वापरले गेले आणि बेल-लँकेस्टर प्रणाली म्हणून ओळखले जात असे. सर मुनरो यांनी १३ डिसेंबर १८२३ रोजी आपल्या कार्यकाळात शिक्षकांच्या शिक्षणासाठी काही कल्पना दिल्या. त्यांनी भत्त्यात वाढ आणि हिंदू आणि मुस्लिम

शिक्षकांसाठी वेगवेगळे अभ्यासक्रम सुरू करण्याची सूचना केली. जून १८२६ मध्ये मद्रासमध्ये इंग्रज सरकारच्या व्यवस्थापन आणि अर्थसाहाय्याखाली पहिली सामान्य शाळा स्थापन झाली. सुरुवातीला त्यांनी जिल्ह्यातील शाळांसाठी शिक्षक तयार केले. पुढे ही सामान्य शाळा प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये विकसित झाली. १८४७ मध्ये, बॉम्बेने एल्फिन्स्टन संस्थेत एक सामान्य शाळा सुरू केली आणि १८४९ मध्ये, कलकत्ता येथेही एक सामान्य शाळा सुरू झाली.

**वुड्स डिस्पॅच, १८५४:-**

वुड्सचा खलिता [The Wood's Despatch] हा एक महत्त्वाचा शैक्षणिक दस्तऐवज आहे. जो १९ जुलै १८५४ रोजी प्रसिद्ध झाला होता. हा भारतातील इंग्रजी शिक्षणावरील सर्वात महत्त्वाचा दस्तऐवज मानला जातो. त्यात शिक्षकांच्या शिक्षणाला उद्देशून अर्थपूर्ण सूचनांची तरतूद करण्यात आली आहे. शिकवण्याची निवड करणाऱ्या व्यक्तींना व्यवसाय भत्ते देण्यात यावेत, असे सुचवले आहे

शिक्षकांच्या शिक्षणात बदल सुचवताना, डिस्पॅचने इंग्लंडमध्ये प्रचलित असलेल्या प्रणालीचा संदर्भ दिला. त्यात भारतातील प्रत्येक प्रेसिडेन्सीमध्ये प्रशिक्षण शाळा स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यात विद्यार्थी-शिक्षक प्रणाली सुरू करणे, आणि विद्यार्थी शिक्षकांना पुरस्कार किंवा स्टायपेंड आणि ते संलग्न असलेल्या शाळांच्या मास्टर्सना अल्प मोबदला देण्याचे सुचवले.

**लॉर्ड स्टॅनली डिस्पॅच, १८५९:-**

१८५९ मध्ये, लॉर्ड स्टॅन्ले, भारताचे राज्य सचिव, त्यांच्या डिस्पॅचमध्ये, १८५४ डिस्पॅचच्या ऑपरेशनची तपासणी केली. डिस्पॅचने स्पष्टपणे नमूद केले की प्रशासनाने इंग्लंडमधून शिक्षक मिळविण्यापासून दूर राहावे. भारतातील शाळांमध्ये ज्या शिक्षकांची नियुक्ती केली जाते, त्यांची राष्ट्रीय स्तरावर भरती करण्यात यावी.

**भारतीय शिक्षण आयोग, १८८२:-**

भारतीय शिक्षण आयोग, १८८२ ने शिफारशी केली की अध्यापनाची तत्त्वे आणि सराव मध्ये परीक्षा सुरू करावी. शिक्षकांना शाळांमध्ये कायमस्वरूपी नोकरीवर ठेवावे, मग ते सरकारी असोत किंवा अनुदानित. पदवीधरांसाठी, इतरांच्या तुलनेत प्रशिक्षणाचा लहान अभ्यासक्रम सुचवला. अध्यापनशास्त्रीय अभ्यासक्रमांची ओळख अधिक ठळक झाली. त्यामुळे अधिक शिक्षक प्रशिक्षण संस्था सुरू झाल्या. १८८२ पर्यंत पुरुषांसाठी ११६ आणि महिलांसाठी १५ संस्था होत्या. १९ व्या शतकाच्या अखेरीस शिक्षक प्रशिक्षणातील काही आवश्यक बाबी प्रस्थापित झाल्या. सामान्य शिक्षणाची जागा अध्यापनशास्त्रीय अभ्यासक्रमांनी घेतली. शिक्षक प्रशिक्षणाच्या बाबतीत परीक्षा आणि प्रमाणपत्रांचा परिचय होता. याव्यतिरिक्त, नियोजन आणि अध्यापनाच्या बाबतीत व्यावहारिक पैलूंवर भर देण्यात आला होता.

**शिक्षण धोरणावर भारत सरकारचा ठराव, १९०४:-**

हा सर्वात महत्त्वाचे शैक्षणिक दस्तऐवज आहे, जे भविष्यातील शिक्षण प्रणालीच्या धोरणांवर जोर देते. शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांच्या सुधारणेसाठी केलेल्या महत्त्वपूर्ण सूचना पुढीलप्रमाणे नमूद केल्या आहेत. **शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालये:-** ठरावात असे नमूद करण्यात आले की, माध्यमिक शिक्षणात सुधारणा करायची असेल तर शिक्षकांना अध्यापनाची कला प्रशिक्षित करणे आवश्यक आहे. मद्रास, कुर्सियांग, अलाहाबाद, लाहोर आणि जब्लेपूर या शहरांमध्ये पाच शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालये होती. इंटरमिजिएट किंवा पदवीधर या महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेऊ शकतात. या प्रशिक्षण संस्थांनी विकसित केलेली सामान्य तत्त्वे म्हणजे उच्च प्रशिक्षणाच्या कामात अधिकाधिक क्षमता आणि अनुभव असलेल्या पुरुषांची नोंद करणे, प्रशिक्षण महाविद्यालये व्यक्तींच्या गरजा आणि गरजा पूर्ण करण्यासाठी सुसज्ज करणे आणि प्रशिक्षणाचा कालावधी वाढवणे. कार्यक्रम दोन वर्षे आणि पदवीधरांसाठी एक वर्ष. कार्यक्रमात ज्ञान आणि तत्त्वांचा समावेश असावा, जे शिकवण्याच्या कलेवर भर देतात आणि कलेमध्ये काही प्रमाणात व्यावहारिक कौशल्ये वापरणे आवश्यक आहे. अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर, विद्यार्थ्याला पदवी किंवा डिप्लोमा दिला जाईल. सिद्धांत आणि सराव यांचा जवळचा संबंध असावा. प्रॅक्टिसिंग स्कूल प्रत्येक कॉलेजला संलग्न करणे आवश्यक आहे. या शाळांमध्ये उत्तम प्रशिक्षित आणि दर्जेदार शिक्षक असणे आवश्यक आहे. शिक्षकांव्यतिरिक्त, शैक्षणिक संस्था आणि प्रशिक्षण केंद्रांनी ग्रंथालये, पायाभूत सुविधा आणि इतर सुविधांची तरतूद करणे आवश्यक आहे ज्यामुळे व्यक्तींना शिक्षण घेण्यास मदत होईल.

**प्रशिक्षण शाळा:-**

ठरावात अधिक प्रशिक्षण शाळा, विशेषत: बंगालमध्ये सुरू करण्याची शिफारस करण्यात आली. सामान्य शाळांना बोर्डिंग स्कूल मानले जात असे, जेथे विद्यार्थी स्थानिक शिक्षणासाठी येत असत आणि त्यांना स्टायपेंड दिले जात असे. त्यांना अध्यापन आणि शिकवण्याच्या पद्धतींचे शिक्षण मिळाले आणि त्यांना शिकवण्याचा सराव दिला गेला. प्रशिक्षण कार्यक्रमाचा कालावधी दोन वर्षांचा होता. ग्रामीण शाळांमध्ये कार्यरत शिक्षक हेच होते, ज्यांना मुख्यत्वे या संस्थांमध्ये प्रशिक्षण दिले जात होते,

जेणेकरून ते त्यांचे कर्तव्य उत्तम प्रकारे पार पाडू शकतील. ठरावात दिलेल्या शिफारसी आणि सूचना महत्त्वपूर्ण होत्या. त्यांपैकी काहींची अंमलबजावणी झाली नसली तरी इतरांप्रमाणेच कुठे होती. या ठरावाने बदल घडवून आणले आणि ते अभ्यासक्रमात, सुविधांमधील सुधारणा आणि इतर गोष्टींमध्ये चित्रित करण्यात आले.

**भारत सरकारचा शैक्षणिक धोरणाचा ठराव, १९१३:-**

भारत सरकारच्या शैक्षणिक धोरणावरील ठराव, १९१३ मध्ये प्रणालीमधील मर्यादांवर लक्ष केंद्रित केले गेले आणि प्राथमिक शिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी उपयुक्त उपाय सुचवले. त्यात मुलांच्या वर्गातून शिक्षक काढावेत, असे सुचवले. अध्यापनाच्या नोकऱ्या मिळविण्यासाठी, शिक्षकांनी मध्यम स्थानिक भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आणि प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. त्यात नियतकालिक पुनरावृत्ती आणि बदल आणि सुधारणा घडवून आणण्यावर भर देणारे अभ्यासक्रम सुचवले. प्रमाणपत्राशिवाय शिक्षकांना शिकवू देऊ नये. कर्मचाऱ्यांनी चर्चेत सहभागी व्हावे. एकमेकांसोबत आणि त्यांचे ज्ञान वाढवण्यासाठी इतर महाविद्यालये आणि संस्थांनाही भेटी देतात.

**कलकत्ता विद्यापीठ आयोग, १९१७:-**

हा आयोग सॅडलर कमिशन म्हणून ओळखला जातो. या संस्थेने विद्यापीठीय शिक्षणाच्या सर्व पैलूंचा अभ्यास व संशोधन करून १९१९ मध्ये एक अहवाल सादर केला. त्यात शिक्षक शिक्षण कार्यक्रमही विचारात घेऊन काही शिफारसी केल्या. अधोरेखित केलेले मुख्य क्षेत्र हे होते की, शिक्षक प्रशिक्षण संस्था अपुऱ्या आहेत आणि त्यामध्ये दिले जाणारे प्रशिक्षण दर्जेदार नाही. प्रशिक्षण कार्यक्रम हा केवळ शिक्षकांची कौशल्ये आणि क्षमता वाढवण्यासाठी नसून त्यांना सक्षम प्रशासक बनवण्यासाठी आहे, असे सुचवण्यात आले. आयोगाने विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर शिक्षण विभाग सुरू करण्याची सूचना केली आणि प्रत्येक विभागामध्ये प्राध्यापक आणि इतर सदस्य असतील. त्यात पदवी आणि पदव्युत्तर स्तरावर वैकल्पिक विषय म्हणून शिक्षण सुरू करण्याची शिफारस करण्यात आली. या आयोगाच्या शिफारशींचा देशातील शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमावर चांगला परिणाम झाला. १९२५ मध्ये, म्हैसूर विद्यापीठाने शिक्षक शिक्षण सुरू केले.

**द हार्टॉग कमिटी, १९२९:-**

हार्टॉग समितीने सॅडलर कमिशनने सुरू केलेले काम पुढे चालू ठेवले. हे प्रामुख्याने प्राथमिक शिक्षणाशी संबंधित होते, परंतु शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी देखील शिफारसी केली होती. शिक्षणाचे यश हे प्रशिक्षणाची गुणवत्ता, दर्जा, प्रोत्साहन आणि शिक्षकांचे वेतन यावर अवलंबून आहे असा दृष्टिकोन तयार केला. ग्रामीण शाळांमधील शिक्षक हे ग्रामीण भागातील असावेत, अशी सूचना त्यात करण्यात आली. तसेच प्रशिक्षणाचा कालावधी खूपच कमी होता, अभ्यासक्रम खूपच अरुंद होता आणि शिक्षक कर्मचारी पुरेसे पात्र होते, असेही सुचवले होते. त्यात असे सुचवण्यात आले आहे की स्थानिक भाषा रीफ्रेशर कोर्सेस, परिषदा आणि शिक्षक संघटनांच्या बैठकांमधील शिक्षकांची जर्नल्स शिक्षकांना त्यांच्या करिअरमध्ये समृद्ध होण्यासाठी आणि त्यांच्या नोकरीच्या कर्तव्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी मदत करू शकतात. सॅडलर कमिशनच्या शिफारशींवर काम करून, १८ पैकी १३ विद्यापीठांनी शिक्षणाच्या संकायांची स्थापना केली. प्रमुख घडामोडी म्हणजे, दिल्लीमध्ये लेडी इर्विन कॉलेजची स्थापना करण्यात आली आणि केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाचेही पुनरुज्जीवन करण्यात आले,

**द ॲबॉट-वुड रिपोर्ट १९३७:-**

हा अहवाल १९३७ मध्ये सादर करण्यात आला. यात प्रामुख्याने व्यावसायिक शिक्षणाच्या क्षेत्राचे विश्लेषण करण्यात आले आणि शिक्षकांच्या शिक्षणाच्या संदर्भात अर्थपूर्ण सूचनाही केल्या. अहवालानुसार प्रशिक्षण कार्यक्रमांचा कालावधी तीन वर्षांचा असावा. यामुळे विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षणासह सामान्य शिक्षण घेता येईल. प्रशिक्षित शिक्षकांच्या टक्केवारीत १९३७ मध्ये ५६.८% वरून १९४२ मध्ये ६१.३% पर्यंत सुधारणा झाली. गुणात्मक सुधारणा घडवून आणण्यासाठी खूप काही करणे आवश्यक आहे. १९४१ मध्ये, ६१२ सामान्य शाळा होत्या, त्यापैकी ३७६ पुरुषांसाठी आणि २३६ महिलांसाठी होत्या. या शाळांनी एक-दोन वर्षांचे प्रशिक्षण दिले. पदवीधरांसाठी २५ प्रशिक्षण महाविद्यालये होती, जी पुरेशी मानली जात नव्हती

**द सार्जंट रिपोर्ट, १९४४:-**

१९४४ मध्ये, सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑफ एज्युकेशन (CABE) ने शिक्षणाची योजना सादर केली, जी भारतातील युद्धोत्तर शैक्षणिक विकास म्हणून ओळखली जात होती. ही योजना एक व्यापक शैक्षणिक योजना होती. त्यात शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाच्या संदर्भात काही सूचना केल्या. योग्य आणि पात्र मुला-मुलींनी हा व्यवसाय म्हणून निवडला पाहिजे आणि त्यांना योग्य पद्धतीने व्यावहारिक प्रशिक्षण दिले जावे, अशी शिफारस त्यात करण्यात आली आहे. याशिवाय रिफ्रेशर कोर्सेसचे नियोजन करून संशोधन कार्यान्वित केले पाहिजे. त्यात पूर्वप्राथमिक आणि कनिष्ठ मूलभूत शाळांसाठी दोन वर्षांचा अभ्यासक्रम, म्हणजे उच्च माध्यमिक शाळा पूर्ण झाल्यावर आणि वरिष्ठ मूलभूत शाळांसाठी तीन वर्षांचा अभ्यासक्रम सुचविला. हायस्कूलमधील पदवीधर नसलेल्या शिक्षकांना दोन वर्षांचा प्रशिक्षण कार्यक्रम घ्यायचा होता, तर पदवीधर एका वर्षाच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी

गेले होते. दोन वर्षांच्या प्रशिक्षणापैकी पहिले प्रशिक्षण सामान्य आणि व्यावसायिक विषयांच्या अभ्यासासाठी वाहिलेले होते. शालेय भेटी, चर्चा आणि इतर हितसंबंधांनी प्रशिक्षणार्थींची शिक्षणातील आवड जागृत करण्यासाठी मदत केली पाहिजे. त्यात शिक्षकांच्या सर्व श्रेणींसाठी आणि शिक्षकांना त्यांच्या नोकरीमध्ये कायम ठेवण्याच्या हेतूने देखील वेतनश्रेणीचे सुधारणे प्रस्तावित आहे.

१९०६ ते १९४७ पर्यंत देशात लक्षणीय शैक्षणिक संस्था आणि प्रशिक्षण केंद्रांचा विकास झाला. यातील पटसंख्या वाढल्याने प्रशिक्षित शिक्षकांची संख्या वाढली. विशेषत: १९४६ ते १९४७ या वर्षासाठी, प्रामुख्याने प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील शिक्षकांमध्ये सुमारे ६१% वाढ झाली.

**निष्कर्ष:-**

अध्यापन हा प्राचीन काळापासून देशातील सर्वात प्रतिष्ठित व्यवसाय म्हणून ओळखला जातो. देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी देशातील शिक्षकांनी धार्मिक शिक्षणावर भर दिला. धार्मिक शिक्षणाव्यतिरिक्त लौकिक शिक्षण हे प्रमुख मानले जात असे. स्वातंत्र्यपूर्व भारतातील शिक्षक शिक्षण समजून घेताना विचारात घेतलेले वेगवेगळे कालखंड म्हणजे उपनिषद कालखंड, बौद्ध काळ, मध्ययुगीन काळ आणि आधुनिक काळ. मुस्लिम काळात शाळा-महाविद्यालये स्थापन झाली. गणित, विज्ञान, साहित्य, खगोलशास्त्र, व्याकरण, न्यायशास्त्र, प्रशासन आणि विज्ञान हे इतर विषय दिले गेले. तेथे प्रयोगशाळाही स्थापन करण्यात आल्या, जिथे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक प्रयोगांचे प्रशिक्षण देण्यात आले. आधुनिक काळात शिक्षकांच्या प्रशिक्षणावर भर देणाऱ्या समित्या स्थापन झाल्या. शिक्षण पद्धतीत प्रगती घडवून आणण्यासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

अध्यापन ही एक कला मानली जाते जी योग्य ज्ञान, क्षमता आणि कौशल्यांसह पार पाडणे आवश्यक आहे. शिकवण्याचे काम प्रत्येकजण करू शकत नाही. हे काम योग्य रीतीने पार पाडण्यासाठी, व्यक्तींनी योग्य प्रशिक्षण घेणे आणि त्यांची कौशल्ये आणि क्षमतांचा समाधानकारक विकास करणे अत्यावश्यक आहे. मुख्य कारण म्हणजे, अध्यापनाच्या नोकऱ्यांमध्ये, विद्यार्थ्यांची प्रभावी वाढ आणि विकास करणे हे प्राथमिक उद्दिष्ट आहे. ज्या व्यक्तींना त्यांचा व्यवसाय म्हणून शिकवण्याची आवड निर्माण झाली त्यांनी प्रामुख्याने प्राचीन भारतातील त्यांच्या शिक्षकांकडून शिकवण्याची कौशल्ये शिकली. विशेषत: जेव्हा शिक्षकांच्या अनुपस्थितीत वर्ग घेण्याचे काम त्यांना सोपविण्यात आले होते. यामुळे त्यांना त्यांच्या अध्यापन कौशल्यांमध्ये सुधारणा करण्याची संधी उपलब्ध झाली. मध्ययुगीन आणि आधुनिक काळात शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम सुरू झाले. या कार्यक्रमांमुळे त्यांना व्यावसायिक ज्ञान प्राप्त करण्यात मदत झाली आणि त्यांना आवश्यक मानकांनुसार अध्यापन कार्य करण्यास सक्षम केले.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१. पारसनीस डॉ. न. रा., (१९९३), शिक्षकांचे प्रशिक्षण, पुणे, नूतन प्रकाशन
२. जगताप डॉ. ह.ना.,(१९९०), शिक्षणातील नवप्रवाह व नव प्रवर्तने, पुणे, नूतन प्रकाशन
३. पवार ना.ग.,(१९९५), भारतीय शिक्षणातील आधुनिक विचार प्रवाह, पुणे, नूतन प्रकाशन
४. मोरे चंद्रकांत., भिलेगावकर सदानंद.,(२००९), शिक्षक शिक्षण, पुणे, नित्य नूतन प्रकाशन
५. पारसनीस डॉ. न. रा., (सप्टेंबर २००२), शिक्षकांचे प्रशिक्षण, पुणे, नूतन प्रकाशन
6. Saxena N.R.,Mishra B.K., Mohanty R. K., (1998), Teacher Education, Meerut, Surya Publication

# महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार : एक अभ्यास

**प्राचार्य डॉ. पाटील एन.एस.**
वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय,शिरूर ताजबंद, ता. अहमदपूर, जि. लातूर.

**प्रस्तावना :-**

अहिंसा, साधी राहणी व उच्च विचारसरणी या तत्वाचा अवलंब करुन भारतीय स्वातंत्र्य लढयात अग्रगण्य राहिलेले सेनानी महात्मा गांधी यांचा जन्म 2 आक्टोंबर 1869 रोजी गुजरातमधील पोरबंदर येथे झाला. आपलं संपुर्ण आयुष्य भारतमातेच्या सेवेसाठी अर्पण करणा-या महात्मा गांधींनी केवळ राजकियच नाही तर सामाजिक व शैक्षणिक क्षेत्राततही आपले मोलाचे योगदान दिले आहे. तत्काळात इंग्रजाकडून जे शिक्षण दिले जात होते. ते भारतीय स्वातंत्र्यासाठी अनुकूल नाही असे म्हणून त्यांनी भारताला ख-या अर्थाने स्वातंत्र्य मिळवून दयायचे असेल तर स्वत:ची शिक्षण पध्दती असली पाहिजे हे ओळखले व एक नविन शिक्षण पध्दती भारताला दिली ती आज आपण 'मुलोदयोगी शिक्षण' म्हणुन ओळखतो.

**शैक्षणिक कार्य :-**

महात्मा गांधी हे एक शिक्षण तज्ञ होते. त्यांच्या मुलोदयोगी शिक्षण पध्दतीने शिक्षण क्षेत्रात मोलाची भर टाकली आहे.

**महात्मा गांधींना अभिप्रेत असणारा शिक्षणाचा अर्थ —**

शिक्षण म्हणजे सर्वांगीण व सुसंगत विकास होय मनुष्य म्हणजे केवळ त्याचे शरीर, बुध्दी, ह्रदय किंवा आत्मा नव्हे. या सर्वांचा सुसंगत मेळ शिक्षणातून झाला पाहिजे. शिक्षणाची अशी व्याख्या करुन 31 जुलै 1937 च्या आपल्या हरीजन या पत्रात महात्मा गांधी म्हणतात व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या शारीरिक मानसिक व आत्मिक शक्तीचे उन्नयन शिक्षणाद्वारे व्हावे. तत्काळात साक्षरता म्हणजे शिक्षण होते पण हे महात्मा गांधींना मान्य नव्हते. 'आत्मा व मन यांचा परिपुर्ण विकास करुन व्यक्तीमधील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती करणे' हे शिक्षणाचे ध्येय आहे असे ते मानतात. एवढेच नाही तर शिक्षणातून चांगले व वाईट यांचे ज्ञान प्राप्त होत असते व हे जर प्राप्त होत नसेल तर ते शिक्षण होवू शकत नाही असे महात्मा गांधी म्हणतात.

**मुलोदयोगी शिक्षण :-**

महात्मा गांधी यांनी जी शिक्षण योजना मांडली ती मुलोदयोगी शिक्षण, नई तालीम, जीवन शिक्षण, वर्धा शिक्षण पध्दती या विविध नावांनी ओळखली जाते. 23 आक्टोंबर 1937 मध्ये वर्धा येथे अखिल भारतीय परिषदेसमोर या योजनेचे स्वरुप स्पष्ट केले. या योजनेचा डॉ. झाकिर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास करुन 2 डिसेंबर 1937 रोजी आपला अहवाल सादर केला होता.

**मुलोदयोगी शिक्षणाची तत्त्वे :-**

1) प्राथमिक शिक्षण हे 7 ते 14 वर्षापर्यंतच्या मुला-मुलींना मोफत, सक्तीचे व सार्वत्रिक असावे.
2) शिक्षण मातृभाषेतून दयावे.
3) शिक्षण हे उत्पादक उदयोगाच्याद्वारे दयावे.
4) शिक्षण स्वावलंबी असावे.

**शिक्षणाची उद्दिष्टये :-**

शिक्षण हे मानवी उन्नतीसाठी महत्वाचे असल्याने शिक्षणाची उद्दीष्टये सुध्दा व्यापक असावी. तसेच शिक्षणातून जनजीवनाच्या आशा आकांक्षाचा विचार व्हावा व भारतीय संस्कृती टिकून रहावी असे महात्मा गांधींना वाटत असे.

1) **चारित्र्य निर्मिती** :- केवळ ज्ञान देणे म्हणजे शिक्षण नव्हे तर त्या शिक्षणातून व्यक्तीच्या अंगी चारित्र्य निर्माण झाले पाहिजे.
2) **स्वावलंबन** :- शिक्षणातून व्यक्तीच्या अंगी स्वावलंबन प्रवृत्ती निर्माण झाली पाहिजे शिक्षणातून रोजगार करता आला पाहिजे. शिक्षणातून व्यक्ती स्वत:च्या पायावर उभारला पाहिजे असे शिक्षण असावे.

3) **धार्मिक सहिष्णूता :-** शिक्षणामधून विविध धर्माकडे बघण्याचा आपला दृष्टीकोन विकसित झाला पाहिजे. धर्मातील संकुचित वृत्तीचा त्याग केला पाहिजे व सर्व धर्म समभाव तत्वाचा स्विकार झाला पाहिजे.

4) **श्रमाला महत्व :-** महात्मा गांधी यांनी मुळातच आपल्या शिक्षण योजनेत श्रमाला महत्व दिले आहे. कृतीयुक्त शिक्षण असावे असे महात्मा गांधी म्हणतात.

**महात्मा गांधी व स्त्री शिक्षण :-**

महात्मा गांधी यांनी स्त्रीयांच्या शिक्षणाबाबत जे विचार मांडले ते आगळेवेगळे असे आहेत. मुळातच स्त्री व पुरूष यांच्यामध्ये नैसर्गिक भेद आहे व त्या भेदांचा विचार करुनच शिक्षण दयावे. स्त्री शिक्षणातून तिने कुटूंबावर संस्कार करावेत, मुलांचे योग्य संगोपण करावे असे शिक्षण असावे व त्यासाठी त्यांना विशेष विषयांचे शिक्षण दयावे. सहशिक्षणाच्या बाबतीत काही नीतीच्या तत्त्वावर अधारित दयावे असे ते म्हणतात.

**प्रौढ शिक्षण :-** स्वातंत्र्यलढा तीव्र करण्यासाठी प्रौढ शिक्षणाची आवश्यकता व्यक्त केली. या शिक्षणातून देशसेवा करणारे स्त्री व पुरूष तयार झाले पाहिजेत. शिक्षणातून व्यक्तीच्या अंगी निर्भयता व आत्मविश्वास निर्माण होवून त्यांच्यामध्ये त्यांचे व्यावसायिक व जीवनावश्यक कौशल्य विकसित झाले पाहिजे.

**विद्यापीठीय शिक्षण :-** इंग्रजांनी सुरू केलेल्या शिक्षण पध्दतीने देशाचे नुकसान झाले आहे. इंग्रजी शिक्षण पध्दतीने राष्ट्रप्रेम कमी केले आहे. एवढेच नाही तर त्या शिक्षणातून भेदाभेद निर्माण होऊन उच्च शिक्षण हे केवळ नोकरी मिळविण्यासाठीच घेतले जात आहे. त्या शिक्षणातून विकासाऐवजी फक्त उदरनिर्वाह हेच उद्दीष्टये साध्य होत आहे आणि ही प्रवृत्ती शिक्षणाला घातक आहे अशी टिका त्यांनी तत्कालीन इंग्रजी शिक्षणावर केली त्यांच्या मते विद्यापीठीय शिक्षणातून देशासाठी लढणारे सैनिक तयार झाले पाहिजेत. शिक्षणातून राष्ट्रभक्ती व राष्ट्रप्रेम निर्माण झाले पाहिजे असे शिक्षण असावे. विद्यापीठीय शिक्षणातून ग्रामीण जनतेच्या गरजा पुर्ण झाल्या पाहिजेत. तसेच शासनापेक्षा जनतेच्या पुढाकारातून विद्यापीठे स्थापन व्हावीत म्हणजे ती लोकाभिमुख होतील. विद्यापीठीय शिक्षण हे प्रादेशिक भाषेतून दयावे आणि सध्याचा विद्यापीठीय अभ्यासक्रम बदलावा व हा अभ्यासक्रम व्यवसायनिष्ठ असावा. या अभ्यासक्रमातून त्यांचे 'खेडयाकडे चला' हे जे मुळ धोरण होते ते साध्य झाले पाहिजे असे ते म्हणतात.

**अभ्यासक्रम :-** पुस्तकी शिक्षणामुळे जीवनात काहीच साध्य होत नाही म्हणुन अभ्यासक्रम हा जीवनाला दिशा देणारा असला पाहिजे म्हणुनच महात्मा गांधी आपल्या शिक्षण पध्दतीला 'जीवन शिक्षण' म्हणतात. जीवनातील गरजांना प्राधान्य देणारा अभ्यासक्रम असावा म्हणून तो जीवनाभिमुख, कृतीपर व समवायता या निकषावर अधारित असावा असे महात्मा गांधींना वाटत असे. त्यांच्या अभ्यासक्रमात उत्पादकतेवर भर होता. तसेच कृषी व औदयोगिक विकास यांचा समावेश अभ्यासक्रमात ठेवून त्यांनी हस्त व्यवसायाला पायाभूत विषय मानले होते. अभ्यासक्रम शिकविण्याचे माध्यम मातृभाषा असावे यावर त्यांचा भर होता तर इंग्रजीला त्यांचा विरोध होता. तसेच देशाच्या एकात्मतेसाठी हिंदी भाषा शिकावी असेही त्यांना वाटत असे. याबरोबरच व्यायाम, व्यवसाय, चित्रकला, लैगिक शिक्षण, धार्मिक शिक्षण इ. विविध विषय अभ्यासक्रमात असावे असे ते म्हणतात. अध्ययन व अध्यापनाच्या पध्दतीबाबत स्वयंअध्ययन व कृतीकेंद्रीत अध्यापन पध्दती असाव्यात असे ते म्हणतात.

**समारोप :-**

अशा पध्दतीने महात्मा गांधी यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढयाबरोबरच शिक्षणाकडेही विशेष लक्ष दिले आहे. यासाठी त्यांनी स्वतंत्र अशी शिक्षणाची योजनाच भारताला दिल्याचे दिसते जी योजना आजही आपल्याला अनेक बाबतीत लागू करण्यासारखी आहे.

**संदर्भसुची :-**

1. प्रा. ना. ग. पवार (2004), शिक्षण क्षेत्रातील विचारवंत, नुतन प्रकाशन, पुणे.
2. डॉ. संघमित्रा गोणारकर (2009) शैक्षणिक विचारवंत, निर्मल प्रकाशन, नांदेड.
3. डॉ. घोरमोडे, के.यु. व डॉ. कला घोरमोडे, (2006), शैक्षणिक विचारवंत, विद्या प्रकाशन, नागपूर.
4. प्रा. पानसे, रमेश (2007), नयी तालीम : गांधीप्रणित शिक्षणविषयक प्रयोगांचा इतिहास, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

# स्वातंत्र्यपूर्व काळातील कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक योगदान

**सौ .शोभा संग्राम पाटील**
सहाय्यक प्राध्यापिका
आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा

**प्राचार्य डॉ. बालाजी गिरगावकर**
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नांदेड

**सारांश**

*महाराष्ट्र हा दगडधोंड्यांचा देश, कडेकपाऱ्याचा देश.भले रत्नांच्या खाणी या मातीत नसतील पण पृथ्वी मोलाची लाख नवरत्न या मातीने जगाला दिली त्याच रत्नातील एक रत्न म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील. ज्ञानाचा दिवा महाराष्ट्रातल्या मनामनात पेटवणारे,लोकांच्या मनात स्वाभिमान रुजवणारा,देव दगडात नसतो तर माणसात असतो हे हेरून इथल्या माणसांमध्ये माणुसकी पेरणारा लोकमहर्षी,शिक्षणमहर्षी म्हणजेच कर्मवीर भाऊराव पाटील होय. बहुजनांच्या मुलांमध्ये शिक्षण प्रसार करणारा देव माणूस कर्मवीर भाऊराव पाटील.ग्रामीण भागातील शिक्षणाची गरज 100 वर्षापूर्वीच ओळखणारा शिक्षणमहर्षी ग्रामीण शिक्षण चळवळीचे जनक म्हणजेच कर्मवीर भाऊराव पाटील होय. लोकशाहीचा मूळ गाभा लोकशिक्षण आहे आणि हे लोकशिक्षण समाजाला विकासाकडे नेते हे कर्मवीर अण्णांना ज्ञात होते म्हणून अनवाणी पायांनी वणवण करून अवघा महाराष्ट्र पिंजून काढून शिक्षणाची गंगा बहुजनांच्या झोपडी - झोपडीत पोहोचविणारे कर्मवीर भाऊराव पाटील होते. शिक्षणामध्ये शारीरिक श्रमाची प्रतिष्ठा प्रस्थापित करण्याचा यशस्वी प्रयत्न भाऊरावांनी केला विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असतानाच काम केले पाहिजे व त्यातून शिक्षणाचा खर्च भागवला पाहिजे असे ते बोलत असत. श्रम, स्वावलंबन व समता या तीन तत्त्वावर त्यांच्या शैक्षणिक कार्याचा वटवृक्ष आधारलेला होता. .भाऊराव पाटलांनी रयत शिक्षण संस्थेच्या सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये कमवा व शिका योजना चालू करून श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात फार मोठी क्रांती केली आहे.*

**स्वातंत्र्यपूर्व काळातील कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक योगदान**

महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, पंजाबराव देशमुख, महर्षी कर्वे, या समाजसुधारकांनी व शिक्षण तज्ज्ञांनी पददलित दीनदुबळ्या लोकांसाठी शिक्षणाची सोय केली त्यातीलच एक थोर विभूती म्हणजेच कर्मवीर भाऊराव पाटील.बहुजनांच्या मुलांमध्ये शिक्षण प्रसार करणारा देव माणूस कर्मवीर भाऊराव पाटील.ग्रामीण भागातील शिक्षणाची गरज 100 वर्षापूर्वीच ओळखणारा शिक्षणमहर्षी ग्रामीण शिक्षण चळवळीचे जनक म्हणजेच कर्मवीर भाऊराव पाटील होय. लोकशाहीचा मूळ गाभा लोकशिक्षण आहे आणि हे लोकशिक्षण समाजाला विकासाकडे नेते हे कर्मवीर अण्णांना ज्ञात होते म्हणून अनवाणी पायांनी वणवण करून अवघा महाराष्ट्र पिंजून काढून शिक्षणाची गंगा बहुजनांच्या झोपडी - झोपडीत पोहोचविणारे कर्मवीर भाऊराव पाटील होते. त्यामुळे कर्मवीरांसारख्या शिक्षणमहर्षी असणाऱ्या माणसाचं व्यक्तिमत्त्व तरुणांना माहीत होणे ही काळाची गरज बनली आहे.

रयत शिक्षण संस्था स्थापन होण्यापूर्वी कर्मवीर अत्यंत सामान्य व्यक्ती होते कोल्हापुरात शिक्षण घेत असतानाच त्यांच्या जीवनावर महात्मा फुले शाहू महाराज महात्मा गांधी यांच्या जीवनाचा खूप प्रभाव पडला या तीन महान लोकांमुळेच भाऊरावांच्या मनात समाजसेवेचे शुद्ध बीज अंकुरीत झाले शिक्षण हाच सर्व सुधारणांचा पाया आहे अशी त्यांची खात्री पटली शिक्षणाच्या अभावामुळेच आपली पीछेहाट झाली आहे याची त्यांना अगदी तरुण वयातच जाणीव झाली आणि त्यामुळेच त्यांनी 1909 मध्ये काही मित्रांच्या सहकार्याने वाळवे तालुक्यातील दुधगाव या ठिकाणी ' दुधगांव विद्यार्थी आश्रम ' ही संस्था काढली आणि भाऊरावांच्या शैक्षणिक कार्यास प्रारंभ झाला. शेतकरी म्हणजेच रयत .रयतेला शिक्षण देणारी संस्था म्हणून या संस्थेला रयत शिक्षण संस्था असे नाव देण्यात आले आणि 4 ऑक्टोबर 1919 साली काले तालुका कराड जिल्हा सातारा या ठिकाणी विजयादशमीच्या मुहूर्तावर रयतेसाठी रयत शिक्षण संस्था स्थापन झाली.आणि देशातील सर्वात मोठी संस्था म्हणून आज तिचा नावलौकिक आहे . श्रम, स्वावलंबन व समता या

तीन तत्त्वावर त्यांच्या शैक्षणिक कार्याचा वटवृक्ष आधारलेला होता ज्यांच्या हाताला घट्टा व चट्टा नाही तो स्वावलंबी विद्यार्थी नाही असे भाऊराव म्हणत असत .शिक्षणामध्ये शारीरिक श्रमाची प्रतिष्ठा प्रस्थापित करण्याचा यशस्वी प्रयत्न भाऊरावांनी केला विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असतानाच काम केले पाहिजे व त्यातून शिक्षणाचा खर्च भागवला पाहिजे असे ते बोलत असत मागासलेल्या समाजात शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने काम करणाऱ्या संस्थेचे रयत शिक्षण संस्था हे नाव यथार्थ आहे. नानासाहेब गोरे यांनी म्हटल्याप्रमाणे आगरकर चिपळूणकर व टिळकांनी शाळा कॉलेज स्थापन केले खरे पण शिक्षणाच्या झंझावाताची खरी चळवळ उभी केली असेल तर ते कार्य भाऊरावांनी केले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक चळवळीतून आणि त्यांच्या कृतीतून शिक्षण, समता अस्पृश्यता निर्मूलन, स्वावलंबन ग्रामीण विकास अशा विविध कार्यक्रमातून त्यांचा व्यापक दृष्टिकोन दिसून येतो. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी 1915 फेब्रुवारी ते 1921 च्या नोव्हेंबर पर्यंत सत्यशोधक समाजाचा प्रचार केला तेव्हा समाज जातीपातीने विभागला होता अज्ञानाने राजकीयदृष्ट्या इंग्रजांच्या गुलामगिरीत तसेच धार्मिक, सामाजिक,आर्थिक गुलामगिरीत अडकलेला होता. भाऊरावांनी या सर्वावर उपाय म्हणजे लोकांना शिक्षण देणे हा विचार स्वीकारला. इंग्रजांनी भारतावर 150 वर्षे राज्य केले त्या इंग्रजांचा भारतीयांना शिक्षण देण्याचा उद्देश केवळ साक्षर कारकून तयार करणे एवढाच होता व त्याचदृष्टीने त्यांनी शिक्षणाचा अभ्यासक्रम तयार केलेला होता हे कर्मवीरांनी जाणले म्हणूनच सामाजिक जाणीव असणारे सुशिक्षित, चारित्र्यसंपन्न विचारवंत शिक्षणातून निर्माण होण्यासाठी उच्च शिक्षण देण्यासाठी 1946 मध्ये सातारा येथे महाविद्यालय सुरू करण्याची घोषणा कर्मवीरांनी केली व त्यादृष्टीने छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची स्थापना 1947 मध्ये केली .त्यानंतर हळूहळू संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी उच्च शिक्षण देण्यासाठी विविध महाविद्यालयांची स्थापना केली तर 1954 साली कराड येथे सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. शाळा व महाविद्यालयांसाठी प्रशिक्षित शिक्षकांची उणीव जाणवू लागली म्हणून त्यांनी प्रथम महात्मा फुले अध्यापक विद्यालय व पुढे इ.स. 1955 मध्ये सातारा येथे मौलाना आझाद यांच्या नावाने आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन सुरू केले या सर्व शाळा महाविद्यालयांच्या स्थापनेमागे शिक्षणाचा प्रसार व त्यातून बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास हीच उद्दिष्टे भाऊरावांच्या डोळ्यासमोर होती

शैक्षणिक कार्याची सुरुवात वसतिगृह स्थापन करून केली आणि नंतर प्राथमिक शिक्षणासाठी शाळा सुरू केल्या ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य दिले. दुष्काळी, मागास भागात महाविद्यालये सुरू करण्यात आली भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने 578 प्राथमिक शाळा, 439 माध्यमिक शाळा (27 मुलींसाठी) 38 वसतिगृह शाळा, 160 उच्च माध्यमिक विद्यालये ,17 शेती विद्यालये,21 तंत्रज्ञान विद्यालये, 8अध्यापक महाविद्यालय (01 महिलांसाठी) 41 महाविद्यालये आणि 5 इंग्रजी माध्यम विद्यालये यांची स्थापना केली. अण्णांच्या संस्थेचा विस्तार महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात आहे. 9 मे 1959 रोजी भाऊराव पाटील यांचे निधन झाले.भाऊराव पाटलांनी रयत शिक्षण संस्थेच्या सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये कमवा व शिका योजना चालू करून श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात फार मोठी क्रांती केली आहे. श्रमातून शिक्षण प्राप्त करण्याचा महान मूलमंत्र त्यांनी जनतेला दिला व मानवी समतेचा दिव्य आदर्श जनतेपुढे ठेवला.

**संदर्भ**

1) पाटील अजित, ( 2004) माणसातील देव,) मॅकमिलन, पुणे
2) जाधव पंजाबराव (1967) कर्मवीर भाऊराव पाटील,श्री दत्त मुद्रणालय, पुणे.
3) पाटील पां. ग, (1964) कर्मवीरोपनिषद, ग्रामीण जीवन अभ्यास संस्था, सातारा

# महात्मा गांधीजींनी शांततेच्या मार्गाने केलेले सामाजिक व शैक्षणिक कार्य

**प्रा. स्नेहलता दत्तात्रय दळवी**
डॉ. एस.एस. एम. प्रतिष्ठानचे बी.एड. कॉलेज
अहमदपूर. जि. लातूर

**प्रस्तावना :**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे प्रवर्तक म्हणून ज्यांचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते ते म्हणजे आपले बापू. ज्यांना महात्मा ही उपाधी मिळाली. यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरात मधील किनारपट्टी असलेल्या पोरबंदर येथे झाला. त्यांचे संपूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी लहानपणापासून ते शांतताप्रिय असे व्यक्तिमत्त्व होते. या स्वभावाच्या त्यांच्या कार्यावर परिणाम झालेला दिसून येतो. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक मार्गांनी चळवळीचे नेतृत्व करीत असतानाच सामाजिक सुधारणा, राजकीय नेतृत्व, शैक्षणिक कार्य यामधील त्यांचा सहभाग खूप मोठा आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक मार्गांनी चळवळीचे नेतृत्व करीत असतानाच सामाजिक सुधारणा केल्या. भारतीय समाजातील अनेक प्रकारच्या जीवघेण्या समस्यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला.

महात्मा गांधीजींनी शिक्षणाच्या बाबतीत अतिशय व्यापक आणि उदार दृष्टिकोन स्वीकारला होता. भारतीय समाज व्यवस्थेला एक वेगळी दिशा प्राप्त होण्यासाठी आणि देशातील निरक्षरता, आर्थिक मागासलेपण दूर व्हावा, यासाठी शिक्षणाच्या बाबत परिवर्तनाची आवश्यकता आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. महात्मा गांधीजींनी दिलेला अहिंसेचा मार्ग आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी केलेला प्रयत्न हा जगतमान्य आहे. २ ऑक्टोबर हा दिवस जागतिक अहिंसा दिवस म्हणून साजरा केला जातो. अहिंसा आणि त्यातूनच शांतता व सहिष्णुता हा मूलमंत्र गांधीजींनी दिला. त्यांचे तत्त्वज्ञान समजून घेणे हे सुद्धा आपले कर्तव्य आहे. महात्मा गांधीजी यांना शांततेचे दूत संबोधले जाते. त्यांचे शांतता विषयीचे विचार त्यांच्या जीवन विषयक आणि राजकीय तत्वज्ञानातून लक्षात येतात. जगात शांतता नांदण्याची सर्वात उत्तम पद्धत त्यांनी दिली.

**समस्या विधान :**

स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील महात्मा गांधीजींनी शांततेच्या मार्गाने केलेल्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा अभ्यास

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) महात्मा गांधीजींचा शांतता, अहिंसात्मक विचारांचा अभ्यास करणे
२) महात्मा गांधीजींच्या सामाजिक कार्याचा अभ्यास करणे.
३) महात्मा गांधीजींच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.
भूतकालीन घटनांचे यथार्थ दर्शन आणि विश्लेषण करण्याकरिता शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला जातो.
भूतकालीन घटनांचे वर्णन आणि पृथ्थकरण करण्याकरिता शास्त्रीय पद्धतीचे उपयोजन म्हणजेच ऐतिहासिक संशोधन होय.

**माहिती संकलनाची साधने :**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधनाचा वापर करण्यात आला आहे.

त्यामध्ये संदर्भग्रंथ, नियतकालिके, तज्ञांचे लेख, शोध निबंध, वर्तमान पत्रातील लेख, मासिके, इंटरनेट इत्यादींच्या साह्याने माहिती संकलित केली आहे.

**महात्मा गांधीजींचे सामाजिक कार्य :**

महात्मा गांधी हे स्वातंत्र्य लढ्यातील जसे महानायक होते, तसेच ते एक महान समाजसुधारकही होते. भारतातील सामाजिक समस्यांचा सखोल अभ्यास करून त्यांनी सामाजिक परिवर्तनासाठी विविध चळवळी उभ्या केल्या. तसेच भारतीय समाज कोणत्या सामाजिक व नैतिक मूल्यांवर आधारित असावा हेही स्पष्ट केले आहे. भारतीय समाजात जातीय, धार्मिक ऐक्य

निर्माण व्हावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. विविध धर्माचे अनुयायी जर प्रेमाच्या रस्त्याने गेले तर त्यांच्यात निश्चितच सामंजस्य शिष्य निर्माण होईल. प्रत्येक धर्मामध्ये शांती आणि अहिंसा याचीच शिकवण दिली आहे. ही शिकवण मानवाला शांती प्रदान करणारीच आहे. अशी त्यांची ठाम भूमिका होती.

महात्मा गांधीजींनी ओळखले होते की सर्व कारणांचे मूळ हिंसा आहे. जगातील विविध हिंसा त्यांनी विचारात घेतल्या. जसे परकीय नियमांनी केलेली हिंसा, गरिबांची आर्थिक पिळवणूक ही आर्थिक हिंसा, निरक्षरता आणि मागासलेपणा यामुळे झालेली शैक्षणिक हिंसा, युद्ध आणि अपराधामुळे होणारी हिंसा म्हणजेच हिंसा हेच शांततेचे प्रमुख कारण आहे हे त्यांनी जाणले होते. यासाठी अहिंसा हाच सत्याचा मार्ग असणार आहे आणि व्यक्तीच्या जीवनाचे राष्ट्राचे उत्तर त्यातून मिळणार आहे. अहिंसेनेच शांततेची ओळख करून दिली आहे. महात्मा गांधीजींची शांतता ही व्यक्तिगत मूल्य आहे. महात्मा गांधीजींच्या विचारानुसार सत्य आणि अहिंसेची सुरुवात व्यक्तीपासून होते आणि जाणीवही व्यक्ती पासून होत असते म्हणूनच शांतता ही सामाजिक व मानसशास्त्रीय दृष्टिकोन विकासाचा आधार आहे.

**भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा संघर्ष :**

१९१४ मध्ये महात्मा गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आले. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सांगण्यावरून भारतात आले. गांधीजींच्या विचारांवर गोखले यांच्या विचारांचा प्रभाव पडला. गांधीजींनी सुरुवातीला देशाच्या विविध भागात जाऊन राजकीय, आर्थिक आणि सामाजिक विषय समजून घेण्याचा प्रयत्न केला.

**१) चंपारण्य आणि खेडा सत्याग्रह**

बिहारमधील चंपारण्य आणि गुजरातमधील खेडा येथील चळवळीमुळे गांधीजींना भारतातील पहिले राजकीय यश मिळाले. चंपारण्य मधील ब्रिटिश जमीनदारांनी शेतकऱ्यांना अन्नधान्य पीक नील लागवड करण्यास भाग पाडले. आणि स्वस्त दरात पिके घेण्यास भाग पाडले. यामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट झाली. त्यामुळे ते अत्यंत गरिबीने वेढले गेले होते. १९१८ मध्ये गुजरात मधील खेडा पूर आणि दुष्काळाने त्रस्त झाला. यामुळे शेतकरी व गरिबांची परिस्थिती खूप वाईट झाली आणि लोकांना कर माफीची मागणी केली गांधीजींनी या समस्येवर इंग्रजांशी चर्चा केली. ब्रिटिशांनी महसूल वसुली माफ करून सर्व कैद्यांची सुटका केली. अशाप्रकारे चंपारण्य व खेडा नंतर गांधीजींची कीर्ती देशभर पसरली आणि ते स्वातंत्र्य चळवळीचे एक महत्त्वाचे नेते म्हणून उदयास आले.

**२) असहकार आंदोलन**

गांधीजींचा असा विश्वास होता की, भारतातील इंग्रजांचे शासन केवळ भारतीय यांच्या सहकार्याने शक्य होते आणि जर आपण सर्वजण मिळून ब्रिटिशांविरुद्ध सर्वकाही करण्यास सहकार्य केले तर स्वातंत्र्य शक्य आहे. यातूनच त्यांनी ब्रिटिशांविरुद्ध असहकार, अहिंसा व शांतताप्रिय प्रतिकार. यासारखी शस्त्रे वापरण्याच्या स्थितीत आले होते. जालियनवाला बाग हत्याकांडाने देशाला मोठा धक्का बसला. लोकांमध्ये संताप, हिंसाचाराची ज्वाला भडकली. गांधीजींनी परदेशी वस्तू विशेषतः इंग्रजी वस्तूंवर बहिष्कार घालण्यासाठी स्वदेशी धोरणाची मागणी केली. ते म्हणाले की, सर्व भारतीयांनी इंग्रजांनी बनवलेल्या कपड्या ऐवजी आपल्या स्वतःच्या लोकांनी हाताने तयार केलेली खादी घालावी. त्यांनी पुरुष व स्त्रियांना दररोज सूत कातण्याचे सांगितले. त्याशिवाय ब्रिटीशांच्या शैक्षणिक संस्था व न्यायालयावर बहिष्कार घालण्याची, सरकारी नोकरी सोडावी व ब्रिटिश सरकारकडून मिळालेला सन्मान व परत करण्याची विनंतीही केली. असहकार चळवळीला अपार यश मिळत होते. समाजात उत्साह होता. परंतु १९२२ च्या चौरीचौरा घटनेमुळे या हिंसक घटनेमुळे गांधीजींनी असहकार आंदोलन मागे घेतले. या वरुन लक्षात येते गांधीजींना हिंसा मान्य नव्हती. कोणतेही काम हे अहिंसा शांततेच्या मार्गानेच झाले पाहिजे असे त्यांचे विचार होते.

**मीठाचा सत्यागृह**

असहकार चळवळीचा वेळी अटकेनंतर गांधीजींना फेब्रुवारी १९२४ मध्ये सोडण्यात आले. त्यानंतर त्यांनी अस्पृश्यता, मध्यपान, अज्ञान आणि दारिद्रय याविरुद्ध संघर्ष केला. डिसेंबर १९२८ च्या कलकत्ता अधिवेशनात गांधीजींनी ब्रिटिश सरकारला भारतीय साम्राज्याला सत्ता देण्यास सांगितले आणि तसे करण्यास अपयशी ठरल्यास देशाच्या स्वातंत्र्यासाठी असहकार चळवळीला तोंड देण्यासाठी तयार राहा असे ठणकावून सांगितले. ब्रिटिश सरकारने मीठावर कर आकारण्यास सुरुवात केली

होती. यांच्या निषेधार्थ गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला. त्या अंतर्गत त्यांनी १२ मार्च ते एप्रिल या कालावधीत गुजरातच्या अहमदाबाद ते दांडी ३८८ किलोमीटरचा प्रवास केला. या प्रवासाचा हेतू स्वतःहून मीठ तयार करणे हा होता. या प्रवासात हजारो भारतीय सहभागी झाले आणि इंग्रजी सरकारचे लक्ष विचलीत करण्यास यशस्वी झाले.

**स्त्री सुधारणावादी विचार**

महात्मा गांधीजींना स्त्रियांच्या जीवनाविषयी व समस्यांविषयी अत्यंत तळमळ व सहानुभूती होती. सामाजिक दृष्ट्या उपेक्षित असलेल्या महिलांना व्यावहारिक दृष्ट्या समाजात प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी महात्मा गांधीजींनी भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनात महिलांना सहभागी केले. जोपर्यंत समाजात पुरुषांच्या बरोबरीचे स्थान महिलांना प्राप्त होत नाही, तोपर्यंत कोणतेही राष्ट्र सुसंस्कृत होणार नाही. असा आग्रही पुरस्कार त्यांनी केला. महिलांमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी महिलाविषयक विचारांच्या अनुषंगाने महात्मा गांधीजींनी स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. महिलांना शिक्षण घेता यावे या उद्देशाने वर्धा शिक्षण योजनामध्ये महिला शिक्षण विषयक योजना तयार करण्यात आली. मुला मुलींना समान शिक्षण असले पाहिजे असे सांगितले. त्याच बरोबर महिलांसाठी काही ऐच्छिक विषयाचा समावेश केलेला दिसून येतो.

**महात्मा गांधीजींचे शैक्षणिक कार्य :**

महात्मा गांधीजी यांचे सामाजिक कार्य जसे महान आहे, अगदी त्याच पद्धतीने त्यांचे शैक्षणिक कार्य हे देखील महान आहे. महात्मा गांधीजींनी सत्य, अहिंसा आणि मानवता या मूल्यांची शिकवण संपूर्ण जगाला दिली. त्याच बरोबर शांतता, सहजीवन, विश्वशांती, अहिंसा इ. तेजस्वी विचार ही दिले. हरिजन नावाच्या साप्ताहिकातून महात्मा गांधीजीनी आपले शिक्षण विषयक विचार व्यक्त करीत असत. गांधीजींचे असे मत होते की, साक्षरता हे शिक्षणाचे एक साधन आहे व त्याच्या सहाय्याने भारतीय समाजाला शिक्षित केले पाहिजे. केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे. शिक्षणातून शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक अशा तिन्ही प्रकारचा विकास होणे अपेक्षित आहे.

त्यासाठी त्यांनी 3Hची कल्पना मांडली.

3H = Head, Heart & Hand.

**शिक्षण**

१) बुद्धी विचार सदसदविवेक > Head > ज्ञानात्मक > सदसद्विवेकबुद्धी व सुविचार

२) हृदय, मन, भावना > Heart > भावात्मक > सद्वदयता श्वेता

३) हात, पाय, ज्ञानेंद्रिये > Hand > क्रियात्मक > विविध कलाकौशल्य, कर्तव्य आचरण

3H च्या माध्यमातून सर्वांगीण विकास होण्यास मदत होते.

गांधीजींच्या मते शिक्षण हे स्वावलंबी झाली पाहिजे व शिक्षणातून व्यक्तींच्या शरीर मन व आत्म्याचा विकास झाला पाहिजे. शिक्षणातून पोट भरण्याचे व जीवनातील समस्या सोडविण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांच्या अंगी आली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठीच्या पुस्तकी ज्ञानाबरोबरच त्याला एखाद्या व्यवसायाचे ज्ञान दिले पाहिजे. शिक्षणातून दुसऱ्याचे दुःख जाणून घेण्याची क्षमता निर्माण झाली पाहिजे हे गांधीजींचे विचार वास्तवाला धरून होते.

**वर्धाशिक्षण योजना :**

१९३५ च्या भारत सरकारच्या कायद्याने प्रांतांना स्वायत्तता मिळाली होती. त्यामुळे प्रत्येक प्रांतामध्ये इतर विषयांच्या बरोबरीनेच शिक्षणासंबंधी विचार करण्याची आवश्यकता होती. शिक्षणासाठी पैशाची आवश्यकता होती. मात्र पैसा उपलब्ध नव्हता. अशा परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी महात्मा गांधीजींनी शिक्षणाची एक नवीन योजना समाजापुढे ठेवली. ती योजना म्हणजे वर्धा शिक्षण योजना किंवा मूलोद्योगी शिक्षण योजना.

विश्वास वर्धा वर्धा येथील मारवाडी हायस्कूलचा रजत जयंती समारंभ दिनांक २२ व २९ ऑक्टोबर १९३७ ला आयोजित केलेला होता. याच वेळी महात्मा गांधीजींच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय राष्ट्रीय शिक्षण संमेलन आयोजित केले होते. हे संमेलन वर्धा येथे भरलेले असल्यामुळे याचा वर्धा शिक्षण परिषद असाही उल्लेख केला जातो. या संमेलनासाठी अनेक शिक्षणतज्ञ, समाजसुधारक होते. सर्व उपस्थितासमोर महात्मा गांधीजींनी आपली बेसिक शिक्षण ही योजना मांडली. महात्मा गांधीजींच्या तत्वज्ञानातून या योजनेचा उगम झाला. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींची ही योजना जीवनाभिमुख तसेच स्वावलंबी

शिक्षणाला प्राधान्य देणारी होती. त्या काळातील शिक्षण योजनेमध्ये बऱ्याच त्रुटी होत्या. इंग्रजांनी राबविलेल्या शिक्षण पद्धतीचे ध्येय ही केवळ कारकून निर्माण करणे असे होते. शिक्षण पद्धतीत चारित्र्य संवर्धनाचा व शिक्षणाभिमुभिमुखतेचा अभाव असे दोष होते. या दोषांचे निर्मूलन करून आपल्या देशासाठी एक नवीन शिक्षण योजना असणे गरजेचे आहे असे गांधीजींना वाटत होते.

**मुलोद्योगी शिक्षण :**

वर्धा शिक्षण योजना ही नई तालीम, मुलोद्योगी तालीम, बुनियादी तालीम या विविध नावांनी ओळखली जाते. यापैकी मूलोद्योगी तालीम या नावाने ही योजना जास्त प्रसिद्ध आहे. ही योजना भारतीय संस्कृतीवर आधारलेली असल्यामुळे भारतातील गरजांचा यामध्ये अधिक विचार केलेला आहे. इंग्रजी मधील बेसिक या शब्दांचा मराठीमध्ये मूलभूत असा अर्थ आहे, तर उर्दूमध्ये या शब्दाचा अर्थ बुनियादी असा आहे. म्हणूनच या योजनेला बुनियादी शिक्षण योजना असेही म्हटले जाते. या योजनेचे एकंदर स्वरूप जीवनाच्या मूलभूत तत्त्वांवर आधारलेले आहे. त्यामुळेच या शिक्षणाला बेसिक एज्युकेशन असेही म्हणतात. ही योजना वर्धा शिक्षण योजना या नावाने ओळखली जाते. तसेच मूलोद्योगी राष्ट्रीय शिक्षण असे नाव सुद्धा या योजनेला दिले जाते. महात्मा गांधीजी या योजनेला ग्रामोद्योगी राष्ट्रीय ग्रामशिक्षण असे म्हणत असत.

**मुलोद्योगी शिक्षणाची उद्दिष्टे :**

१) शिक्षणातून सुजाण जागरूक नागरिक म्हणजे आदर्श नागरिकत्व घडविण्यास मदत करणे.

२) भारतीय संस्कृतीत परंपरेबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात प्रेम निर्माण व्हावे म्हणून विद्यार्थ्यांचा संस्कृतिक दृष्टिकोन विकसित करणे.

३) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे. मुलोद्योगी शिक्षणामध्ये नम्रता, कर्तव्यदक्षता, सहनशीलता, चारित्र्यनिर्मिती या सर्वांचा विकास करण्याचे ध्येय ठेवलेले होते.

४) विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक स्वावलंबन निर्माण करण्यास मदत करणे.

५) मुलोद्योगी शिक्षणाच्या माध्यमातून सर्वोदय समाजाची स्थापना करणे. श्रमाला महत्त्व देणे.

६) विद्यार्थ्यांचा नैतिक विकास करणे.

**मुलोद्योगी शिक्षणाचा अभ्यासक्रम :**

भारतीयांसाठी आवश्यक असणाऱ्या शिक्षण पद्धतीचा विचार यात केलेला आहे त्यानुसार अभ्यासक्रम तयार केलेला आहे भारतातील मोठ-मोठ्या शिक्षण तज्ञांनी या योजनेचा अभ्यासक्रम तयार करण्यासाठी परिश्रम घेतलेले होते त्यामुळेच हा अभ्यासक्रम नाविन्यपूर्ण व कृतिशील झालेला होता त्याचे स्वरूप पुढील प्रमाणे

१. अभ्यासक्रमात मूलभूत हस्तव्यवसाय यांचा समावेश उदा. कात काम विणकाम मातीकाम लाकडी काम इत्यादी

२. मातृभाषेचा समावेश

३. गणित विषयाला प्राधान्य

४. सामाजिक शास्त्र-इतिहास भूगोल

५. सामान्य विज्ञान वनस्पतिशास्त्र जीवशास्त्र रसायनशास्त्र इत्यादी

६. कला -संगीत व चित्रकला

७. हिंदी-ज्या प्रदेशाची हिंदी मातृभाषा नाही त्यांनी अभ्यासावी

८. शारीरिक शिक्षण-व्यायाम कवायत खेळ इत्यादी .

या योजनेत इयत्ता पाचवी पर्यंत सहशिक्षण असावे असे सांगितलेले आहे तसेच मुला-मुलींसाठी पाचवीपर्यंत समान शिक्षण असावे त्यानंतर मुलींना स्वातंत्र्य दिले होते धार्मिक शिक्षणाला अजिबात स्थान दिले नव्हते.

महात्मा गांधीजी म्हणतात शांतता, सद्भाव व सहिष्णुता ही प्रगतीची लक्षणे आहेत. हे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजले पाहिजे तरच खऱ्या अर्थाने देश प्रगतीच्या वाटेवर येईल. यासाठी मूलोद्योग शिक्षण किंवा वर्धा शिक्षण योजना त्यांनी आखली आणि या माध्यमातून शिक्षणाला प्राधान्य दिले. शांतता हे महात्मा गांधीजींच्या संदर्भातील राष्ट्रीय ध्येय बनते. म्हणून महात्मा गांधीजी म्हणतात जोपर्यंत भारत स्वतंत्र नाही, तोपर्यंत तो जगात शांततेचा हिस्सा होऊ शकणार नाही. यावरून गांधीजी ज्या स्वतंत्र भारताचा विचार करतात त्यात भारताचे मूळ तत्व शांतता आहे. जेथे सत्य आणि अहिंसेचेला सर्वोत्तम स्थान आहे. यासाठी

देशातील प्रत्येक नागरिक साक्षर झाला पाहिजे. त्याचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. यासाठी गांधीजींनी शिक्षण योजना सुरू केली. ते करत असताना शांतता व अहिंसा या दोन गोष्टींना खूप महत्त्व दिलेले आपणाला दिसून येते.

**निष्कर्ष**

१. महात्मा गांधीजींनी सामाजिक कार्य करताना अहिंसेला महत्व दिले.
२. हिंसेच्या मार्गने कोणतेही काम यशस्वी होत नाही हे महात्मा गांधीजींनी सांगितले.
३. हिंसा हेच अशांततेचे प्रमुख कारण होते त्यासाठी अहिंसा हाच सत्याचा मार्ग आहे असे गांधीजी म्हणत.
४. स्त्री शिक्षणाला विशेष प्राधान्य दिलेले दिसते.
५. मुल उद्योगी शिक्षण योजना ही विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणारी योजना आहे.
६. अहिंसा आणि शांततेच्या माध्यमातून गांधीजींनी शैक्षणिक कार्याचा विकास केला.

**संदर्भ ग्रंथ-**

१. शिक्षण तरंग- डॉ. किशोर चव्हाण, सप्टेंबर आणि ऑक्टोबर 2011
२. www.aiirjournal.com Ayush international inter disciplinary research journal (AIIRJ)
3. https://marathibhau.com
४. भारतीय शिक्षणाचा विकास-डॉ. मोहन जाधव, प्रा. आरती भोसले, प्रा प्राची सरपोतदार, फडके प्रकाशन कोल्हापूर.

# स्वतंत्र भारतापूर्वीच्या शिक्षणावरील धोरणात्मक आराखडा आणि विविध शिक्षण पध्दती

**प्रा. डॉ. ज्योत्स्ना भागवतराव गव्हाणे**
M. Sc.(Organic Chemistry)., M.Ed., DSM., Ph.D.(Education)
[सहाय्यक प्राध्यापक विज्ञान अध्यापन पद्धती]
राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालय, लातूर

**गोषवारा:**

*भारतीय संस्कृती ही जगातील फार पुरातन व महत्त्वपूर्ण अशी संस्कृती समजली जाते. विद्वान, विचारवंत आणि संशोधक यांच्या मते, भारतीय संस्कृतीला फार मोठे स्थान आहे. कोणत्याही देशातील संस्कृतीच्या स्वरूपावरून त्या देशापुढे असणारे आदर्श व त्या देशाचा झालेला उत्कर्ष याचा अंदाज घेता येतो आणि विशेषतः आजच्या प्रमाणे संस्कृतीच्या प्रसारास परिपोषक अशी वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन, चित्रपट इत्यादी साधने अस्तित्वात नव्हती त्या काळात ज्ञान व परंपरा यांच्या प्रसाराचे शिक्षण हे एकमेव साधन होते. स्वातंत्र्य पूर्व काळात शिक्षणाचा विकास, सार्वजनिक वाचनालयाचा विकास, मुलभूत शिक्षण याबाबत विचार मांडण्यात आला आहे.*

***कीवर्ड:*** *धोरणात्मक आराखडा, वैदिक प्रणाली, बौद्ध प्रणाली, जैन धर्म प्रणाली, मूलभूत शिक्षण,*

**प्रस्तावना:** स्वतंत्र भारतापूर्वीच्या शिक्षणावरील धोरणात्मक आराखडा आणि विविध शिक्षण पध्दती पुढील प्रमाणे आहेत.



1. वैदिक प्रणाली



2. बौद्ध प्रणाली



3. जैन धर्म प्रणाली

स्वातंत्र्य पूर्व काळात शिक्षणाचा विकास, सार्वजनिक वाचनालयाचा विकास, मुलभूत शिक्षण

## 1. वैदिक प्रणाली:

**वैदिक शिक्षण पद्धती:-** वेदांना श्रुती म्हणून ओळखले जाते. वेद म्हणजे बुद्धीचे ज्ञान होय.

१. **शिक्षणाचे ध्येय:** अध्यात्मिक व्यक्तिमत्व हा वेद तत्वज्ञानाचा केंद्रबिंदू आहे. वैयक्तिक व्यक्तिमत्वाचा आदर करणे, विद्यार्थ्यांच्या अंगभूत क्षमता आणि उदात्त गुणांचा विकास यासोबतच सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव निर्माण करणे हे शिक्षणाचे मुख्य ध्येय आहे.

२. **अभ्यासक्रम:** वैदिक अभ्यासक्रमात वेद उपनिषदे, शिक्षा, कल्प, उयकर्ण, निरक्त, रामायण आणि महाबर्थ, पंचकाव्य, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र इत्यादींचा समावेश आहे. शिक्षकाने या सर्व विद्यार्थ्यांना सर्व काही शिकवले नाही. प्रत्येक विद्यार्थ्याची योग्यता आणि क्षमतेनुसार शिक्षकाने योग्य गोष्टी शिकवल्या.

३. **गुरुकुल शिक्षण प्रणाली:** मुलांना त्यांचे विद्यार्थी दिवस ब्रभाचार्य आणि आश्रम नावाचे गुरूचे निवासस्थान घालवावे लागले. वयाच्या सातव्या वर्षी उपनयन नावाचा दीक्षा सोहळा. एका वर्षाच्या परिवीक्षा कालावधीनंतर शिक्षकाने विद्यार्थी स्वीकारला आहे. आश्रमात मोफत भोजन, कपडे, राहण्याची सर्व सोय करण्यात आली होती. विद्यार्थी शिक्षकांबद्दल अत्यंत आदराने वागले आणि शिक्षकाच्या कुटुंबाला मदत केली.

४. **अध्यापनाच्या पद्धती:** तोंडी स्पष्टीकरण, पठण, स्मरण आणि प्रात्यक्षिक. संस्कृत हे शिक्षणाचे माध्यम होते. विद्यार्थ्यांनी श्रवण (श्रवण) मनन (प्रतिबिंब) आणि निदिद्यासार (ध्यान) या ज्ञानात प्रभुत्व मिळवण्याच्या पद्धती वापरल्या. चर्चा आणि वादविवादही झाले.

५. **शिक्षक:** शिक्षकांना गुरु नावाने ओळखले जाऊ लागले. ते चारित्र्यसंपन्न होते. ते त्यांच्या शिष्यांसाठी जिवंत आदर्श होते. उपनिषदांच्या मते, आत्मनिरीक्षण, शिक्षकाची ईश्वर आणि शिक्षकाची दीक्षा (मार्गदर्शन) भक्ती ही व्यक्तीच्या आत्मसाक्षात्कारासाठी आवश्यक आहे.

**वैदिक शिक्षणाचे गुण आणि दोष:**

**गुण-** १. सर्व विद्यार्थ्यांसाठी शिक्षण आहे.

२. शिक्षण शिकण्याची प्रक्रिया नैसर्गिक वातावरणात झाली.

३. विद्यार्थ्यांनी चैनीच्या गोष्टी टाळून ब्रह्मचर्याचे साधे आणि शुद्ध जीवन जगले.

४. शिक्षकांमध्ये घनिष्ट संबंध होते आणि त्यानुसार शिक्षण दिले जात होते.

५. शिक्षकांना उच्च आदर आणि प्रतिष्ठेची आज्ञा दिली जात असे.

**दोष:** १. शिक्षण फक्त ब्राह्मणांनाच दिले जात असे.

२. महिला शिक्षणाला महत्त्व दिले जात नाही.

३. शिक्षणाचे माध्यम संस्कृत असून त्याला कोणतेही महत्त्व दिले जात नाही.

४. काहींनी शिक्षकांच्या घरगुती कार्यात विद्यार्थ्यांनी केलेली सेवा गुलामगिरी मानली.

५. वेदांना अभ्यासक्रमात महत्त्व दिले गेले.

2. **बौद्ध प्रणाली:**

**बौद्ध शिक्षण पद्धती:-** बौद्ध धर्माची स्थापना भगवान बुद्धांनी केली होती.

१. **शिक्षणाचे ध्येय:** या शिक्षणपद्धतीत वेद आणि कर्मकांडांना महत्त्व दिले जात नव्हते तर चांगले आचरण आणि साधे जीवन याला महत्त्व दिले जात होते.

२. **अभ्यासक्रम:** बौद्ध अभ्यासक्रमामध्ये वैद्यकशास्त्र, खगोलशास्त्र, गणित, शिल्पकला, चित्रकला इत्यादी व्यावहारिक जीवनातील उपयुक्तता या विषयांचा समावेश होतो. 3R च्या मूलभूत कौशल्यांना (वाचन, लेखन आणि अंकगणित) देखील महत्त्व देण्यात आले.

३. **शिक्षण प्रणाली:** मठामध्ये राहणारे बुद्ध भिक्षू हे शिक्षक-शिष्य होते ते कोणत्याही जातीचा भेदभाव न करता पप्पजा नावाचा दीक्षा समारंभ पूर्ण केल्यानंतर, बुद्ध विहारांमध्ये (मंदिरांमध्ये) सामील झाले आणि १२ वर्षे शिक्षणात घालवली. त्यांच्या पालकांच्या परवानगीने २० वर्षांचे. महिलांना शिकण्याची समान संधी विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षणासाठी आणि राहण्यासाठी फी भरून दिली.

४. **अध्यापनाच्या पद्धती:** मौखिक प्रदर्शन, गटचर्चा आणि वादविवाद, ध्यान अशा अनेक अध्यापन पद्धती होत्या. पाली ही लोकांची भाषा होती. त्यामुळे शिक्षणाचे माध्यम म्हणून पाली भाषेचा वापर केला जात असे.

**५. शिक्षक:**

- ➢ बुद्ध बिक्षू हेच शिक्षक होते.
- ➢ ते मठात राहत होते.
- ➢ विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या विषयांचा अभ्यास करण्याचे स्वातंत्र्य होते.
- ➢ विद्यार्थ्यांनी बौद्ध भिक्खूंच्या नेतृत्वाखाली प्रवास केला आणि परिसंवाद आणि वादविवादांमध्ये भाग घेतला.

**बौद्ध शिक्षण पद्धतीचे फायदे:**

१. कोणत्याही लिंग आणि जातीचा भेदभाव न करता विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रवेश देण्यात आला.
२. वेद आणि कर्मकांडांवर दावा करण्यात आला (विरोध).
३. औषधी, चित्रकला, शिल्पकला, गणित आणि खगोलशास्त्र यांसारख्या मानवी उपयुक्ततेच्या विषयांना महत्त्व देण्यात आले.
४. लोकांची पाली भाषा शिक्षणाचे माध्यम म्हणून वापरली जात होती.
५. बुद्ध बिक्षू हे शिक्षक होते.
६. सदाचारी आचरण आणि शुद्ध जीवनावर भर दिला गेला.

**3. जैन धर्म प्रणाली:**

**जैन धर्माची शिक्षण प्रणाली:-** जैन धर्म या शब्दाचे मूळ जिना आहे, ज्याचा अर्थ विजेता आहे. धर्म महावीर (५९९-५२७ B.C). जैन धर्महीदेव मानण्यास नकार देतो. पुढे ते ईश्वरातील ब्रह्म या संकल्पनेचे समर्थन करते. त्यामुळे जैन धर्म हा मध्यमार्ग मानला जाऊ शकतो.

**१. शिक्षणाचे ध्येय:** शिक्षणाच्या उद्देशाने प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास. त्यात कोणतेही पूर्वनिर्धारित निरपेक्ष देव नाहीत. त्याचा विकासावर विश्वास आहे.
**२. शिक्षण प्रणाली:** शिक्षकांसह विद्यार्थ्यांचे निवासी राहणीमान ताणले गेले. हे शिक्षणाच्या गुरुकुल पद्धतीप्रमाणे आहे.
**३. अध्यापनाच्या पद्धती:** वादविवाद आणि चर्चेचा वापर केला गेला, कारण सूचना लक्षात ठेवण्याच्या पद्धती शिकण्यात प्रमुख स्थान देतात. मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम होते. केवळ तोंडी पुस्तके लिहून देऊ नका.
**४. शिक्षक:** जैन धर्मानुसार शिक्षकांकडून उच्च गुणांची अपेक्षा होती. विद्यार्थ्यांना कडक शिस्त होती.

**स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षणाचा विकास:**

**मॅकॉले मिनिट (१८३५):** त्यावेळी इंग्रजी हे शिक्षणाचे माध्यम होते. भारतातील शैक्षणिक धोरणाचा उद्देश इंग्रजी माध्यमातून पाश्चिमात्य ज्ञानाचा प्रसार हा असावा अशी शिफारस केली.

**वुड्सचा खलिता (१८५४):**

१. पाश्चात्य ज्ञानाच्या प्रगतीची खात्री देणारी आधुनिक शैक्षणिक प्रणाली सुरू केली होती.
२. शिक्षणाचे माध्यम म्हणून इंग्रजी वापरण्याची शिफारस केली होती.
३. मद्रास, कलकत्ता आणि बॉम्बे (मुंबई) येथे विद्यापीठांची स्थापना करण्यात आली.
४. संपूर्ण भारतामध्ये श्रेणीबद्ध शाळेच्या नेटवर्कची संस्था निर्माण करण्यात आली.
५. शिफारशींमध्ये अनुदान प्रणालीचा परिचय, शिक्षित रोजगारासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण आणि महिला शिक्षण यांचा समावेश करण्यात आला होता.

**भारतीय शिक्षण आयोग १८८२: / हंटर्स कमिशन:**

१. काही टक्के गरिबांना मोफत शिक्षण देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले होते . यामध्ये इंग्रजी हे शिक्षणाचे माध्यम राहिल असे सांगितले होते.
२. परदेशात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

३. मुस्लिम व महिला, मागासवर्गीय, जमाती आणि इतर निम्न वर्गासाठी विशेष शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या होत्या.

**सार्जेंट अहवाल (१९४४):**

केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाला (Central Advisory Board of Education) युद्धोत्तर शैक्षणिक विकास योजना तयार करण्यासाठी बोलावण्यात आले. भारतासाठी राष्ट्रीय शिक्षण प्रणालीची योजना करण्याचा हा पहिला अधिकृत प्रयत्न केला होता. वय वर्षे ३ ते ६ वयोगटासाठी पूर्व-प्राथमिक शिक्षण. ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांसाठी सार्वत्रिक, अनिवार्य आणि मोफत प्राथमिक किंवा मूलभूत शिक्षणाची सोय करण्यात आली होती. कनिष्ठ मूलभूत (६-११) आणि वरिष्ठ मूलभूत (११-१४). ११ ते १७ वयोगटातील निवडक मुलांसाठी ६ वर्षे हायस्कूल शिक्षणाची सोय करण्यात आली होती. उच्च माध्यमिक परीक्षेनंतर निवडलेल्या विद्यार्थ्यांसाठी ३ वर्षांचा विद्यापीठ अभ्यासक्रमाची सुविधा निर्माण होती. पुरेशा प्रमाणात पूर्णवेळ आणि अर्धवेळ तांत्रिक, व्यावसायिक आणि कला अभ्यासक्रम सुरू करण्यात आले होते.

**सार्वजनिक वाचनालयाचा विकास:**

१. शिक्षकांच्या योग्य प्रशिक्षणासाठी संपूर्ण तरतूद करण्यात आली होती.
२. अनिवार्य शारीरिक शिक्षण आणि वैद्यकीय तपासणीचे आयोजन व रोजगार ब्युरोची निर्मिती केली होती.
३. शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अपंग मुलांसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. सामाजिक आणि मनोरंजक क्रियाकलापांची तरतूद करण्यात आली होती.

**मूलभूत शिक्षण (Basic Education):**

प्रत्येक शाळेने उपलब्ध स्थानिक साहित्य आणि संसाधनांसह कार्य करावे. नई तालीम मध्ये सर्व शाळांचे विषय निवडलेल्या हस्तकलेद्वारे शिकवले जातील. विणकाम आणि सूतकताईच्या माध्यमातून इतर ग्रामीण कलाकुसरीलाही शिक्षणाचे माध्यम तितकेच स्वीकार्य करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी त्यांची मातृभाषा आणि हस्तकलेमध्ये पारंगत व्हावे असे वाटत होते. अध्यापन करत असताना श्रवण करणे, शेवटी हस्तकलेमध्ये कौशल्ये विकसित करणे, आठ वर्षांचे शिक्षण म्हणजे ते स्वतःचे व्यवसाय म्हणून स्वीकारणे, हे मूलभूत शिक्षणाचे चिन्ह आहेत. (१९३७ मध्ये वर्धा शिक्षण प्रणाली)

१. **शिक्षणाचे ध्येय:** शिक्षण हे शारीरिक, बौद्धिक, सौंदर्यात्मक नैतिक आणि आध्यात्मिक सर्वांगीण विकास आहे. नागरिकत्व निर्माण चारित्र्य देण्याचे प्रशिक्षण देणे आहे. व्यावसायिक प्रशिक्षण आणि संस्कार देणे.
२. **अभ्यासक्रम:** अभ्यासक्रमाचा आवश्यक भाग म्हणून हस्तकला, हस्तकला हा अतिरिक्त विषय म्हणून नाही तर शिक्षणाचे माध्यम म्हणून तरतूद करण्यात आली होती. शिक्षणाचा क्राफ्ट पूर्वाग्रह सहकारी क्रियाकलाप, वैयक्तिक जबाबदारी, पुढाकार अचूकता आणि भावनिक आत्मियता (अत्यंत किंवा शेवट) ही तत्त्वे लागू असेल.
३. **शिक्षण पद्धती:** हस्तकला शिक्षणात मध्यवर्ती स्थान देण्यात आले होते. अभ्यासाच्या इतर विषयांबरोबरच हस्तकला हा विषय म्हणून शिकला जात नाही. मूलभूत शिक्षणामध्ये सर्व विषय परस्परसंबंध पद्धतीचा वापर करून निवडलेल्या हस्तकलेतून शिकवले जातात. हे सर्व ज्ञान एकत्रित करेल आणि रॉट मेमरी (Rote Memory) म्हणजे गोष्टींची पुनरावृत्ती करून शिकण्याची प्रक्रिया, तुम्ही पुनरावृत्ती करून लक्षात ठेवण्याऐवजी स्वयं-क्रियाकलाप प्रोत्साहित करेल. आत्म-अनुभव हस्तकलेतून मिळवले जातात. मूलभूत शिक्षणाला "हस्तकला-केंद्रित शिक्षण" असे संबोधले जाते.
४. **शैक्षणिक नियोजन:** गांधीजींना ७ ते १४ वयोगटातील संपूर्ण भारतीय लोकसंख्येसाठी मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण हवे होते.
५. **शिक्षकाची भूमिका:** शिक्षकांकडे केवळ व्यावसायिक प्रशिक्षण आणि विषयात प्राविण्य नसून त्यांच्या कामात निष्ठा आणि समर्पण असले पाहिजे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षकांना पर्यायी पालक मानले पाहिजे आणि अत्यंत आदर दाखवला पाहिजे.

**६. मूलभूत शिक्षणाची वैशिष्ट्ये:**

i] ७-१४ वयोगटातील सर्व मुला-मुलींसाठी मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची गरज आहे.

ii] शिक्षणाचे केंद्र म्हणून हस्तकला निवडली होती.

iii] गांधीजींनी परस्परसंबंधाच्या तत्त्वाची शिफारस केली. सर्व ज्ञानाचा हस्तकलेशी संबंध असावा अशी त्यांची इच्छा होती.

iv] शैक्षणिक प्रक्रियेची उत्पादकता-शिक्षणाचा स्वयं-समर्थक पैलू आहे.

v] समाजाची साधी राहणी सहकार्याची अपेक्षा होती.

vi] मुलांची मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम असावे.

vii] धर्म आणि नैतिक प्रशिक्षण यावर भर देण्यात यावा.

**निष्कर्ष:**

स्वतंत्र भारतापूर्वीच्या शिक्षणावरील धोरणात्मक आराखडा आणि विविध शिक्षण पध्दती मध्ये वैदिक प्रणाली, बौद्ध प्रणाली, जैन धर्म प्रणाली, मूलभूत शिक्षण इत्यादी शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करण्यात आला आहे.

**संदर्भ सूची:**

१. गद्रे प्रा सौ. गीता लक्ष्मण, गद्रे प्रा लक्ष्मण रामचंद्र (१९९०), शिक्षणाचा इतिहास, पूणे, नूतन प्रकाशन

२. जगताप बा. ग.,(१९८६), भारतीय शिक्षणाचा इतिहास, पूणे, मॅकमिलन अँन्ड कंपनी लिमिटेड

3. Bokil V. P. (1977), The History of Education in India, Bombay, Hind Kitab Limited

4. Report of Education Commission, Ministry of Education Government of India

# ज्ञानरचनावाद आणि गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचा शैक्षणिक अभ्यासक्रम विषयक दृष्टिकोन

**प्रा.परमेश्वर माणिकराव वाकडे**
डॉ.एस.एस.एम.पी.कॉलेज ऑफ एजुकेशन,
अहमदपुर

**गोषवारा (Abstract):-**

स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील भारतीय शिक्षण व्यवस्थेचे स्वरूप पाहता भारतीय शिक्षा व्यवस्थेचे साधारणतः चार टप्प्यात विभाजन होते.ज्या पद्धतीने शासनव्यवस्था बदलल्या, शासक बदलले, त्यानुसार भारतीय शिक्षण व्यवस्थेतही बदल होत गेले. वैदिक कालापासून ते ब्रिटिश काळापर्यंत शिक्षणामध्ये अनेक बदल दिसून येतात. वैदिक कालीन शिक्षण पद्धती, बौद्धकालीन शिक्षण पद्धती व मध्यकालीन शिक्षण पद्धती कुठेतरी अध्यात्मिक व नैतिक, व्यक्तीमत्व विकासावर, नैसर्गिक ज्ञानावर आधारित होती. मूल्यावर जोर देणारी होती तसेच व्यक्तीच्या विचारांना व त्याच्या स्वातंत्र्याला जपणारी होती परंतु ब्रिटिश काळामध्ये शिक्षण पद्धतीत बदल झाले. त्यांनी शासन करण्यासाठी कर्मचारी निर्माण होतील या अनुषंगाने शिक्षण पद्धतीची रचना केली. असे असले तरीही याच कालावधीत अनेक भारतीय विद्वानांनी भारतीय सांस्कृतिक किंवा भारतीय विचारधारेच्या अनुषंगाने शिक्षणव्यवस्थेला रूप देण्याचा प्रयत्न केला. त्यातीलच महात्मा फुले, स्वामी विवेकानंद, रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आदी विद्वानांनी आपले शिक्षण विषयक विचार अमलात आणुन भारतीय शिक्षण पद्धतीला जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला. या विचारांचा स्वातंत्र्यानंतर आजच्या ज्ञानरचनावादी शिक्षण पद्धतीवर सुद्धा त्याचा प्रभाव आपल्याला पाहायला मिळतो. प्रस्तुत लेखात रवींद्रनाथ टागोर यांच्या शैक्षणिक विचारांचा प्रभाव आजच्या ज्ञानरचनावादी शिक्षण पद्धतीशी साम्य दर्शवितो.

**ज्ञानरचनावाद:-**

ज्ञानरचनावाद ही शिक्षण शास्त्रातील नव-संकल्पना असून ती एक अध्ययनाचे तत्वज्ञान आहे. ज्यामध्ये ज्ञानाची रचना ही आपल्या अनुभवांच्या परावर्तनामध्ये होते. यानुसार विद्यार्थी स्वतःचे ज्ञान स्वतः स्वरचित करतात. थोडक्यात पूर्वज्ञान व पूर्वानुभव यांच्या आधारे नवीन ज्ञानाची किंवा संकल्पनेची रचना-निर्मिती करणे, म्हणजे ज्ञानरचनावाद होय.

मार्श यांच्यामते, 'ज्ञानरचनावाद ही एक उपपत्ती आहे. यामध्ये अध्ययनार्थी स्वतःला आलेल्या अनुभवांच्या आधारे ज्ञानाची रचना कसे करतो, याचा विचार केला जातो'.

फॉसनॉट यांच्या मते, 'ज्ञानरचनावाद ही ज्ञान व अध्ययन या संदर्भातील उपपत्ती असून ती काय माहिती करून घ्यायची आणि एखादी माहिती कशी प्राप्त करून घेतो, याविषयीचे विवेचन करते.'

ज्ञानरचनावाद हे राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (एनसीएफ २००५) याचा पाया असून बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षण हक्क अधिनियम २००९ मधील कलम २९ मध्ये ज्ञानरचनावादाची तत्वे आढळतात.

**ज्ञानरचनावादाची गृहितके :**

(१) अनुभवातून ज्ञानाची रचना होते.
(२) अध्ययन ही एक कृतीयुक्त प्रक्रिया असून यामध्ये अनुभवाद्वारे अर्थनिर्मिती होते.
(३) सहकार्यात्मक अध्ययनात प्रत्येकाने अनुभवांवर आधारित लावलेल्या अर्थानुसार चर्चेद्वारे आंतरक्रिया घडते. त्यामुळे स्वत:चे विचार बदलून अचूक संकल्पनेवर धारणा पक्की होते. संकल्पना अधिक स्पष्ट होतात.
(४) 'अध्ययन' हे वास्तववादी वातावरणामध्ये घडले पाहिजे, मूल्यमापन हे अध्ययन प्रक्रियेचाच एक भाग असले पाहिजे, ते वेगळे असता कामा नये.
(५) अध्ययनार्थ्याकडून ज्ञानाची क्रियाशील रचना केली जाते.
(६) माहिती होणे किंवा माहिती करून घेणे ही अध्ययनार्थ्यांच्या अनुभवांशी सभोवतालच्या जगाचे संघटन व समायोजन साधण्याची प्रक्रिया आहे.
(७) अध्ययनार्थी स्वतंत्र जगाचा शोध त्याच्या मनाशिवाय घेऊ शकत नाही. म्हणजेच, शोध हा अध्यनार्थ्यांच्या मनामध्ये कल्पनेद्वारे घेतला जातो.

**गुरुदेव रवींद्रनाथ टागोर**

**मेरा मस्तक अपनी चरण दूरी तक झुका दे प्रभु।**
**मेरे समस्त अहंकारों को आंखों के पानी में डूबा दे प्रभु।।**

ईश्वरावर श्रद्धा असणाऱ्या व अहंकाराचा वारा लागू न देणाऱ्या अशा कौटुंबिक वातावरणात वाढलेली रवींद्रनाथ. 'गीतांजली' ने नोबेल पारितोषिक विजेतेपद प्राप्त झालेले रवींद्रनाथ 'जन्म कर्मेच दिव्यम' होते.

**शिक्षणविषयक विचार**

केवळ चार भिंतीच्या आत शिस्तीच्या बडग्याखाली दिले जाणारे शिक्षण हे शिक्षण नाही. अशा शाळा स्वातंत्र्य हरवून बसलेल्या पोपट बनवणाऱ्या संस्था होय. टागोरांच्या मते-

१) शिक्षणव्यवस्थेत माणसाच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्व अंगभूत तत्वांचा समग्रपणे विचार झाला पाहिजे.
२) 'जीवधर्म व समाजधर्म या दोहोंनाही आत्मोन्नतीशी अनुकूल करून घेण्याचे साधन म्हणजे शिक्षण'.
३) गुरुदेव स्वातंत्र्याचे, व्यक्तीस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. त्यांना छडीची, बडग्याची, धाकाची शिस्त मान्य नव्हती तर त्यांना स्वयंशिस्त अपेक्षित होती.
४) ब्रह्मचर्यपालन हेच खरेखुरे नैतिक शिक्षण आहे. धार्मिक शिक्षणाची, नैतिक शिक्षणाची ती अप्रत्यक्ष अध्यापन पद्धती आहे. हे अप्रत्यक्ष शिक्षण विद्यार्थ्याला गुरुकुलातच मिळेल.
५) खरे शिक्षण ते की जे शिक्षणाचा-ज्ञानाचा जीवन व्यवहाराशी संबंध जोडून देते. जीवन जगायला आर्थिक, सामाजिक, शारीरिक, मानसिक दृष्टीने सक्षम बनविते. अशाच शिक्षणाची गुरुदेव अपेक्षा करतात.

**ज्ञानरचनावाद आणि रवींद्रनाथ टागोर यांच्या शैक्षणिक विचारांतील साम्य**

**उद्दिष्टे:-**

१) बालकाच्या अमाप उत्साह शक्तीला वाव देऊन, परिसरात ज्याच्या गोष्टी आहेत त्यापासून जे जे नवीन निर्माण करता येईल, त्यासाठी मुक्त संधी देणे.
२) निसर्गाचे सान्निध्य मिळायला हवे.
३) घरगुती व्यावसायाला आवश्यक असणारा, हस्त व्यवसायाची कौशल्य संपादन करण्यास संधी देतो. हाताने वस्तू करू द्या, स्वतः अनुभव घेऊ द्यावा.
४) शिक्षणाने भविष्यातील आर्थिक स्थैर्य, स्वावलंबन या विषयीचा आत्मविश्वास निर्माण करणे.
५) परिसराच्या, समाजाच्या निरीक्षणातून, अभ्यासातून विविध विषयांची ओळख करून देणे.
६) प्रौढ जीवनाचे अनुभव बीजरूपाने मिळणारे शाळा हे एक व्यावहारिक उद्योगाचे केंद्र असावे.
७) विद्यार्थ्याला आपल्या सामाजिक कार्याची जाणीव करून देऊन त्याचे महत्व पटवून देणे.
८) या सर्व शिक्षणासाठी प्रयोग करण्यास संधी देणे, सहसाचे प्रसंग निर्माण करणे, कल्पकतेला वाव देणे, नवनिर्मितीचा स्वीकार करून सार्थ प्रेरणा देणे महत्त्वाचे.

वरील सर्व उद्दिष्टे कुठे ना कुठे तरी आजच्या ज्ञानरचनावादी शिक्षण पध्दतीशी जुळलेली पाहायला मिळतात. ज्ञानरचनावादी शिक्षणामध्ये ही विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला संधी देणे, त्यांच्यात असलेल्या विविध बुद्धिमत्ता यांचा त्यांनाच शोध घेऊ देणे, केवळ लेखन, वाचन, पाठांतर, वेगवेगळ्या लेखी चाचण्या यावर भर न देता त्यांना त्यांच्या कल्पकतेचा वापर करण्यास भाग पाडून विविध विषयांचे आकलन स्वतःलाच करण्याची संधी देणे इत्यादी तंत्राचा वापर करून विद्यार्थ्यांना शिकविणे अपेक्षित आहे.

**अभ्यासक्रम विषयक दृष्टिकोन:-**

गुरुवर्य रवींद्रनाथ टागोर निसर्गसौंदर्याच्या कुशीत शांतिनिकेतन, विश्वभारती, व निकेतन, या तीन विद्यामंदिराची स्थापना करणारे अग्रदूत होते. त्यांच्या मते, शालेय अभ्यासक्रम हा जीवनाभिमुख असला पाहिजे. अभ्यासक्रमात भाषा, साहित्य, मातृभाषा, परभाषा, गणित, विज्ञान, रसायन, वनस्पतिशास्त्र, धर्म,मानसशास्त्र या विषयाप्रमाणेच नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, समाजसेवा इत्यादी घटकांचा आवर्जून समावेश केलेला आहे.

शांतिनिकेतन मध्ये विज्ञानाचे शिक्षण देणे प्रथम सुरू झाले. उत्कृष्ट व सुसज्ज अशा प्रयोगशाळेची सोय येथे केलेली होती. गायन, कविता, कथा यामधून भूगोल, इतिहास शिकविला जातो. सार्थ पृथ्वीचे प्रेमगीत या कवितेत पृथ्वीचे सूर्याभोवतीचे भ्रमण काव्यात्मक भाषेत वर्णिलेले आहे. नाट्यीकरण प्रसंग सादरीकरण, विविध प्रकारचे हस्तव्यवसाय, त्यासाठी साधने व

जागेची उपलब्धता आहे. उदाहरणार्थ बांधकाम, विणकाम, शिवणकाम, सुतारकाम, चर्मकार्य, पुस्तक बांधणी, खेळणी तयार करणे, मुलांना आयती खेळनी देण्याच्या विरोधात ठाकूरजी होते. मुलांनी स्वतः हाताने खेळणी तयार करावी, शिक्षकांनी कल्पकता मार्गदर्शन करावे. क्रियाशीलतेवर भर होता. अजूनही शांतिनिकेतन मध्ये ललित कलांचे शिक्षण प्रामुख्याने दिले जाते. सुधारित राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याच्या मसुद्याची सुरुवात रवींद्रनाथ टागोर यांच्या 'संस्कृती आणि प्रगती' या निबंधातील पुढील ऐका अवतरणाने होते.

"सर्जक वृत्ती आणि निस्वार्थीपणाचा निखळ आनंद हे बालपणी कळीचे असतात. आणि हे दोन्हीही अविचारी प्रौढ जगामुळे विकृत होऊ शकतात."

ज्ञानरचनावाद हे राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (एनसीएफ २००५) याचा पाया असून बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षण हक्क अधिनियम २००९ मधील कलम १९ मध्ये ज्ञानवादाचे तत्वे आढळतात. 'शिकणे' हे मुलावरील बोजा व ताणाचा स्त्रोत बनले आहे. ही शिक्षणाची ध्येये आणि गुणवत्ता यात गंभीर विकृती निर्माण झाल्याचेच द्योतक आहे. या विकृतीत दुरुस्त करण्यासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यात पुढील मार्गदर्शक तत्त्वे सांगितली आहेत.

१) ज्ञानाचे नाते शाळेबाहेरील जीवनाशी जोडणे.
२) 'शिकणे' हे घोकंपट्टी पद्धती पासून फारकत घेईल याची खात्री करणे.
३) अभ्यासक्रम असा समृद्ध करणे की ज्यामुळे तो पाठ्यपुस्तकांच्या मर्यादेपलीकडे जाईल.
४) परीक्षा जास्त लवचिक करणे व वर्गातील नित्य जीवनाचा तो एक भाग होतो.

**राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या आराखड्यानुसार शालेय अभ्यासक्रमात पुढील बदल सुचविले आहेत.**

- मुलांना एकात्मिक ज्ञानाचा आस्वाद घेता येईल. आणि आकलनाचा आनंद मिळवता येईल.
- स्थानिक ज्ञान व पारंपारिक कौशल्यांचा समावेशासह बनवलेली पाठ्यपुस्तके व इतर साहित्याची बहुविधता आणि अशा शाळेतील रसरशीत जिवंत वातावरणाची गरजही सुचवण्यात आली.
- भाषाभ्यासात त्रिभाषा सूत्र लागू करण्यासाठी पुन्हा प्रयत्न करावेत असे सुचविले.
- मुलांची मातृभाषा हे शिक्षणाचे सर्वोत्कृष्ट माध्यम म्हणून मान्यता देण्यावर भर दिला आहे.
- विज्ञान अध्यापनाची पुनर्बांधणी अशा प्रकारे केली पाहिजे की, विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन अनुभवाचे परीक्षण व विश्लेषण करता येईल.
- पर्यावरणासंबंधी जाणीव प्रत्येक विषयात आणि वर्धा बाहेरील प्रकल्प कार्यासह विविध उपक्रमांमध्ये असे यावर भर दिला पाहिजे.
- सामाजिक शास्त्रांचा अभ्यास करताना लिंगभावात्मक न्याय, दलित व आदिवासी प्रश्न आणि अल्पसंख्यांकांच्या जाणीवा संबंधित संवेदनशीलता हे सर्व क्षेत्रात समाविष्ट केले जावेत.
- अभ्यासक्रमांच्या आराखड्यात काम, कला व पारंपारिक हस्तकला आरोग्य व शारीरिक शिक्षण आणि शांतता या क्षेत्राकडे सुद्धा लक्ष दिले आहे.

अशा प्रकारे गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांच्या शैक्षणिक अभ्यासक्रम विषयक दृष्टिकोनाचा प्रभाव आजच्या ज्ञानरचनावादी अभ्यासक्रमावर पडलेला दिसून येतो. ज्यात मुलांच्या नैसर्गिक क्षमतांचा, त्यांच्या पूर्व अनुभावांचा अंतर्भाव तसेच त्यांच्या विचार स्वातंत्र्याचाही विचार केलेला दिसून येतो.

**संदर्भ :**

1. पानसे, रमेश, रचनावादी शिक्षण, वाई, (२०१०).
2. बाम, राजश्री, मैत्री ज्ञानसंरचनावादाशी, पुणे, (२०१३).
3. डॉ.शालिनी कुलकर्णी, भारतीय व पाश्चात्य शिक्षणतज्ञ, नित्य नूतन प्रकाशन, पुणे.
4. डॉ. भुषण पाटील, डॉ. शोभा कागदे, डॉ. शुभांगी कुर्हाडे, सौ.कविता तोटे, भाषा, ज्ञान आणि अभ्यासक्रम, निराली प्रकाशन, जळगाव.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे शिक्षणविषयक विचार

**प्रा.विश्वास दौलतराव मोगरे**
सहा.प्राध्यापक,
प्रजासत्ताक अध्यापक महाविद्यालय, नागपुर

कलेकलेने चंद्र वाढावा तसा बाल माणिक वाढू लागला. माणिकदेव या जन्म नावाऐवजी गुरुदत्त तुकड्या नावच प्रचारात आले. शाळेत घातलं तरी 'शाळा कोण करी जावे नदीचिया तीरी' असा प्रकार. पण परिक्षेत मात्र पास. शिक्षणाकरिता वरखेड. यावली व चांदूरबाजार अशी त्रिस्थळी भ्रमंती त्यांना करावी लागली. कथा सांगणे, गणित सोडविणे व अभंग रचणे याची आवड त्यांना होती. ते कोणाचेही काम अपेक्षा न ठेवता करीत असत. चांदूर बाजारच्या विमलानंद भारतीकडून छंद गायन, हनवती बुवाकडून खंजिरी नि सातळी कोतळीकर महाराजांकडून योगासन आदि गोष्टी त्यांनी सहज अवगत केल्या.

वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी राष्ट्रवंदनेत केलेले दिसून येते.तारुण्याच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या मुली, बालीका तसेच स्त्रिया अजूनही अशिक्षित आढळतात. एक चांगली माता सांस्कृतिक शिक्षकापेक्षाही श्रेष्ठ असू शकते आणि जर ती शिक्षित असेल तर तिचा फायदा होऊ शकतो. अर्थार्जन करणारी स्त्री वैचारिक स्वातंत्र खरचं अनुभवते आहे का? हाही एक प्रश्नच आहे. गेली अनेक शतके गार्गी, मैत्रीयीच्या बुद्धिचातुर्याच्या अपवादात्मक उदाहरणाने सत्तेच्या पतिव्रत्यनिष्ठेने, द्रौपदीच्या सडेतोड वृत्तीने, सावित्रीच्या दृढ निश्चयाने स्त्रियांचा इतिहास सकस असल्याचा भ्रम निर्माण झाला. विवाहपूर्व कौमार्य बंधन व विवाहोत्तर पतिनिष्ठा या दुहेरी सुत्रात तिच्या आयुष्याची खुणगाठ बांधल्या गेली. त्यामुळे मुठभर स्त्रिया विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरण, नाट्य, कला, अभिनय, लेखन, पत्रकारिता या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असल्या तरी त्यांच्या बरोबरीने कित्येक स्त्रिया स्त्रीत्त्वाच्या कोषात. रिंगणात अडकल्या आहेत. आपल्या उद्धाराकरीता कोणी महात्मे येणार आहेत, या स्वप्नात स्त्रियांनी न राहता स्वतःसाठी संघर्ष व लढा देण्याचा विचार आज कृतित उमटवण्याची गरज आहे

विदर्भातील भूमीत अमरावती जिल्ह्यात अवतीर्ण झालेले तुकडोजी महाराज हे विसाव्या शतकात एक राष्ट्रसंत म्हणून उदयास आले. 30 एप्रिल 1909 ला अमरावती जिल्ह्यातील यावली येथे ब्रम्हमुहूर्तावर त्यांचा जन्म झाला. जन्मसमयी अचानक वादळ सुटून झोपडीवरील छप्पर उडून गेले. 'हे विश्वचि माझे घर' मानण्याकरिता हे बालक जन्माला आले आहे, असेच जणू नियतीने सुचविले. त्यांचे वडिल बंडोजी ठाकूर हे गुळाचा व्यापार व शिंप्याचा व्यवसाय करीत. पण त्यांची मिळकत अपुरी पडे. त्यांची माता मंजुळा हिला दळण कांडण करुन उदरनिर्वाह करावा लागत असे. याच सुमारास अकोटचे हरिबुवा व माधानचे गुलाबराव महाराज यांच्या उपस्थितीत वरखेड येथे 'माणिकदेव' असे नामकरण करण्यात आले.

भारतातील सर्व संतांनी स्त्रियांच्या उद्धाराविषयीची उत्कट तळमळ आपल्या साहित्यातून व्यक्त केली आहे. महर्षि अण्णासाहेब कर्वे, स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा फुले, स्वामी विवेकानंद, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज इ. थोर विचारवंतांचा स्त्री शिक्षण विषयक दृष्टीकोन अत्यंत शास्त्रशुद्ध प्रागतीक व पुरोगामी स्वरुपाचा आहे. संत कबीर म्हणतात,

'नारीको नींदो नहीं। नारी रतन की खान। इस नारीसे पैदा हुये। राम, कृष्ण, हनुमान।।

स्त्रीला अबला समजून तिला विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर ठेवण्यात आले. वं. राष्ट्रसताना भारतीय स्त्रीच्या या दुय्यम दर्जाबद्दल तिटकारा होता. स्त्रि आणि पुरूष हे समान आहेत,
भारतीय संस्कृती ही आईला गुरूपेक्षाही श्रेष्ठ मानते. तुकडोजींची या विषयीची ग्रामगीतेतील पुढील ओवी बोलकी आहे.

**'जिच्या हाती पाळण्याची दोरी। तीच जगाते उध्दरी।**
**ऐसी वर्णिली मातेची थोरी। शेकडो गुरुहूनिहि।'**

राष्ट्रसंतांचे स्त्री–विषयीचे हे गौरव उद्गार पाहिले की महात्मा फुल्यांच्या स्त्रीविषयीच्या मतांची आठवण होते. त्यांच्या मते या भूतलावर जेवढे काही जीव आहेत, ते सर्व समान आहेत. स्त्री असो वा पुरुष त्यामध्ये कोणताही भेद नाही. याउलट स्त्री ही मनुष्यास जन्म देत असल्यामुळे त्याचे पालनपोषण करण्याचे जिकरीचे काम ती करीत असल्यामुळे ती निःसंशय श्रेष्ठ आहे असे गौरव उद्गार त्यांनी काढलेत.

**शोध निबंधाचे शीर्षक : " राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे शिक्षणविषयक विचार "**

**शोध निबंधाची उद्दिष्ट्ये:**

प्रस्तुत शोध निबंधाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

1) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या शिक्षणविषयक विचाराचा अभ्यास करणे
2) तुकडोजी महाराज यांच्या शिक्षण विषयक विचाराबाबत असणाऱ्या जाणीव जागृतीचा आढावा घेणे

**शोध निबंधाची परिकल्पना :**

1) तुकडोजी महाराज यांचे शिक्षणाबाबतचे विचार आधुनिक वाटतात.

**शोध निबंधाची व्याप्ती व मर्यादा :**

1) प्रस्तुत संशोधनात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या शैक्षणिक विचाराचा समावेश करण्यात आला
2) प्रस्तुत संशोधनात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या शिक्षणातील योगदान व विचाराचा अभ्यास करण्यात आला आहे

**शोध निबंध संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंध संशोधन हे वर्तमानकाळाशी संबंधीत असल्यामुळे सर्वेक्षण पध्दतीची निवड केली आहे.

**शोध निबंध निष्कर्ष :**

1. स्त्रीयांना पुरूषाच्या बरोबरीने शिक्षण घेण्याचा समान अधिकार आहे असे दिसून येते.
2. स्त्री शिक्षण हा ग्रामोन्नतीचा पाया आहे हे दिसून येते.
3. स्त्रियांवर लादण्यात आलेली पारंपारिक गुलामगीरी आणि त्यातून आलेले मागासलेपण या मागासलेपणातून राष्ट्राची हाणीच होते असे दिसून येते.
4. तुकडोजी महाराजांनी स्त्रियांचा सर्वांगीण विकासावर भर दिलेला दिसून येतो.
5.राष्ट्रघडणीत शिक्षणाला महत्वपुर्ण स्थान तुकडोजी महाराजांनी दिले असे दिसून येते.
6. व्यक्तीमत्व विकास हा शिक्षणाशिवाय परिपूर्ण होऊ भाकत नाही असे ते म्हणतात.
7. बौध्दिक विकास विद्यार्थ्यांचा करावयाचा असेल तर प्रथम त्यांच्यावर चांगले संस्कार होणे महत्वाचे आहे असे ते म्हणतात.
8. तुकडोजी महाराजांची स्त्री पुरूश समान शिक्षणाचा पुरस्कार केला.
9. मानवता हा धर्म शिक्षणामुळेच चांगल्या पध्दतीने अंमलात आणता येतो असे दिसून येते.
10. कर्तव्य पालनासाठी सुसंस्कार महत्वाचे आहे असे म्हणतात.
11. व्यावहारिकता आणि शिक्षण यांची सांगळ घालणे आवभयक आहे असे ते म्हणतात.
12. मुलीपेक्षा मुलांना तुकडोजी महाराजांच्या भौक्षणिक विचाराबाबतची जाणीव जाग्रती अधिक. आहे

13.तुकडोजी महाराजाच्या शिक्षण विचाराबाबत शहरी भागातील विद्यार्थ्यांपेक्षा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची जाणीव जागृती अधीक दिसून आली.

14. शहरी भागातील विद्यार्थ्यांना तुकडोजी महाराजाच्या विचाराबाबत उदासिनता दिसते.

## शोध निबंध शिफारशी

1.स्त्री शिक्षण काळाजी गरज आहे. त्यामुळे स्त्री शिक्षणाबाबत जागरूक असावे.

2.तुकडोजी महाराजाच्या शैक्षणिक विचार साहित्याचा प्रचार प्रसार व्हायला पाहिजे.

3.आपल्या उद्धाराकरीता कोणी महात्मे येणार आहेत, या स्वप्नात स्त्रियांनी न राहता स्वतःसाठी संघर्ष व लढा देण्याचा विचार आज कृतित उमटवण्याची गरज आहे.

4.शिक्षण काळाजी गरज आहे. त्यामुळ नेहमी शिक्षणाबाबत जागरूक असावे.

5.तुकडोजी महाराजाच्या शैक्षणिक विचार साहित्याचा प्रचार प्रसार व्हायला पाहिजे.

## संदर्भ ग्रंथ सूची :

1. आकोलकर ग.वि (1974) : महाराष्ट्रातील शिक्षणातील वाटचाल, श्रीविद्या प्रकाशन, पुणेत्र
2. नागतोडे किरण (2006) : नैतिकमूल्य शिक्षण, विद्या प्रकाशन, नागपूर.
3. जाधन के.के. (2008) : तत्वज्ञान, मन प्रकाशन, नाशिक.
4. पारसनीस न.रा. (2005) : शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमिका, नूतन प्रकाशन, पूणे.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार

मार्गदर्शिका
मा.डॉ.धूत यु.एम.
प्राचार्या, शासकीय अध्यापक
महाविद्यालय, परभणी

संशोधक विद्यार्थी
श्री.वारूळकर प्रदीप मुरलीधर
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

सारांश–

*राष्ट्रपिता महात्मा गांधी हे एक युग पुरूष होते. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात सखोल चिंतन व प्रत्यक्ष प्रयोग करून त्यांनी त्या क्षेत्रातील समस्यांवर प्रकाश टाकला आहे. मौलिक व अभिनव विचार संपदा प्रगट केली आहे. शिक्षणा बद्दल विचार मंथनच केले असे नव्हे तर संपूर्ण शिक्षण योजना देशाला सादर केली. म.गांधीजी केवळ बौध्दिक विकासावर भर न देता व्यक्तिमत्त्वाच्या सर्व घटकांवर भर दिला. ३ H-Head, Hand and Heart यातून ज्ञानात्मक, क्रियात्मक आणि भावात्मक या पातळीचा विकास झाला पाहिजे असे मत म.गांधीजींचे होते. तसेच विकास हा सर्व घटकांचा समन्वयात्मक असावा. असे प्रतिपादन म.गांधीजीनी केले आहे.*

प्रस्तावना –

शिक्षणामुळे समाज परिवर्तन घडून येते योग्य आणि चांगले शिक्षण आपल्या सर्वांसाठी खूप महत्त्वाचे आहे. शिक्षणामुळे ज्ञान, मुल्ये, कौशल्ये, विश्वास आणि नैतिक सवयी प्राप्त होतात. राहणीमान तसेच सामाजिक, आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रत्येकासाठी शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. वैयक्तिक व सामाजिक समस्यांवर विजय मिळविण्याचा एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे शिक्षण होय. चांगले व शांत जीवन जगण्यासाठी शिक्षित होणे आवश्यक आहे. शिक्षणामुळे आत्मविश्वास वाढण्यास मदत होते.

गरज –

भारतात सर्वात प्रभावशाली महापुरूषात महात्मा गांधींजीचे नाव वरच्या दर्जाचे आहे. त्यांना राष्ट्रपिता म्हणून संबोधले जाते. भारत पारतंञ्यात रखडला असता त्यास स्वंतत्र करण्याचा विडा महात्मा गांधीनी उचलला. यासाठी त्यांनी अहिंसक मार्गाचा अवलंब केला. भारतीय जनतेत आत्मविश्वास निर्माण केला. साधी राहणी व उच्च विचारसरणी या न्यायाने त्यांनी आपले जीवन घालविले. राजकीय कार्य करताना शिक्षण क्षेत्रातही त्यांनी कार्य केले. व आपले शैक्षणिक विचार मांडले त्यांनी आपली स्वतंत्र शिक्षणपध्दती सुचविली. त्यांचे शैक्षणिक विचार आजही महत्त्वपूर्ण आहेत. त्यासाठी महात्मा गांधीजीच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

महत्त्व –

भारतात अनेक समाजसुधारक होऊन गेले. त्यामध्ये प्रामुख्याने महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. भाऊराव पाटील, स्वामी विवेकानंद, श्री अरविंद घोष, रविंद्रनाथ टागोर, महात्मा गांधी इ. चा उल्लेख करावा लागेल. सर्वच समाज सुधारकांनी समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न केलेत. तात्कालीन समस्या सोडविण्याचा प्रयत्न केलेत. समाज प्रबोधन केले. समाजातील प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी प्रयत्न केलेत. यापैकी महात्मा गांधी एक होते. महात्मा गांधी राजकीय कार्य करीत असतानाच शैक्षणिक कार्यही केले. त्यांचे शैक्षणिक विचार मानसशास्त्रीय सिध्दांतावर आधारित आहेत. तसेच स्वावलंबी शिक्षण मिळाले पाहिजे असे त्यांचे मत होते. शिक्षण व जीवन यामध्ये समन्वाय असायला हवा यासाठी त्यांनी आपले शैक्षणिक विचार मांडले. महात्मा गांधीजीचे शैक्षणिक विचार आजही समाजात रूजविणे या दृष्टीने संशोधनाचे महत्त्व आहे.

उद्दिष्टे –

१. महात्मा गांधीजीच्या जीवन विषयक तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे

२. महात्मा गांधीजीच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे.

महिती संकलन साहित्य –

माहिती संकलनासाठी दुय्यम स्त्रोत हे साधन वापरलेले आहे. यामध्ये महात्मा गांधी यांच्या जीवनाकार्यावर व विचारांवर लिहिलेल्या पुस्तकांचा वापर केलेला आहे. याशिवाय इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहितीचा अभ्यास केलेला आहे.

पध्दती –

महात्मा गांधी यांचा कालखंड २ ऑक्टोबर १८६९ ते ३० जानेवारी १९४८ असल्यामुळे ऐतिहासिक पध्दतीचा अवलंब केला आहे.

महात्मा गांधी यांचे जीवन कार्य –

श्री. मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म गुजराथ राज्यात काठीयावाड मधील पोरबंद गावी झाला. त्यांचे वडील राजकोठचे दिवाण होते. बालपण अतिशय सुखवस्तू होते. मॅट्रिक पर्यंत शिक्षण झाल्यानंतर १८८७ मध्ये कायदयाचे शिक्षण घेण्यासाठी ते इंग्लंडला गेले. तत्पूर्वी १८८२ मध्ये वयाच्या १३ व्या वर्षी कतुरबा बरोबर त्यांचा विवाह झाला. १८९१ मध्ये ते इंग्लंडहून पदवी घेऊन पुन्हा भारतात आले. त्यांनी राजकोट येथे वकीली केली. त्यात त्यांना फारसे यश मिळाले नाही. परंतु एका केसच्या संदर्भात ते दक्षिण आफ्रिकेला गेले. आफ्रिकेत जातांना त्यांना रेल्वेत मिळालेली वर्ण भेदाची वागणूक, काला आदमी म्हणून केलेला तिरस्कार, अपमानास्पद वागणूक त्यामुळे त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. प्रवासात द्वेष, अवहेलना, २२ वर्षे आफ्रिकेत राहून उघडया डोळयाने तेथील बघीतलेले कष्ट, अमाणूस वागणूक, हालाखीची परिस्थिती पाहून मन हेलावून गेले. मनात प्रचंड चीड निर्माण झाली. स्वत:ने वकीली न करता समाजसेवेची वकीली करण्याचा विडा उचलला जन्मभर समाजसेवा करण्याचे व्रत अंगी स्वीकारले. १९१४ पासून या कार्याला वाहून घेतले. १९१५ साली साबरमती आश्रम काढला. १९१९ ते १९४७ पर्यंत भारताला स्वातंत्र मिळविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला. १९२० साली टिळकांचा मृत्यू झाल्यानंतर स्वातंत्र मिळविण्याची जबाबदारी जणू भारतीयांनी गांधीजीच्या खांद्यावर टाकली. ती जबाबदारी त्यांनी समर्थ पणे पेलविली होती. जीवनाचे तत्त्वज्ञान त्यांनी काही कोरडे न सांगता प्रत्यक्ष जीवनात वा कृतित आणले होते. १९१७ ते १९२६ मध्ये मुंबईत मनीभवन मध्ये राहिले. अजन्म भारतीयाची वकीली करून अविश्रांत श्रम, मानवतेची सेवा असहकारचळवळ, सत्याग्रह इ. मार्गाचा अवलंबून इंग्रजाना जेरीस आणले. गोरगरीबांसाठी हरिजनांची सेवा केली. खऱ्या अर्थाने जनसेवा वृत अंगी बानले. दलिताचे कैवारी, उपासक, भाष्यकार, शिक्षण तज्ज्ञ, सर्वोदयी नेते व देशासाठी अथक प्रयत्न करून १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वातंत्र केला. स्वातंत्र्याच्या इतिहास लिहितांना गांधीजीना टाळून तो इतिहास पूर्ण होऊ शकणार नाही. व गांधीजीना भारतात कोणी ओळखत नाही ही व्यक्ती सापडणे दुर्मिळच होय.

जीवन विषयक तत्त्वज्ञान –

१. परमेश्वरावर श्रध्दा : Faith of God. परमेश्वर म्हणजे जीवनाचे अंतिम तत्त्व होय.

२. सत्य हेच परमेश्वर : Truth is the God,'God is the Truth. सत्य म्हणजे मानवातील अंतरात्मातील साक्षात्कार होय. सत्य, सद्सद् विवके हे ते जीवनाचे ध्येय मानीत.

३. अहिंसेचे पुजारी : Faith on nonviolence.

अहिंसा :— परस्परावर प्रेम, सहानुभूति, आदरभाव

सत्य :— परस्पराविषयी विश्वास

अस्तेय :— परधनाचा अपहार करणार नाही. दुसऱ्याचे आपले म्हणणार नाही.

ब्रम्हचर्य :— संयमित जीवन, जीभेवर संपूर्ण नियंत्रण, नम्रता, विनयशिलता.

असंग्रह :— अपरिग्रह/चोरी न करणे, अपेक्षा न ठेवणे, लोभीवृत्ती न ठेवणे.

४.सत्याग्रह : Satyagraha : सत्याचा उपासक मानीत, जो सत्याचा उपासक असतो तो नेहमी निर्भय, निर्भीड व स्पष्ट असतो.सत्याग्रह हे गांधीचे महत्त्वाचे साधन मानीत. करण सत्याग्रह म्हणजे अहिंसा वृत्तीचे व्यवहारी स्वरूप मानत असे.

५. नैतिकता : Ethics : नैतिकता हा गांधीजीच्या जीवनाचा खरा धर्म वा आधार होता. देशची प्रगती वा उन्नती ही नैतिकतेवर अवलंबून असते.

६. व्यक्ती व मानव : Individual and Human : व्यकतीत्त्वात मानवता असावी.

७. प्रेम : Love : मानव व मानवतेवर अपार प्रेम, इतरांवर प्रेम करा, त्यातून प्रत्येक व्यक्तीत आत्मविश्वास व श्रद्धा उत्पन्न होते. सत्याजवळ जाण्याचा मार्ग म्हणजे प्रेम होय.

८. अध्यात्मिक समाज : Spiritual Society : ज्यात प्रेम, सत्य, अहिंसा, न्याय, समान संपत्ती असते तो अध्यात्मिक समाज होय.

शिक्षणाचा अर्थ :—

शिक्षणाचा अर्थ स्पष्ट करताना म.गांधी म्हणतात. शिक्षण म्हणजे बालकाच्या किंवा व्यक्तीच्या शरीर, मस्तिष्क आणि आत्म्याच्या अंतर्गत सर्वोत्तम गुणांचा विकास होय.

केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे. शिक्षणाचा प्रारंभ देखिल नव्हे. शिक्षण म्हणजे बालकाच्या व व्यक्तीच्या सर्वोकृष्ट गुणांची अभिव्यक्ती करून व्यक्तीचा शरीरिक व मानसिक आणि अध्यात्मिक विकास साधणारे माध्यम होय. महात्मा गांधीजीच्या दृष्टीने शिक्षणाचा अर्थ व्यापक आहे.

शिक्षणाचे ध्येये :—

शिक्षणाचे ध्येये

| *तत्कालिन ध्येये | *अंतिम ध्येये (दूरगामी) |
| --- | --- |
| चारिज्य निर्मिती | आत्मिक विकास |
| उदरभरणाचे शिक्षण | अध्यात्मिक विकास |
| सांस्कृतिक विकास | आत्म साक्षात्कार |
| अर्थोत्पादन क्षमता | विख्यात्मक मन |
| सर्वागीण विकास | मानवतावादी समाज |
| | मुक्ती |

म. गांधीजीचे शैक्षणिक विचार :—

म. गांधींनी आपले शिक्षणविषयक विचार इ.स.१९०८ रोजी हिंद — स्वराज्य या पुस्तकात सविस्तर मांडले आहेत. त्यांनी वर्धा—शिक्षण, मूलोद्योग, शिक्षण, जीवन शिक्षण, नई—तालीम या नवीन शिक्षण पध्दतीचा हिरीरिने पुरस्कार केला. स्वावलंबन, स्वाभिमान श्रम प्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर त्यांनी आपली योजना तयार केली होती. इ.स.१९३७ मध्ये वर्धायेथील परिषदेत म. गांधीनी आपले शिक्षणविषयक विचार मांडले. त्यानुसार एक योजना तयार करण्यात आली. या योजनेला मूलोदयोग शिक्षण योजना (Scheme of Basic Education)

म्हणतात. ही शिक्षण योजना 'वर्धा शिक्षण योजना, बुनियादी शिक्षम योजना व मूलोद्योगी शिक्षण योजना, या नावाने परिचित आहे. या योजनेची वैशिष्टये म्हणजेच म. गांधीचे शिक्षणविषयक विचार होत. यातच मूलोद्योगी शिक्षणाची मूलतत्त्वे म्हणून ओळखली जातात.

महात्मा गांधीचे शिक्षणविषयक विचार :–

१. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा
२. शिक्षण मोफत व सक्तीचे
३. शिक्षणात हस्त व्यवसयास प्राधान्य
४. स्वावलंबी शिक्षण
५. शिक्षणात समवायाचे तत्त्व
६. मानसशास्त्रीय आधारावर शिक्षण
७. मूलोद्योगी शिक्षणाचा पाठपुरावा.

१. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे :–

मुलांना शिक्षण त्यांच्या मातृभाषेतून दिले पाहिजे. त्यामुळे विषय समजण्यास सुलभ जाते. मातृभाषेद्वारे बालकाच्या व्यक्तीमत्वाचा विकास करता येतो. बालकात सर्जनशीलता विकसित करता येते. आपल्या मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने बालकाच्या ग्रहण शक्तीचा विकास होतो.

२. शिक्षण मोफत व सक्तीचे असावे :– (Free and Compulsony)

१ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांमुलीना शिक्षण मोफत देऊन ते सक्तीचे करावे. शिक्षण मोफत असल्याने बहुजन समाजातील गरीब मुलांमुलीना शिक्षण घेतांना सुलभ जाईल, आर्थिक चणचण भासणार नाही. शिक्षण घेण्याचा सर्वांना समान अधिकार आहे. जाती, धर्म, पंथ, लिंग यानुसार भेदभाव न करता सर्वांना शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

३. शिक्षणात हंस्तव्यवसायास प्राधान्य असावे :–

शिक्षण हस्तकलाकेंद्रित व्हावे असे म. गांधीचे मत होते. त्यांच्यामतानुसार सर्व विषय हस्तकलेच्या माध्यमातून शिकवावे. यास गांधीजीनी मूलोद्योग असे संबोधले आहे. त्यामुळे मुलांच्या क्रियाशीलतेला चालना मिळून शिक्षणाचा जीवनाशी संबंध जोडला जाऊ शकेल. या शिक्षणातून मानसिक शक्तीचा विकास घडण्यास चालना मिळते. तसेच या शिक्षण पध्दतीतून बालकांचा सामाजिक व नैतिक विकास घडविला जातो.

४. स्वावलंबी शिक्षण :– (Self Sufficiency Education)

विद्यार्थी शाळेत शिकत असताना त्यांनी निरनिराळया वस्तू तयार करून त्या बाजारात विकाव्यात. त्यापासून त्यांना अर्थार्जन होईल. या पैशातून विद्यार्थ्यांचा शाळेचा खर्च भागवता येईल. त्यामुळे शिक्षण आत्मनिर्भर होण्यास मदत होईल. यासाठी गांधीजीनी मूलोदयोगी शिक्षणात स्वावलंबनास प्रमुख स्थान दिले होते.

५. शिक्षणात समवायाचे तत्त्व अंमलात आणावे :–

एखादा विषय शिकविताना तो स्वतंत्र नसून त्यांचा संबंध जीवनाशी आणि इतर विषयाशी आहे हे पटवून देणे म्हणजे समवाय होय. सामाजिक विषयाचे अध्ययन करताना मातृभाषेतील शब्दांचे उच्चार करणे म्हणजे प्रत्यक्ष समवाय साधणे होय. समवायचा आधार हस्तकला असल्याने स्थानिक वातावरणात अशा विषयांची निवड करावी.

६. मानसशास्त्रीय आधारावर शिक्षण :–

मूलोद्योगी शिक्षण मानसशास्त्रीय सिध्दांतावर आधारित आहे. ज्या विद्यार्थ्यांना शिकवावयचे आहे. त्याच्या शरीरिचे व मनाचे ज्ञान असणे आवश्यक असते. म्हणून शिक्षण विद्यार्थ्यांच्या शारीरिक शक्ती व मानसिक प्रवृत्तीच्या संदर्भात दिली पाहिजे. या योजनेत शिक्षण प्रक्रिया केंद्रित असल्याने त्याचा आधार मानसशास्त्रीय आहे. विविध वस्तू व उपकरणांचा स्वत:च्या हाताने वापर केल्याने विद्यार्थ्यांनी निरीक्षण शक्ती विकसित होते. म्हणून मानसशास्त्रीय आधारावर शिक्षण दिले पाहिजे.

७. मूलोद्योगी शिक्षण :–

म. गांधीनी मूलोद्योगी शिक्षण पध्दती भारतात लागू करण्यासाठी व तिचे स्वरूप कसे राहील. याविषयी महाराष्ट्रातील वर्धा येथे इ.स. १९३७ रोजी एक परिषद बोलाविली होती. त्या परिषेदत महात्मा गांधीनी आपले शैक्षणिक विचार प्रकट केले होते. ही परिषद डॉ. झाकिर हुसेन यांचे अध्यक्षेतेखाली भरविण्यात आली. या परिषदेत एक शिक्षण योजना आखण्यात आली. या योजनेस मूलोदयोगी शिक्षण योजना (Scheme of Basic Education) असे म्हणतात. पुढे ही योजना जीवन शिक्षण, बुनियादी शिक्षण, नई तालीम या नावाने ओळखली जाऊ लागली,. ही शिक्षण योजना वर्धा या ठिकाणी तयार करण्यात आली होती. म्हणून ही योजना वर्धा शिक्षण योजना या नावानेही प्रसिध्द आहे.

मूलोद्योगी शिक्षण वैशिष्टये

१. प्राथमिक शिक्षण सक्तीचे मोपफत व सार्वत्रिक असावे.(वयोगट ७ते १४ वर्षे)
२. मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम असावे.
३. शिक्षण स्वाश्रयी (Self-Supported ) असावे (स्वावलंबी)
४. शिक्षण हस्तकला उद्योग (Craft Centred ) केंद्रित असावे.
५. आदर्श नागरिकत्वाचा विकास
६. जीवनाशी संबंधित शिक्षण.

मूलोद्योगी शिक्षणाचे तात्पर्य एवढेच की शिक्षण हस्तव्यवसायावर आधारित असावे. त्यामुळे बालकास सामूहिकरित्या काम करण्याची संधी मिळते.

निष्कर्ष :–

१. शिक्षण मोफत व सक्तीचे असावे.
२. शिक्षण मातृभाषेतून असावे.
३. स्वावलंबी शिक्षण हवे.
४. शिक्षण व जीवन यात समवाय हवा.
५. शिक्षण हे मानसशास्त्रीय आधारावर हवे.
६. शिक्षणात समवायाचे तत्त्व असावे.
७. उत्तम चारित्र्य निर्मितीसाठी हवे.
८. शिक्षण हस्तकला उदयोगकेंद्रित असावे.
९. उत्तम नागरिकत्वाच्या विकासाठी शिक्षण हवे.
१०. बालकाच्या क्षमतेनुसार शिक्षण हवे.
११. क्षेत्रभेटीला प्राध्यान्य दयावे.
१२. कृतीशिलतेला वाव देणारे शिक्षण हवे.
१३. स्वानुभवातून शिक्षण दिले पाहिजे.

समारोप :–

शिक्षणातून केवळ बलवान परंतू पाशवी प्रवृत्तींचे, बुध्दिमान परंतु पुस्तकी किडे किंवा अतिशय भावूक म्हणजे व्यवहारशून्य असे नागरिक महात्मा गांधींना अपेक्षित नव्हते. कोणत्याही एका अंगाचा अतिरेकी विकास मान्य नाही, तर विकास सर्व घटकांचा समन्वयात्मक झाला पाहिजे असे मत म.गांधींजीचे होते. ज्ञानात्मक, क्रियात्मक आणि भावात्मक पातळीचा विकास म्हणजे खऱ्या अर्थाने माणूस घडविणे होय.

संदर्भ सूची :–

१. घोरमोडे के.यु., घोरमोडे के.के. (२००६) , शैक्षणिक विचारवंत (प्रथमावृत्ती), नागपूर : विद्या प्रकाशन.
२. जाधव के.के (२००८), नवीन काळाचे शिक्षण–तत्वज्ञान, (चतुर्थ आवृत्ती),नाशिक:मन प्रकाशन
३. वाघ न. (२००८),उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, पेपर १, विभाग १, सांगली धनंजय प्रकाशन.
४. www.m.k.Ghandhi. wikipedia

# स्वामी विविकानंदाचे शैक्षणिक योगदान

प्रा.अंकुश बाबासाहेब सिताराम
मानवेंद्र केंद्रे अध्यापक महाविद्यालय, जळकोट
ता.जळकोट जि. लातूर

➢ पार्श्वभूमी :

भारतीय आध्यात्मिक वारसा जोपासणारे तसेच ब्रिटिशकालीन काळात भारतीयांना आपल्या संस्कृतीबदल संभ्रम निर्माण झाला असताना त्यातून भारतीय समाजाला योग्य दिशा दाखविणारे महापुरुष म्हणून स्वामी विवेकानंदाचा नामोल्लेख करण्यात येतो.

स्वामी विवेकानंदाचा जन्म १ जाने १८६३ मध्ये कलकत्ता येथे एका क्षत्रीय कुटूंबात झाला. त्यांचे बालपणीचे नाव नरेंद्र असे होते. लहानपणापासून ते अतिशय चाणाक्ष बुध्दीचे होते. इ.स. १८८५ ते पदवी परीक्षा पास झाले वयाच्या १७ व्या वर्षी ने रामकृष्ण परमंहंसच्या सहवासात आले. त्यांना आपले गुरु मानुन त्यांनी सन्यास घेतला. रामकृष्ण परमहंस इ.स. १८८६ मध्ये स्वर्गवासी झाल्यानंतर त्यांनी रामकृष्ण मिशन ची स्थापना केली व संपूर्ण भारत भ्रमण करुन भारतात असूनही आधात्मीकवाद असल्याचे पटवुन दिले. स्वामी विवेकानंदांनी भारतातील सामाजीक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी सन्यासाची दिक्षा घेतली. १८८८ ला घेतली. इ.स. १८८१ ते १८९१ पर्यंत भारतभर प्रवास केला. ४ जुलै १९०२ रोजी त्यांना देवाज्ञा झाली तेव्हा त्याचे वय फक्त ४० वर्षे होते.

➢ शैक्षणिक विचार :

भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक म्हणून अध्यात्मवादाचे विवेचन करण्यात येते. भारतीयांना व पाश्चात्यात लोकांना वेदाकडे चला. असे तत्वज्ञान स्वामीनी वेळोवेळी दिले. शिक्षणातून माणूस घडविला जावू शकतो. असा विश्वास व्यक्त करतात.

➢ मानवातील पूर्णत्वाचा विकास :

स्वत: मधील दैवी अंशाची ज्याला अनुभूती होते त्यालाच पूर्णत्वाची प्राप्ती होते. व्यक्तीमधील अशा पूर्णत्वाची अभिव्यक्ती म्हणजेच शिक्षण होय. इंद्रिय, निग्रह, ध्यानधारण, चरित्र, संवर्धन इत्यादी साधनांना शिक्षणात विशेष महत्व असते. शिक्षणाचा उदेश माणसतील पुर्णत्वाचा विकास करणे होय. शिक्षणातून व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्यासाठी प्रथम त्याच्या इच्छाशक्तीचा विकास करणे आवश्यक असते.

➢ विद्यार्थ्यांचा भैतिक आणि मानसिक विकास :

शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा भैतिक व मानसिक विकास व्हावा असे स्वामी विवेकानंद सुचवितात. यावेळी विद्यार्थ्यांच्या मानसिक विकासासाठी त्याच्यातील उपजत असलेल्या क्षमता विचारात घेवून त्यांचा शिक्षणाच्या माध्यमातून विकास करावा.

➢ नितिशास्त्र, धर्म, नैतिक मुल्यांचे एकत्रीकरण :

यामध्ये निसर्गवाद, वास्तववाद उपयुक्तवाद इत्यादीचा समावेश होतो. प्रत्येकाचे शिक्षणाने माणूस घडविण्यास योगदान असे म्हणून यांचे ज्ञान घेण्यासाठी शिक्षणाची गरज असते.

➢ प्रौढ शिक्षण :

प्रौढ शिक्षणाबाबत स्वामीचे विचार आधुनिक स्वरुपाचे दिसून येतात. १८ ते ३५ या वयोगटातील प्रौढ व्यक्तीना साक्षरतेसाठी शिक्षण देवू नये तर सामाजिक विकासासाठी ते शिक्षण असावे प्रौढ शिक्षण घेण्यासाठी येत तसेल शिक्षणाने प्रौढांकडे जावे असा संदेश त्यांनी दिला आहे.

➢ अंधश्रध्दा नष्ट करणे :

अंधश्रध्दा शिक्षणातील मुख्य अडसर आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट रुढी परंपरा चालीरिती याचा नायनाट करुन शिक्षण देण्यात यावे. शिक्षणातून मनुष्यास नवीन दृष्टीकोन प्राप्त होवून त्यांच्या विचारसरणीत व्यापक बदल होतो.

➢ शिक्षण जीवनाच्या तयारीसाठी :

शिक्षणाने व्यक्तीच्या विचारात व्यापकता येते. शिक्षणाची रचना ही सामाजिक वातावरणानुसार करण्यात यावी त्यामुळे व्यक्तीच्या मनात सामाजिक बांधिलकीची भवना निर्माण होण्यासाठी ठरते अशी जीवनाची तयारी होणे आवश्यक ठरते अशी भक्तीची जीवनाची तयारी होण्यासाठी शिक्षण हे महत्वपूर्ण माध्यम आहे.

➢ विश्वबंधुत्वाची भावना:

सर्व चराचर सृष्टीत एकच परमतत्व व्यापलेले असल्याने सर्व मानव ही एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. यामुळे परस्परांमध्ये प्रेमाची बंधुत्वाची भावना विकसित व्हावी व या बंधुत्व भावनेतुनच पृथ्वीतलावरचे दु:ख नाहीसे होण्यास मदत होवून सहानुभूती विकसित होउफन इतरांच्या सुखदु:खाबदल आपलेपणा व जिव्हाळा निर्माण होईल. म्हणून स्वामीनी अंत:करणातील मानवतेचा विकास म्हणजेच शिक्षण असे म्हटले आहे. मानवी मनातील शुध्द अंत:करणातील प्रेरणाच मानवाला योग्य मार्ग दाखवून सत्यापर्यंम नेते. म्हणूनच शिक्षणातून सर्वांमध्ये विश्वबंधूत्वाची भावना विकसीत व्हावी.

➢ चारित्र्य निर्मिती :

शिक्षणातून चारित्र्यनिर्मिती होण्यावर स्वामीने विशेष भर दिला आहे. मानवाचे सौंदर्य रचनाअर्थाने त्याच्या चारित्र्यात दडलेले असते. शिक्षणातून प्राप्त होणा—या ज्ञानासोबत मानवी जीवन एकरुप होणे आवश्यक ठरते. चारित्र्य निर्मितीसाठी बालकावर सुसंस्कार व्हावे व त्यानुसार आचरणात व वर्तन घडविणे पाहिजे त्यातून चांगल्या सवयी विकसित व्हाव्या असे म्हणतात चारित्र्य म्हणजे सवयीची पुनरावृत्ती व या पुनरावृत्तीतून चारित्र्य निर्माण होते.

➢ शिक्षणाची समान संधी :

स्वामीजींच्या विचारानुसार शिक्षणाच्या आदान प्रदानाच्या प्रक्रियेत कोणताही सामाजिक अडसर असू नये शिक्षणात जात, पात, पंथ, धर्म हे अडसर न ठरता सर्वांसाठी शिक्षण या धोरणाचा स्वीकार करावा. शिक्षणाची दारे सर्वांसाठीखुली असल्यास समानतेतून एकता निर्माण होण्यास मदत होते.

➢ शिक्षण मोफत व सक्तीचे :

जन सामान्यापर्यंत शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा मार्ग सुचविला. यासाठी बालकांच्या सहाव्या वर्षापासून व चौदाव्या वर्षपर्यंत शिक्षण देण्यात यावे तसेच ते सक्तीचे करण्यात यावे यातून सर्वांना शिक्षण मिळून शिक्षणाचा प्रसार झापाटयाने होतो.

➢ मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम:

शिक्षणाच्या माध्यमासाठी मातृभाषेचाच वापर झाल्यास बालकास देण्यात येणा—या ज्ञानाचे आकलन सहजतेने होते. म्हणून शिक्षणाचे माध्य हे मातृभाषाचे असावे असा स्वामीजीचा आग्रह करतात.

➢ शरीरिक शिक्षण:

बौध्दिक शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात यावे बौध्दिक शिक्षणाचे उदिष्टे हे मानसिक विकास तर शारीरिक शिक्षणाची उदिष्टये बालक सुदृढ व सामर्थ्यवान हे असावी.

➢ एकाग्रतेचा विकास :

ज्ञानप्राप्तीचा एकमेव मार्ग म्हणजे एकाग्रता होय. ज्ञानाचे भांडार उघडावयाचे असेल तर एकाग्रहता आवश्यक आहे. स्वामीजीची वैचारिक बैठक आध्यात्मिक होती. म्हणून एकाग्रतेला महत्व देताना ते म्हणतात. कोणतेही कठीण ज्ञान कडक ब्रम्हचार्याचे पालन व श्रध्दा या दोन गुणाचे अंगीकरण करुन सहज प्राप्त होउ शकते.

➢ स्त्री शिक्षण :

स्वामीजीनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करताना समाजातील सर्वच स्तरातील स्त्रियांना शिक्षण दिण्यात यावे तसेच स्त्रियांसाठी वेगळया शाळा असाव्यात स्त्रिया सुशिक्षित होतील तर त्या लहान बालकांवर योग्य संस्कार करु शकतील. कुटुंबाच्या विकासातून समाजाचा व देशाचा विकास करण्याचे सामर्थ्य स्त्रियांमध्ये आहे.

समाजात आणि कुटूंबात स्त्रीयांना सन्मानाने वागविले पाहिजे. समाजाची प्रगती ही समाजात स्त्रियांना मिळणा—या प्रतिष्ठेवर असते. स्त्रीयांना मुलांच्याय दर्जाचे शिक्षण देण्यात यावे संस्कृतिक वारसा कायम ठेवून स्त्रियांना आधुनिक बनविले पाहिजे. सुशिक्षित स्त्रीयांचा उधार करण्यात घालवावे.

➢ समाज सेवेची भावना :

सर्व मानव हे ईश्वराची लेकरे आहेत. मानव घडविताना ईश्वरानी कोणताही भेदभाव केला नाही. म्हणून मानवानेही असा भेदभाव न करता आपले वर्तन अनुकरणीय ठेवावे. यासाठी अंतकरणातील मानवतेचा विकास म्हणजे शिक्षण होय. भावना प्रत्येक बालकामध्ये रुजवावी या जीवन मुल्यातून एकमेकातील दुराव्याऐवजी प्रेमाची व विश्वबुधुत्वाची भावना वाढीस लागते तसेच परस्परात समाज सेवेची भावना विकसित होण्यास मदत होते.

➢ धार्मिक शिक्षण :

विवेकानंदाच्या मते धर्म व शिक्षण यात फरक नाही दोन्हीचे उदिष्टे एकच धर्माची व्याख्या करताना ते म्हणतात धर्म म्हणजे माणसतील दैवी शक्तीचा अविष्कार शिक्षण म्हणजे माणसातील गोष्टी वेगळया नव्हेत. अंत:करणातील आध्यात्मिक शक्ती जागृत झाल्याशिवाय व्यक्तीला पूर्णत्व प्राप्त होत नाही. व व्यक्तीमध्ये सुप्त स्वरुपात असलेल्या पूर्णत्वाला विकास केल्याशिवाय त्याच्यातील दैवी अंश प्रकट होउ शकत नाही.धर्म हा शिक्षणाचा गाभा आहे. असे ते म्हणतात. विवेकानंदाची धर्माची कल्पना फार व्यापक होती. रुढी अंधश्रध्दा, अज्ञान प्रत्यक्ष जीवनाकडे पाठ फिरवणे इत्यादी गोष्टी त्यांना मान्य नव्हत्या. आध्यात्मिक शक्तीचा विकास माणुसकी, दीनदुबळे व गरीब यांची सेवा हाच खरा धर्म असे ते मानत.

➢ सर्वसामान्याचे शिक्षण :

गरिबिचे मुळ कारण शिक्षणाचा अभाव होय. म्हणून सर्व सामान्यांचा मागासलेपणा नाहीसा करण्यासाठी त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार व प्रचार व्हावयास हवा असे विवेचन विवेकानंदानी केले आहे. सर्वसामान्यात जेव्हा शिक्षणाचा प्रसार होतो. त्यांचा बुध्दि विकास होतो. तेव्हाच देशाची प्रगती होते. असे स्वामीजी सांगत.

➢ शिक्षक :

स्वामीजी शिक्षकांच्या वैयक्तिक आयुष्याला व त्याच्याय चारित्र्यालाअतिशय महत्व देतात. त्यांच्या मते फक्त त्यागी व्यक्तीच कशक्षक होउ शकते शिक्षक चारित्र्य शुध्द हवे आपल्या व्यक्तीमत्वाची छाप पाडून मुलांच्या वर्तनाला आकार द्यावा. प्रेम व सहानुभूतीने वागावे शिक्षकाने विद्यार्थ्याच्या चुका दाखविण्या ऐवजी त्यांच्यात असलेल्या सुप्तशक्तीबदल त्यास सांगावे प्रत्येकाला पुर्णत्वाला पोहोचविण्यासाठी प्रयत्न करावा.

➢ शिक्षण म्हणजे नैसर्गिक विकास :

खऱ्या अर्थाने कोणी कोणाला शिकवू शकत नाही एकाद्या रोपटयाचा जसा आपोआप विकास होतो. तसाच मुलाचाही विकास होतो. शिक्षकांचे काम एवढेच की त्याच्या विकासाच्या मार्गातील नैसर्गिक अडथळे दूर करणे आणि त्याच्या शक्तीना जागृती आणणे योग्य खतपाणी घातले प्रकाश व हवापाणी यांची सोय केली सभोवती कुंपण घातले. म्हणजे रोपटे सुरक्षित राहील व त्याचा योग्य प्रकारे विकास विकास होईल. तसेच मुलांचेही आहे. म्हणून विकासाला योग्य दिशा देउन शिक्षकाचे कार्य आहे. शाळामध्ये आणि पालकाकडून आले जे शिक्षणलादले गेलेले आहे तो भार माठा अन्याय आहे त्यामुळे मुलांच्या नैसर्गिक विकासाला अवरोध होतो. मुलांच्या नैसर्गिक विकासाला अवरोध होतो. मुलांना स्वतंत्र मिळत नाही विकासात स्वातंत्र्य आवश्यक आहे.

➢ लोकशिक्षण :

लोकांचे दारिद्रय व अज्ञान पाहून विवेकानंदानी मन अतिशय कळवळले. हाताच्या बोटावर मोजण्या इतपत सुशिक्षित लोकावरुन देशाची कल्पना करु नका. झोपडरूा झोपडयामधून राष्ट् बनते आहे याचे विस्मरण होउ देउ नका या लोकंना सुरक्षित सुशिक्षित करणे हाच त्यांच्या उव्दाराचा एकमेव मार्ग आहे. म्हणून त्यांना शिक्षण देणे हे आपले अद्यकर्तव्य आहे. अशी त्यांनी सुशिक्षितांना जाणीव करुन दिली. निरक्षर लोकांना साक्षर करणे हीतर लोकशिक्षणाची पहिली पायरी परंतू तेवऐच पुरेसे नाही. आपल्या संस्कृतीचा त्यातील विचाराचा परंपराचा व मुल्यांचा परिचय करुन देणे तत्वज्ञानामील आशय सुलभ व सोप्या स्वरुपात त्यांना समजावून सांगणे हे खरे शिक्षण व हीजबाबदारी आपण उचललीच पाहिजे हे ज्ञान त्यांना मातृभाषातून पोचले पाहिजे.

➤ समारोप :

गेल्या शतकातील काळ हा मोठा विचित्र होता. एका टोकाला सनातनी परंपरावादी कर्मकांडालाच चिकटून बसलेलीच आधुनिक ज्ञान, विज्ञान व जीवन याकडे पाड फिरवून बसलेली धर्मनिष्ठा लोकांनी पिढी तर दुस—या टोकाला पाश्यात्य आचार—विचारांच्या सर्वस्वी आहारी गेलेली धर्म व संस्कृती या बाबतीत सर्वस्वी उदासीन बनलेली सुशिक्षितांची नवी पिढी स्वामीनी वैदिक धर्मातिल मूल्यत्वाचे स्पष्टीकरण करुन धर्म म्हणजे अफुची गोळी असे मानण—या पाश्यामात्याजिला सुशिक्षित वर्गाच्या डोक्यांत झणझणीत अंजन घालून त्यांच्या मनातील धर्मासंबंधीचे गैरसमज दूर केले हे तत्वज्ञान लोकांच्या मनावर बिंबविण्यासाठी शिक्षणाची राष्ट्रीय दृष्टीकोणातून कशी पुनर्घटना करावी याचे मार्गदर्शन केले.

संदर्भ ग्रंथ सुची :

१. प्राचार्य रा.तू.भगत: शिक्षणातील थोर विचारवंत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर.
२. डॉ.अरविंद दुनाखे : प्रगत शैक्षणीक समाजशास्त्र, नुतुन प्रकाशन पुणे.
३. ग.वि.अकोलकर : शैक्षणीक तत्वज्ञानाची रुपरेषा, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
४. डॉ.सुरेश करंदीकर: शिक्षण आणि भारतीय समाज, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
५. डॉ.म.बा.कुंडले : शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणीक समाजशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील चार्ल्स वूडच्या खलित्याचे योगदान

**प्रा . डॉ. होवाळ सिद्धार्थ सुधाकरराव**
सहा. प्राध्यापक,
अध्यापक महाविद्यालय, अहमदपूर

**मुंडे सोनाली वामनराव**
संशोधक विद्यार्थी ,
स्वा.रा.ती.म.वि. नांदेड

**गोषवारा (Abstract) :-**

चार्ल्स वूडच्या खलित्याने भारतीयांना प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण, व्यवसायिक शिक्षण आणि मुलींच्या शिक्षणाची सोय करण्यात आली. वुडने सुचविलेल्या शिफारशी कोणतीही उणीव न ठेवता, तसेच थोडाफार बदल करून सरसकट अंमलबजावणी केली असती तर आपल्या देशाची प्रगती निश्चितच झाली असते. वुडच्या खलित्यामध्ये सर्वाधिक लक्ष प्राथामिक शिक्षणाकडे दिले पण शासनाने प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष न पुरविल्यामुळे प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक होऊ शकले नाही. त्याचबरोबर उच्च शिक्षणासाठी इंग्लंडमधील विद्यापीठाच्याच धरतीवर जशाच तसे इथे विद्यापीठ रचना ठरविण्यात आली. परंतू येथील संस्कृती, वातावरणाचा विसर पडला तसेच इंग्लंडच्या विद्यापीठाबरोबरच भारतीय प्राचीन विद्यापीठांचा विचार होणे अपेक्षित होते.

**प्रस्तावना (Introduction)**

स्वातंत्र्यपुर्व काळ हा साधारणपणे इंग्रजांच्या भारतात आगमनापासून ते 1947 पर्यंतचा काळ मानला जातो. या कालावधी दरम्यान भारतात शिक्षणासंबंधी आमुलाग्र बदल होत गेले. विकसित देशांचा मागोवा घेतल्यास प्रकर्षाने जाणवते की, अशा देशांचा विकास शिक्षणाच्याच मार्फत होतो. मानवी संसाधनाच्या विकासासाठी शिक्षण हे सर्वात महत्वाचं साधन आहे. शिक्षण हे सर्वांना मिळत नव्हते. तत्कालीन परिस्थितीत शिक्षण हे फक्त उच्चवर्णीय वर्गाचीच मक्तेदारी होती. तत्कालीन श्रीमंत लोक आणि स्वतःला उच्च समजणाऱ्या किंव्हा व्यवस्थेने उच्च ठरवलेल्यांनाच उच्च शिक्षणाचा अधिकार होता. भारतात एकोणिसावे शतक सुरू होण्यापर्यंत शिक्षणाची कक्षा ही अत्यंत मर्यादित होती. ब्रिटीशांच्या आगमनावेळी भारतीय शिक्षणाचे स्वरुप हे सर्वस्वी धार्मिक स्वरुपाचे होते. त्यावेळी वेगवेगळया धर्माचे लोक हे आपापल्या धर्माच्या प्रचार आणि प्रसाराच्या अनुषंगाने शिक्षण देत असत.

**उद्दिष्टये :-**

1)स्वातंत्र्यपुर्व कालखंडातील वुडचा खलित्याचा तत्कालीन शिक्षण व्यवस्थेवरील प्रभाव अभ्यासाणे.

**स्वातंत्र्यपुर्व काळातील शैक्षणिक आयोग :-**

स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्योत्तर काळात विविध आयोग प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणासाठी नेमण्यात आले होते. **चार्टर ॲक्ट, वुडचा खलिता** (1854), 1982 **चा हंटर आयोग,** 1902 **भारतीय विद्यापीठ आयोग,** 1927 **चा सॅडलर आयोग,**1937 **ची वर्धा शिक्षण योजना...**

वरीलप्रमाणे विविध आयोग/समिती/धोरण भारतीय शिक्षणासाठी मांडले गेले आहेत. यापैकी आपण 1854 च्या वुडचा खलिता या आयोगाची भारतीय शिक्षणावर झालेले प्रभाव जाणून घेवूत.

**वुडचा खलिता** (1854) :-

स्वातंत्र्यपूर्व भारतातील शिक्षणासंबंधीचा एक महत्वपुर्ण अहवाल. त्यावेळी भारतातील लोकांना पाश्चात्य ज्ञान दयावे की पौर्वात्य, शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे की इंग्रजी भाषा, अशा प्रकारचे वाद निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर भारतातील शिक्षणाचे सर्वसमावेशक सर्वेक्षण करावे असा विचार पुढे आला. वुडच्या अहवालाने हे काम केले. 1853 मध्ये ‘हाऊस ऑफ कॉमन्स’ची एक समिती भारतातील शैक्षणिक विकासाचा आढावा घेण्यासाठी नेमली गेली. या समितीच्या वृत्तांतावर आधारित असा अहवाल वा खलिता संचालक मंडळाने (बोर्ड ऑफ डायरेक्टर्स) 19 जुलै 1854 रोजी पाठवला. ब्रिटीश अधिकारी चार्ल्स वुड यांच्या आग्रहावरून हा अहवाल लिहिला गेल्याने, त्यास वुडचा अहवाल असे म्हणतात.

**अहवालात माडलेल्या विशेष बाबी :-**

भारतात अस्तित्वात असलेल्या प्रत्येक प्रांतात स्वतंत्र शिक्षण खाते तयार करण्यात यावेत. कलकत्ता, मुंबई आणि मद्रास या ठिकाणी विद्यापीठे स्थापन करण्यात यावीत. भारतातील सर्व प्रदेशात शाळांचे जाळे उभारावे व सर्वसाधारण जनतेस शिक्षण मिळण्याची व्यवस्था करावी. नव्या शाळांना प्रशिक्षित शिक्षक मिळावेत, म्हणून शिक्षकांच्या प्रशिक्षणांचे कार्य हाती घ्यावे. अहवालात स्त्रियांचे शिक्षण, स्वतंत्र शिक्षण खाते, शिक्षणात व्याप्ती व दर्जा वाढविण्यासाठी प्रादेशिक तसेच इंग्रजी भाषेचा वापर आणि शिक्षितांना रोजगार कसा दयावा, या विषयांचीही चर्चा झाली.

**निष्कर्ष व चर्चा :-**

वुडच्या खलित्याच्या उद्दिष्टानुसार भारतीयांना पाश्चात्य ज्ञान, पाश्चात्य संस्कृतीची माहिती द्यावी यातून पाश्चात्य ज्ञान मिळेल पण सोबतच आपल्या संस्कृतीची जोपासना करायला हवी होती. प्रत्येक व्यक्तीला शिक्षण मिळणे ही गरज आहे. युवा पिढीच्या बौध्दीक विकासासोबत नैतिक विकास साधणे. भारतीयांमध्ये व्यावसायिक कौशल्ये विकसित करणे जेणेकरून कंपनीस सक्षम व विश्वासार्ह कर्मचारी मिळतील. या उद्दिष्टातूनच सहाय्यता अनुदान प्रणाली सुचविण्यात आली, ज्याशिवाय लोकशिक्षणाचा प्रसारावरील खर्च शासनाला झेपू शकत नाही. सहाय्यता अनुदान पध्दतीमुळे शिक्षणाच्या विस्तारास गती मिळाली. स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणपध्दतीमधील मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर दिलेला भर, लोक शिक्षणाचे महत्व प्रतिबिंबीत झाले आहे. इंग्रजी माध्यमातून शिक्षण प्रक्रिया चालूच राहिली. भारतीय भाषांना उच्च शिक्षणात विशेष स्थान मिळू शकले नाही. धार्मिक तटस्थता केवळ खलित्यातच राहिली, त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. चारित्र्य, नेतृत्व, नाविन्य याकडे या खलित्यानेच दुर्लक्ष केले. मुल्यमापनामध्ये परीक्षापध्दतीस अवाजवी महत्व प्राप्त झाले. वुडच्या खलित्यामध्ये सर्वाधिक लक्ष प्राथमिक शिक्षणाकडे दिले पण शासनाने प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष न पुरविल्यामुळे प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक होऊ शकले नाही. त्याचबरोबर उच्च शिक्षणासाठी इंग्लंडमधील विद्यापीठाच्याच धरतीवर जशाच तसे इथे विद्यापीठ रचना ठरविण्यात आली. परंतू येथील संस्कृती, वातावरणाचा विसर पडला तसेच इंग्लंडच्या विद्यापीठाबरोबरच भारतीय प्राचीन विद्यापीठांचा विचार होणे अपेक्षित होते.

**समारोप :**

वुडचा अहवाल सर्वसामान्यपणे शैक्षणिक विकासात प्रोत्साहन देणारा असला, तरी काहींनी त्याची 'भारतीय शिक्षणाचा मॅग्ना कार्टा' अशी जी प्रशंसा केली आहे, ती थोडी अतिशयोक्ती वाटते. तरीही खलित्यातील तरतुदी लक्षात घेता अहवालाने भारतातील शिक्षणाला नवी दिशा दिली. हे मान्य करावे लागेल. 1858 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार संपुष्टात येऊन भारतात भारताचा संपुर्ण कारभार ब्रिटीश राजघराणे व पार्लमेंट यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली आल्याने अहवालातील अनेक शिफारसी अंमलात येवू शकल्या नाहीत.

अशा प्रकारे उद्देश काहीही असो पण भारतात शिक्षण देण्यास सुरूवात केली आणि त्याचा परिणाम म्हणून भारतात शिक्षणाचे प्रमाण वाढण्यास मदत झाली. म्हणून शिक्षणात वूडच्या खलित्याचे हे योगदान नाकारता येणार नाही.

**संदर्भ :-**

1. भिंताडे वि. रा. (1989), शैक्षणिक संशोधन पध्दती नूतन प्रकाषन, पुणे.
2. मुळे आर. एस. उमाटे व्हि.टी.(1998), शैक्षणिक संषोधनाची मुलतत्वे (तिसरी आर्वृती) , विद्या प्रकाशन, औरंगाबाद
3. शेवतेकर शा. (2011), भारतीय शिक्षक शिक्षण प्रणाली, विद्या प्रणाली, विद्या प्रकाषन, पुणे.
4. Ali, B.S. (1978), History- Its theory and method pub. India, Ltd. Delhi
5. Chandra , SS & Sharma R.K. (2002) Research in Education New Delhi Atlantic publishers and distributors.

ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

# स्वातंत्र्यपूर्व काळातील महात्मा गांधीजींचे शैक्षणिक योगदान

**डॉ. वंदना लावंड**
सहाय्यक प्राध्यापक
आझाद कोलेत ऑफ एज्युकेशन, सातारा

**सारांश**

*महात्मा गांधीजींची वर्धा शिक्षण योजना ही विद्यार्थ्यांच्या 3 H चा विकास हा केंद्रबिंदू मानून तयार केलेली आहे. महात्मा गांधीजींच्या मते शिक्षण हे स्वाश्रयी असावे, हस्तव्यवसाय केंद्रबिंदू असणारे, मातृभाषा माध्यमातून दिले जावे तसेच सात ते चौदा वयोगटासाठी सक्तीचे व मोफत शिक्षण असावे. वर्तमानकाळातील शिक्षण योजनेत सुद्धा हे विचार मार्गदर्शक ठरतात.*

**प्रस्तावना**

भारत पारतंत्र्यात असताना महात्मा गांधीजीनी देशात जनतेच्या मनात देशाविषयी प्रेम निर्माण करून, आत्मविश्वास निर्माण करून पारतंत्र्यात परकीय सत्तेपासून मुक्त करण्यासाठी अहिंसेचा मार्ग स्वीकारून राजकीय चळवळ घडवून आणली होती. महात्मा गांधी हे राष्ट्रपिता म्हणून अजरामर झाले. महात्मा गांधीजी हे एक युगपुरुष होते. ते सत्याला परमेश्वराचे रूप मानत असत. अत्यंत साधी रहाणी व उच्च विचारसरणी, उच्च कर्तृत्व व शक्तीने संपूर्ण जगाला भारावून टाकले. मानवतेचे पुजारी, अहिंसेचे प्रवर्तक, श्रेष्ठ तत्वचिंतक शिक्षण तज्ज्ञ महात्मा गांधीजींचे शिक्षण विषयक विचार जाणून घेण्यापूर्वी त्यांचे जीवनविषयकचे तत्वज्ञान विचारात घ्यावे लागते. गांधीजींच्या जीवनविषयक तत्वज्ञानात अध्यात्मिकतेला विशेष प्राधान्य होते. 'जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा' हे जीवनाचे तत्वज्ञान होते. परमेश्वरावर अतूट श्रद्धा, अहिंसकता, सत्याग्रह याच दृष्टीकोनातून त्यांनी जीवनविषयक तत्वज्ञान मांडलेले आहे. गांधीजींचे शिक्षणविषयक विचार म्हणजे त्यांच्या जीवनविषयक तत्वज्ञानाचे व्यावहारिक रूप दिसते. त्यांच्या शिक्षणविषयक तत्वज्ञानात निसर्गवाद, कार्यवाद, आदर्शवाद यांचा समन्वय दिसून येतो.

इ.स. १९३७ साली वर्धा येथे राष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक परिषद घेण्यात आली होती. त्यामध्ये महात्मा गांधीजीनी आपले शैक्षणिक विचार मांडले. त्यावर विचार विनिमय करून एक शिक्षण योजना तयार केली तिला 'वर्धा शिक्षण योजना' किवा 'मुलोद्योगी शिक्षण योजना' म्हटले जाते. 'जीवन शिक्षण', 'बेसिक – बुनियादी शिक्षण', 'नयी तालीम' अशा अनेक नावानी ती ओळखली जावू लागली.

**महात्मा गांधीजींचे शिक्षणविषयक विचार**

समाज बदलण्यासाठी शिक्षण हे एक महत्त्वपुणे साधन आहे. समाजजीवनाला नवीन दिशा देण्याचे कार्य शिक्षण करते असा विचार महात्मा गांधीजीनी मांडलेला आहे. वर्तमान शिक्षण पद्धतीत महात्मा गांधीजींच्या मुलोद्योगी शिक्षण याची बीजे दिसून येतात. गांधीजींच्या मते केवळ 'साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे, ती शिक्षणाची सुरुवातही नव्हे. शरीर, मन आणि आत्मा यांचा सर्वांगीण विकास म्हणजे शिक्षण होय'. '3 H' चा विकास म्हणजे सर्वांगीण विकास होय.




वर्धा शिक्षण योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये महात्मा गांधीजींचे शैक्षणिक योगदान स्पष्ट दर्शवितात.

- शिक्षण हे स्वाश्रयी (self-supporting) असावे.
- मुलोद्योगातून शिक्षण – हस्तव्यवसाय हा शिक्षणाचा केंद्रबिंदू असावा.
- शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा असावे.
- सात ते चौदा वयोगटातील विद्यार्थांना सक्तीचे आणि मोफत शिक्षण असावे.

**स्वाश्रयी शिक्षण**

विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेत निरनिराळ्या वस्तू तयार करून, त्या विकून जो पैसा येईल त्यातून शाळेचा खर्च काही प्रमाणात भागविला जावा ते स्वाश्रयी शिक्षण होय. या योजनेत 'शिक्षण' हे प्रमुख मानले असून 'उत्पादन' हे दुय्यम स्थानी आहे. उत्पादन क्षमता हा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील एक महत्त्वाचा घटक मानला आहे. त्यामुळे शाळेचा खर्च भागविण्याचा प्रयत्न करावा पण ती आवश्यक अट नसावी. प्राथमिक स्तरावर व्यवसाय शिक्षणावर भर द्यावा तर माध्यमिक स्तरावर उत्पादनावर भर द्यावा असे सूचित केलेले आहे.

**मुलोद्योगातून शिक्षण – हस्तव्यवसाय**

शिक्षणामध्ये हस्तव्यवसाय किवा एखादा उद्योग हा प्रमुख विषय न ठेवता तो शिक्षणाचे माध्यम असावा. व्यवसाय म्हणजेच मूलोद्योग असे गांधीजींचे मत होते. प्रदेशाचा भौगोलिक आणि सामाजिक विचार करून शिक्षणामध्ये तेथील हस्तव्यवसायाचा समावेश करावा. यातून विद्यार्थ्यांच्या क्रियाशीलतेला चालना देवून मानसिक शक्तींचा विकास घडवावा. शिक्षण पुस्तक केंद्रित न ठेवता व्यवसाय केंद्रित ठेवून व्यक्तिविकास करावा.

हस्तव्यवसाय हे शिक्षणाचे माध्यम असावे व संपूर्ण अभ्यासक्रमाचा समावेश त्यामध्ये असावा म्हणजेच ज्ञान व व्यवसाय असे जीवनोपयोगी शिक्षण देणारा हा व्यवसाय असावा. हस्तव्यवसायाद्वारे व्यक्तीच्या ज्ञान आणि कौशल्याचा परिपूर्ण विकास होवून औपचारिक शिक्षणानंतर व्यक्तीला स्वतंत्रपणे व्यवसाय करता यावा. निवडलेला हस्तव्यवसाय व्यक्तीचा सर्वांगीण विकास करणारा म्हणजेच शारीरिक, मानसिक, भावनिक आणि नैतिक या सर्व अंगांचा विकास करणारा असावा. हस्तव्यवसाय कौशल्याधिष्ठीत असावा. यातून औद्योगिक शिक्षणाला आवश्यक असणाऱ्या सामाजिक नैतिक विकास साधला जावा.

**समवाय तत्व**

शिक्षणातील विविध विषयांमध्ये व त्यातून शिक्षण व जीवन यामध्ये समवाय साधला जावा हे गांधीजींचे उद्दिष्ट होते. कोणताही विषय पूर्णपणे स्वतंत्र नसून त्याचा इतर विषयांशी व जीवनाशी संबंध आहे हे शिक्षण माध्यमातून विद्यार्थ्यांना पटवून देणे म्हणजे समवाय साधणे होय. गांधीजींच्या मते मूलोद्योग हेच समवायाचे केंद्र नसून त्या प्रदेशातील प्राकृतिक परिसर, सामाजिक जीवन व सांस्कृतिक जीवन ही समवाय केंद्रे असावीत.

**शिक्षणाचे माध्यम मातृभाषा**

प्राथमिक स्तरावर मिळणारे ज्ञान हे मातृभाषेतून दिले जावे म्हणजे त्याचे आकलन उत्तम होते व विचार व्यक्त करण्यासाठी मातृभाषेसारखी उत्तम भाषा नसते असे गांधीजींचे मत होते. त्यामुळे शिक्षण हे मातृभाषेतूनच व्हावे.

**सक्तीचे आणि मोफत शिक्षण**

प्राथमिक स्तरावरील वयोगट सात ते अकरा व माध्यमिक स्तरावरील वयोगट अकरा ते चौदा या वयोगटातील विद्यार्थांना सक्तीचे आणि मोफत शिक्षण असावे अशी गांधीजींची धारणा होती.

**सामाजिक व नैतिक विकास**

मुलोद्योगी शिक्षण योजनेतून विद्यार्थ्यांचा सामाजिक व नैतिक विकास व्हावा म्हणून विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा अंतर्भाव केलेला दिसून येतो. विविध सण, उत्सव, जयंती पुण्यतिथी कार्यक्रम, साक्षरता प्रसार, ग्राम सफाई, सहली, भाषणे, चर्चा व वादविवाद, सामुदायिक प्रार्थना अशा कार्यक्रमांचे आयोजन विद्यार्थांनी करून समाजातील लोकांना त्यामध्ये समाविष्ट करून घ्यावे.

**समारोप**

महात्मा गांधीजींच्या मुलोद्योगी शिक्षण योजनेची वैशिष्ट्ये आपल्याला वर्तमान काळातील शैक्षणिक धोरणात झालेल्या बदलात दिसून येतात. जसे कि नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये विद्यार्थांनी शिक्षणाबरोबरच एखादे कौशल्य आत्मसात करावे अशा प्रकारचे अभ्यासक्रम तयार करण्यात आलेले दिसून येतात. यातूनच महात्मा गांधीजींची दूरदृष्टी दिसून येते व त्यांचे शिक्षण विषयक विचार अजूनही आपल्याला मार्गदर्शक ठरत आहेत.

**संदर्भसूची**

1. पण्डित, बन्सी बिहारी : उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, पिंपळापुरे अंड कंपनी नागपूर (२००९)
2. पाटील, अनिल : विद्याशाखा आणि विषयांची आकलन, प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव (२०१५)
3. करंदीकर, सुरेश : उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन कोल्हापूर (२०१०)

# डॉ पंजाबराव देशमुख यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य

**प्रा.डॉ.गोकुल शामराव डामरे**
स्व.उत्तमराव देशमुख अध्यापक
महाविदयालय,शेगांव.

**विषयाची पार्श्वभूमी:**

शिक्षण आणि उच्च शिक्षण या दोन बाबी वेगवेगळया आहेत. शिक्षणाची संकल्पना विषद करताना शिक्षणतज्ञ म्हणतात, जे पुस्तक उघडायला लावते ते शिक्षण आणि जे मन उघडायला लावते ते उच्च शिक्षण.शिक्षणाचे महत्व विशद करतांना प्रसिध्द कल्याणकारी अर्थशास्त्रज्ञ मार्शल म्हणतात, एका व्यक्तीच्या शिक्षणामुळे दुसऱ्याच्या कल्याणात वृध्दी होते.म्हणजेच व्यष्टीतून समूष्टीचा विकास साध्य होतो. तसेच प्रसिध्द विचारवंत डेनिसनच्या मते, शिक्षणातून आर्थिक वृध्दी गाठता येते.शिक्षणामुळे अमेरिकेच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात २३ टक्यांनी वाढ घडुन आलेली आहे. हा त्याचा बोलका पुरावा होय.

राष्ट्रातील समस्यांची सोडवणूक करण्यासाठी समाज उभा करावा लागतो. त्यासाठी एकनिष्ठ, बुध्दिनिष्ठ व विज्ञाननिष्ठ पिढीची गरज असते.हया पिढीने उभे राहायचे असते व समाजासमोरील समस्या सोडवायच्या असतात. एकदा समाज उभा राहिला की, समस्या आपोआप खाली बसतात. ही पिढी घडविण्याचे महत्त्वाचे आयुध म्हणजेच शिक्षण होय. कारण शिक्षण म्हणजे फक्त लिहिण्यावाचण्याचे महत्वाचे माध्यम न राहता ते ज्ञानाधिष्ठीत समाज व्यवस्थेत समाज परिवर्तनाचे व आर्थिक उन्नतीचे महत्वाचे साधन बनले आहे.म्हणूनच दिवसेंदिवस शिक्षण क्षेत्रांकडून समाजाच्या, राष्ट्राच्या अपेक्षा वाढत चालल्या आहेत.समाजाचे प्रश्न सोडवणं हे शिक्षणाचं खरं काम आहे. परंतु आजची परिस्थिती बरोबर उलट झाली आहे.शिक्षणाचे प्रश्न आज समाजाला सोडवण्याची वेळ आली आहे.त्यामुळे शिक्षण पध्दतीत मुलभूत स्वरुपाचे बदल होणे आवश्यक आहेत. त्यासाठी भरीव अर्थसंकल्पीय तरतुदीची गरज आहे.परंतु भारतात २००६—०७ मध्ये ही अर्थसंकल्पीय तरतुद एकुण GDP च्या फक्त २.७२ टक्के एवढी होती.ती थोडया थोडया प्रमाणात वाढत जान २०११—१२ पर्यंत पोहोचली. तज्ञांच्या अंदाजानुसार शिक्षण क्षेत्रावर एकूण GDP च्या जवळपास १० टक्के रक्कम खर्च झाली तर इच्छित विकास दर साध्य होईल.परंतु सांख्यिकीय तथ्य स्पष्ट करतात की, शिक्षण क्षेत्रावरील खर्चाचे हे प्रमाण ३ टक्यांच्या पुढे जायला तयार नाही. म्हणजेच भारतातच्या शिक्षण क्षेत्रासमोर आर्थिक चणचण जाणवत आहे.

थोडक्यात, शिक्षणाने समाजाला दृष्टी दिली पाहिजे.त्यातून व्यक्तीच्या विविध मानसिक क्षमतांचा विकास साधला जावा प्रत्येकास प्रगतीची संधी मिळावी.अर्थाजनाचे साधन आणि मुल्यसंस्काराची पेरणी व्हावी.त्यामुळेच घडेल विवेकनिष्ठ, बध्दिप्रामाण्यवादी, कार्यप्रवण,कर्तव्य, कर्तव्यदक्ष, सुजाण, चारित्रवान व नीतिसंपन्न समाज.

तात्पर्य, शिक्षण फक्त लिहिण्यावाचण्याचे माध्यम वा अर्थाजनाचे साधन नसुन ते यशस्वी जीवन जगण्याचे तंत्र आहे.शिक्षणाने प्रतिगामी विचार सरणीचा अस्त होउन वैज्ञानिक दृष्टीकोनाची वाढ होते. उद्योजकता वाढीस लागते. व्यक्तीमत्वाचा विकास होतो. म्हणूनच शिक्षणाच्या गुणवत्तेकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी शिकण्यात रस घेणारा विद्यार्थी व शिकविण्यात गोडी असणारा शिक्षक निर्माण करावा लागेल.त्यातुनच समाज सक्षमीकरणाचे उध्दिष्ट साध्य करता येईल, अन्यथा कधीही नाही.

त्यामुळे आज शिक्षण हा मनुष्याचा मुलभूत हक्क बनला आहे.ती मानवाची प्राथमिक गरज बनली आहे.शिक्षणामुळे आजचा बालक हा उद्याचा सुज्ञ नागरिक बनत असतो. त्यामुळेच संपूर्ण भारतातील सर्व ६ ते १४ वयोगटातील मुलामुलींना प्राथमिक शिक्षण हे मोफत व सक्तीचे करण्यात आले आहे.आज सर्वत्र शिक्षणाचे सार्वत्रीकरण झालेले दिसून येते. शासकीय व निमशासकीय शाळा व महाविद्यालय स्थापन करुन शिक्षणाची गंगोत्री शहरापासून ग्रामिण भागापर्यंत पोहचविण्याचे काम केंद्रसरकार व महाराष्ट्र सरकार

करत आहे. ग्रामिण भागातील विद्यार्थी शिकावा व शिक्षण घेउन स्वत:च्या पायावर उभा राहावा हाच व्यापक दृष्टीकोन त्यामागे आहे.

आधुनिक काळात पश्चिम महाराष्ट्रात समाजाला शिक्षण देण्याचे पवित्र कार्य महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाउराव पाटील यांनी केले होते. त्याचप्रमाणे विदर्भात बहुजन समाजाला शिक्षण देण्याचे कार्य डॉ पंजाबराव देशमुखांनी केले. आज विदर्भातील अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती ही एक अग्रगण्य शिक्षण संस्था म्हणुन ओळखली जाते. त्याचे सर्व श्रेय डॉ पंजाबराव देशमुखांना जाते.डॉ पंजाबराव देशमुख यांनी आपल्या संपुर्ण आयुष्यात सामाजिक, शैक्षणिक, राजकीय,कृषीविषयक क्षेत्रात महत्वपूर्ण कार्य केलेले आहे. वैदर्भिय समाजक्रांतीचा उदगाता म्हणून त्यांच्या या भरीव कार्याची नोंद घेणे आवश्यक आहे. शिक्षण व कृषी हे दोन विषय त्यांचे अगदी जिव्हाळयाचे विषय होते. त्यापैकी शिक्षण क्षेत्राला त्यांनी आपल्या कर्तुत्वाची जरी काठाची झालर लावलेली आपल्याला दिसून येते.त्यांच्या या कलाकुसरीची जाणीव त्यांनी दिलेल्या शिक्षण विषयक पुढील विचारांवरुन होउ शकते. प्रतिकूल परिस्थिती देखील मनुष्याला हर प्रकरणी फायदेशीर होते, असे मी म्हटले तर ते चमत्कारिकपणाचे वाटेल, परंतु माझे असे प्रामाणिक मत बनले आहे की, लहानपणापासून विशेषत: शिक्षण प्राप्त करुन घेताना ज्या अडचणींना व संकटांना मला तोंड द्यावे लागले. त्या अडचणी व संकटे ही मार्गात आडवी आली नसती तर आज कोणतेही कार्य करावची जी बेसुमार हौस माण्यात आहे व निष्टेने सार्वजनिक हिताची काम करायची जी दुर्दम्य इच्छा शक्ती तरुणपणापासून माझयात निर्माण झाली. ती हौस व इच्छाशक्ती माझया अंगी मुळीच दिसुन आली नसती.डॉ पंजाबराव देशमुख बालपणापासून जिज्ञासु वृत्तीचे होते. विचाराच्या मुळाशी जाउन त्याचा शोध घेण्याची त्यांची अविरत धडपड असे. शिक्षण घेत असताना त्यांना अनेक प्रकारे त्रास झाला होता. या गावाहून त्या गावात अशी भटकंती करावी लागला होती. शिक्षणासाठी त्यांना अनेक वेळा ज्या दिव्यातुन जावे लागले. त्याची त्यांना पूर्ण जाणीव होती.आपला बालमित्र लोभ्या शिक्षण घेउ शकत नाही, हयांची त्यांना खंत वाटे. त्यामुळे आपल्या ग्रामिण भागातील समाज बांधवांना असा त्रास होउ नये,शेतकऱ्यांच्या मुलांना सहज शिक्षण घेता यावे म्हणून ज्ञानाची गंगा त्यांच्या दारापर्यंत कशी आणता येईल हा विचार ते करु लागले.परंतू हा विचार प्रत्यक्षात अंमलात आणण्यासाठी त्यांना स्वत: शिक्षित होणे आवश्यक होते.त्यामुळेच त्यांनी अनेक अडचणींवर मात करुन आपले उच्चशिक्षण उत्तम प्रकारे पार पाडले होते.स्वत:च्या सुखाचा त्याग करुन डॉ पंजाबराव देखमुखांनी आपल्या आयुष्याची काही वर्ष विद्याभ्यासात खर्च केली होती. जेजे आपणाशी ठाव ते ते इतरांशी शिकवावे शहाणे करावे सकळजण ही संत तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीच स्मरण करुनच ते मायदेशी परतले होते.

स्वत: शेतकऱ्याचा मुलगा म्हणून त्यांना शेतकरी, कामकरी वर्गाविषयी जास्त आकर्षण होते.त्यामुळे सतत त्या लोकांच्याच कल्याणाचा विचार ते करीत असत. शेतकरी हा अगदी असहय आहे.बुध्दीमत्ता असून सुध्दा तो आपल्या मुलांना महागडे शिक्षण देउ शकत नाही.त्यासाठी आपण स्वत: काहीतरी केले पाहिजे हा ध्यास डॉ पंजाबराव देशमुख यांनी घेतला होता शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणविषयक सोयी उपलब्ध करुन देणे ही अत्यंत महत्वाची बाब त्यांना वाटत होती. त्यावेळी विदर्भातील ४० एकर जमीन असलेला शेतकरी आपल्या पाल्यास शिक्षण देउ शकत नव्हता, ही शोकांतीका होती.त्याला अनेक कारणे कारणीभूत होती. इ.स. १९०५ पासूनच श्री दादासाहेब खापर्डे, वीर वामनराव जोशी, रा.ब. मुधोळकर आदी लोकांनी बेरार शिक्षण संस्थांच्या अंतर्गत काशिबाई विद्यालय सुरु केलेले होते.तसेच इ.स. १९२४ मध्ये श्री इनामदार न्यु इंग्लिश स्कूल स्थापन करणार असल्याचे कळले.तेव्हा विदर्भातील विद्या दारिद्रय दूर करणारा हा उपक्रम त्यांना मनापासून आवडला होता.वरील सर्व परिस्थितीचे अवलोकन करताना डॉ पंजाबराव देशमुखांना राजर्षी छ. शाहू महाराजांची आठवण झाली. एकदा राजर्षी छ शाहू महाराज म्हणाले होते,ब्राम्हण ब्राम्हणोत्तर चढाओढीच्या काळात मराठा समाजाचा टिकाव लागावा असे वाटत असेल तर मराठा विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या हायस्कूल, बोर्डिंग सारख्या संस्था निर्माण व्हायलाच पाहिजे या विचाराने त्यांचा पाठपुरावा केला होता.त्यामुळे या विचारानुसारच त्यांनी आपले पुढील संपूर्ण आयुष्य वेचलेले होते.

१५ जुलै इ स १९२६ रोजी डॉ पंजाबराव देशमुख एम ए ऑनर्स संस्कृत, डी फिल, बार अॅट लॉ अशा बहूमोल आंग्ल पदव्यांनी विभूषित होउन भारतात आले.ते आपल्या सामाजिक कार्याच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी आले होते. अमरावतीला ज्या दिवशी त्यांनी आपले एक पाउल बार लॉ मध्ये ठेवले त्याच दिवशी दुसरे पाउुल शिक्षक म्हणून श्री शिवाजी मराठा हायस्कूमध्ये ठेवले होते.म्हणजेच त्यांनी सर्वप्रथम महत्व शैक्षणिक प्रश्नाला दिले होते. देशातील ५ टक्के लोक सुशिक्षित आहेत आणि ९५ टक्के लोक अशिक्षित आहेत, अंधारात आहेत, अर्धपोटी आहेत.जातीच्या नावाखाली, धर्माच्या नावाखाली विभक्त आहेत.अंधश्रध्देच्या काळोखात अडकलेले आहेत.अशा लोकांना स्वराज्याची चळवळ समाजकारणातून समजावून सांगितली पाहिजे.त्यांना शिक्षण देउन जागे केले पाहिजे असे डॉ पंजाबराव देखमुखांना वाटत होते.

डॉ पंजाबराव देशमुख इंग्लंडमध्ये असताना निदर्शनात आले की, इंग्लंडमध्ये गरिबातल्या गरिब नागरिकांना शिक्षण व इतर सुखयोगी मिळतात.तर भारतामध्ये बहुतांश समाज हा शिक्षणापासुन वंचित आहे. या सर्व सोयी इंग्लंडमध्ये उपलब्ध असल्यामुळेच इंग्लंड हा इ स १९ व्या शतकात जागतिक शक्ती म्हणून ओळखला जात होता. कारण शिक्षण ही व्यक्ती विकासाची पहिली पायरी आहे.शिक्षणाने व्यक्तीचा विकास झाल्यास कुटूंबाचा विकास होतो व कुटुंब विकासातूनच राष्टुविकास घडून येतो. याची प्रचिती डॉ पंजाबराव देशमुख यांना इंग्लंडमधील वास्तव्यात आली होती. इ स १९ व्या शतकात इंग्लंडचे अर्ध्या जगावर साम्राज्य होते.तसेच भारताला गुलामगिरीतून मुक्त करायचे असेल तर येथील समाज शिक्षित होणे आवश्यक आहे. त्यातूनच सुदृढ समाजाची निर्मिती होईल, अशा आशावाद डॉ पंजाबराव देशमुखांना होता.म्हणूनच ते इंग्लंड वरुन उच्च शिक्षण घेउन परत येताच आपले संपूर्ण लक्ष शिक्षणावर केंद्रित केले होते. या संदर्भात त्यांचे एक सहकारी श्री दौलतराव गोळे म्हणतात बहूजन समाजाची शैक्षणिक प्रगती आणि शेतक+यांची उन्नती ही दोन पैलू त्यांच्या भाषणात वेळोवेळी आलेले दिसतात.हया दोन मध्यबिंदू करताच त्यांच्या राजकीय व इतर साऱ्या खटपटी नी झटपटी आहेत हे स्पष्टपणे निदर्शनास यायला वेळ लागणार नाही. शिक्षण क्षेत्र हे डॉ पंजाबराव देशमुख यांचे आवडते क्षेत्र होते. त्यांनी या क्षेत्रात आपला एक स्वतंत्र ठसा उमटविलेला दिसून येतो.

**संशोधन निबंध विषयाचे शिर्षक :—** डॉ पंजाबराव देशमुख यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य

**संशोधन निबंध विषयाचे उद्दिष्टये :—** प्रस्तुत संशोधनात समस्येची उदिष्टे पुढीलप्रमाणे आहे.

1) आजच्या शिक्षण पध्दतीचा आढावा घेणे.
2) आजच्या शिक्षण पध्दतीतील डॉ पंजाबराव देशमुख यांच्या कार्याचा आढावा घेणे.
3) आजच्या शिक्षण पध्दतीतील डॉ पंजाबराव देशमुख यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा आढावा घेणे.

**संशोधन निबंध विषयाची व्याप्ती व मर्यादा :—**

१.प्रस्तुत संशोधनात डॉ पंजाबराव देशमुख यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याचा समावेश करण्यात आला आहे.

२.प्रस्तुत संशोधनात आजच्या शिक्षण पध्दतीतील डॉ पंजाबराव देशमुख यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा समावेश करण्यात आला आहे

**संशोधन निबंध विषयाची संशोधन पद्धती :—**

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन निबंध विषयाचे निष्कर्ष :—**

१.शिक्षण ही व्यक्ती विकासाची पहिली पायरी आहे.शिक्षणाने व्यक्तीचा विकास झाल्यास कुटूंबाचा विकास होतो व कुटुंब विकासातूनच राष्टविकास घडून येतो.

२.डॉ पंजाबराव देशमुख यांनी सर्वप्रथम महत्व शैक्षणिक प्रश्नाला दिले होते.

३.शिक्षण क्षेत्र हे डॉ पंजाबराव देशमुख यांचे आवडते क्षेत्र होते. त्यांनी या क्षेत्रात आपला एक स्वतंत्र ठसा उमटविलेला दिसून येतो.

४.डॉ पंजाबराव देशमुख बालपणापासून जिज्ञासु वृत्तीचे होते.विचाराच्या मुळाशी जाउन त्याचा शोध घेण्याची त्यांची अविरत धडपड असे.

५.आधुनिक काळात पश्चिम महाराष्ट्रात समाजाला शिक्षण देण्याचे पवित्र कार्य महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाउराव पाटील यांनी केले होते.त्याचप्रमाणे विदर्भात बहुजन समाजाला शिक्षण देण्याचे कार्य डॉ पंजाबराव देशमुखांनी केले.

६.आज विदर्भातील अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती ही एक अग्रगण्य शिक्षण संस्था म्हणुन ओळखली जाते. त्याचे सर्व श्रेय डॉ पंजाबराव देशमुखांना जाते.

७.डॉ पंजाबराव देशमुख यांनी आपल्या संपुर्ण आयुष्यात सामाजिक, शैक्षणिक, राजकीय,कृषीविषयक क्षेत्रात महत्वपूर्ण कार्य केलेले आहे.

**संशोधन निबंध विषयाची शिफारशी :—**

१.डॉ पंजाबराव देशमुख यांच्या नावाचे शैक्षणिक संशोधन केंदाची स्थापना करावी.

२.डॉ पंजाबराव देशमुख यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याचा समावेश उच्च शिक्षणात करावा.

**संदर्भ ग्रंथ सुची :**

१.घोरमोडे के यु घोरमोडे कला २००८ शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपूर विद्या प्रकाशन
2. पारसनीस न.रा. (2005) : शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमिका, नूतन प्रकाशन, पूणे.
3. पिंजरकर एस. के. (2016) : समकालीन भारतीय शिक्षण, नभ प्रकाशन, अमरावती

# स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील शिक्षण

महादेव बालासाहेब लोखंडे
M.A.Med., M.Phil.set
(संशोधक विद्यार्थी एस.आर.टी.एम.यु.नांदेड)

प्रस्तावना :–

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात शिक्षणाची दयनीय अवस्था होती. परकीय कंपन्यांनी भारतात आपला जम जमविण्याचा कसोशीने प्रयत्न चालविला होता. भारतात ज्या स्थानिक शाळा कार्यरत होत्या त्यांना श्व्हर्नाक्युलरश अथवा श्नेटिव्हश या नावाने संबोधले जात असे. अशा शाळा हिंदू आणि मुसलमानांकरिता अलग–अलग होत्या. अशा शाळांमधून हिंदु मुसलमानास त्यांच्या धर्मानुसार संस्कृतीचे,साहित्याचे शिक्षण दिले जाई. शिक्षण देणारेही पंडित मौलवी असत. इंग्रज भारतात आल्यावर येथे मशिनरी शाळा सुरू करण्यात आल्या. याबाबतीत भारतीय लोकही मागे राहिले नाही. त्यांनीही पूर्वीच्या शाळेत थोडासा बदल करून येथे शाळा सुरू केल्या. या शाळांना एतद्देशीय शाळा किंवा देशी शाळा (Indigeneous School) म्हणून संबोधण्यात येत होते.

स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षणविषयक ध्येये :–

स्वातंत्र्यपूर्व कालखंड हा ब्रिटिश कालखंड समजला जातो. वेगळया शब्दात मध्ययुगीन कालखंडातील उत्तरार्ध हा स्वातंत्र्यपूर्व कालखंड आहे. इ.स.१६०० ते १९४७ हा कालखंड स्वातंत्र्यपूर्व कालखंड समजला जातो. भारतात ब्रिटिश व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले. ब्रिटिशांचे आगमन झाले तेव्हा भारतात व्हर्नाक्युलर/नेटिव्ह शाळा होत्या. या शाळा हिंदू आणि मुस्लिम समाजास त्यांच्या गरजेनुसार धर्म,संस्कृती आणि साहित्याची शिक्षण देण्याचे कार्य करत असे. भारतीय समाजाने सुरू केलेल्या शाळांना देशी शाळा किंवा ऐतद्देशीय शाळा समजते जात. या शाळांमध्ये मातृभाषेतून शिक्षण दिले जात होते. भारतीय शिक्षणाचे वैशिष्ट्य म्हणजे लिहिणे, वाचणे आणि हिशेब करणे इतकेच होते. इ.स.१६०० मध्ये ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली. त्यांनी व्यापारासोबत शिक्षण, धर्मप्रसार आणि सामाजिक दर्जा उंचावण्याचे सूत्र स्वीकारून येथे सत्ता संपादनाचे कार्य सुरू केले. ब्रिटिशकालीन शिक्षणाचे टप्पे पुढीलप्रमाणे –

१. १८१३ चा सनदी कायदा :–

१८१३ च्या कायद्यालाच चार्टर अॅक्ट असे म्हणतात. या कायद्यातील कलम ४३ नुसार भारतातील शिक्षणाची जबाबदारी ईस्ट इंडिया कंपनीकडे सोपविण्यात आली. या कंपनीने दरवर्षी एक लाख रूपये भारतीय शिक्षणावर खर्च करावे अशी तरतूद या कलमात आहे. भारतीय कायदा साहित्य, विद्वान इ.शब्दांचा समावेश याच कलमात आहे. तथापि भारतीय कायदा म्हणजे भारतासाठीचे ब्रिटिश कायदे, साहित्य म्हणजे भारतीय साहित्य की पाश्चिमात्य साहित्य आणि विद्वान म्हणजे संस्कृत भाषा जाणणारे की आरबी भाषा जाणणारे की ब्रिटिश विद्वान इ.बाबत एकवाक्यता आढळून येत नाही. ईस्ट इंडिया कंपनीने एक लाख रूपये हिंदू शाळा/देशी शाळा,मकतब आणि मदरसे,ब्रिटिश शाळा यापैकी कोणत्या शाळांवर खर्च करावे याबाबतही एकमत नसल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. १९२३ मध्ये लोकशिक्षण समिती बंगालमध्ये नेमण्यात आली.

२. लॉर्ड मेकॅलेचा जाहीरनामा :–

१८१३ च्या सनदी कायद्यातील कलम ४३ चा अर्थ स्पष्ट करण्यासाठी लॉर्ड मेकॅले (एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचा सल्लागार) यांना विचारण्यात आले. त्यांनी आपले मत देताना लॉर्ड बेंटिंग यांना लेखी विवरण पत्र दिले. ते त्यांनी स्वीकारले आणि गर्व्हनर जनरलच्या कार्यकारी सभेत २ फेब्रुवारी १८३५ रोजी चर्चेला घेतले. त्यास मेकॅलेचा शिक्षण विषयक जाहीरनामा म्हणतात. मेकॅलेच्या जाहीरनाम्यास मेकॅलेचे विवरणपत्र, मेकॅलेचा खलिता, मेकॅलेचे मिनिट असेही म्हणतात. मेकॅले यांनी सनदी कायदा १८१३ मधील कलम ४३ चा अर्थ लावताना स्वत:चे मत असलेले विवरणपत्र दिले म्हणून त्यास विवरणपत्र असे म्हणतात. हे विवरणपत्र २ फेब्रुवारी १८३५ च्या सभेत मंजूर झाले आणि मंजूर झालेल्या विषयाचे सभा इतिवृत्त तयार केले जाते म्हणून त्यास श्मेकॅले मिनिटश असेही म्हणतात. मेकॅलेने आपले

विचार खलित्यातून पाठविले. खलिता म्हणजे पाकीट. त्यामुळे त्यास मेकॅलेचा खलिता असेही म्हणतात. इतिवृत्त हे ७ मार्चला जाहीर झाले म्हणून त्यास मेकॅलेचा जाहीरनामा म्हणतात. हा जाहीरनामा ७ मार्च १८३५ रोजी प्रसिध्द करण्यात आला, यातील तरतुदी पुढीलप्रमाणे—

१. रूपये एक लाख शिक्षणावर कोणत्या पध्दतीने खर्च करावेत याबाबत नियमामध्ये स्पष्ट मत दिलेले नाही. त्यामुळे ब्रिटिश सरकार त्यांच्या इच्छेप्रमाणे खर्च करू शकते.
२. साहित्य या शब्दाचा अर्थ फक्त श्संस्कृतश आणि श्अरबी साहित्यश इतकाच नसून त्यामध्ये इंग्रजी साहित्य चाही समावेश आहे.
३. विद्वान या शब्दाचा अर्थ श्सस्कृत पंडितश आणि मुस्लिम मौल्वी सोबत इंग्रजी व इतर भाषा जाणणारे विद्वानसुध्दा समाविष्ट आहे.

वरील स्पष्टीकरण दिल्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना पारंपारिक शिक्षण द्यावयाचे की इंग्रजी माध्यमातून भाषा व साहित्याचे शिक्षण द्यावयाचे असा भाग सुरू झाला, तेंव्हा मेकॅले यांनी आपले विचार पुढीलप्रमाणे व्यक्त केले.

अ. जगातील सर्व भाषांमध्ये इंग्रजी भाषा सर्वश्रेष्ठ आहे.
ब. राज्यकर्त्यांची आणि उच्च वर्णियांची भाषा इंग्रजी आहे. ब्रिटिश हे रंगाने गोरे असल्यामुळे स्वत:स उच्चवर्णीय समजत.
क. पूर्वेकडील देशामध्ये व्यापारवाढीसाठी व सत्ता संपादनासाठी इंग्रजी भाषाच योग्य आहे.
ड. कोणत्याही व्यक्तीच्या प्रकृतीला चांगले असेल ते शिकविले पाहिजे, जीभेला काय आवडते याचा विचार करण्याची गरज नाही.
इ. ब्रिटिशांना भारतात असा वर्ग शिक्षणाद्वारे निर्माण करावयाचा आहे की जो रक्ताने आणि वर्णाने पूर्ण भारतीय असेल; परंतु संस्कृती,नीतिमूल्ये,बुध्दी आणि आवडीनिवडीच्या बाबतीत इंग्रजी असेल.(१९३५ ते विचार आणि २००९ चा भारत)
फ. युरोपीय साहित्य व विज्ञान यांचा भारतीय समाजात प्रसार करणे हा ब्रिटिश सरकारचा हेतू असावा.

वरील सर्व विधाने आणि जाहीरनाम्यातील वस्तुस्थिती विचारात घेता मेकॅलेचा दृष्टिकोन किती आणि कसा होता हे कळते. या दृष्टिकोनाचे त्यावेळेस स्वागत झाले तर काहींनी त्यावर टीका केली. भारतातील तरूण पिढी ब्रिटिश,अमेरिका,कॅनडा,जर्मन,फ्रान्स आणि ऑस्ट्रेलिया इ.देशांत स्थलांतरित होत आहे. भारतातील आजचे समाजमन,महाविद्यालय आणि विद्यापीठातील स्थितीचा विचार करता मेकॅलेचा त्यावेळेचा विचार किती प्रभावी होता हे आपण टीकात्मक पध्दतीने विचारात घेऊ शकतो.

३. बेटिंगचा अहवाल :—

भारतात १८१३ मध्ये सनदी कायका मंजूर करण्यात आला. हा कायदा अनुदान (ग्रॅंट) योजनेतून मंजूर करण्यात आलेला असल्याने या कायद्यातील कलम ४३ चा अर्थ सुस्पष्ट नव्हता. या कलमाचा अर्थ लावण्यासाठी १८३४ मध्ये इंग्रजी भाषा आणि संस्कृतीचा अभिमान असलेला विद्वान,लेखक आणि उत्तम वक्तृत्वपटू आणि कार्यकारी परिषदेचा सल्लागार लॉर्ड मेकॅले यांचे भारतात आगमन झाले.त्यांनी आपले कलम ४३ बद्दलचे मत गर्व्हनर जनरल लॉर्ड बेटिंगला सादर केले ते ७ मार्च १८३५ रोजी मेकॅलेचा जाहीरनामा या शीर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात आले. त्यानुसार लॉर्ड बेटिंग यांनी ब्रिटिश सरकारचा शिक्षणविषयक अहवाल प्रसिध्द केला. लॉर्ड बेटिंग यांनी ब्रिटिश सरकारचा शिक्षणविषयक अहवाल प्रसिध्द केला. लॉर्ड बेटिंग यांनी प्रिन्सेप या पाश्चिमात्याकडे अभिप्रायासाठी पाठविला. १५ फेब्रुवारी १८३५ रोजी दिलेल्या स्पष्टीकरणाला उत्तर दिले. त्यानुसार शिक्षण देशी भाषेतून द्यावी त्यासाठी संस्कृत व अरबी भाषेला महत्व द्यावे. भारतीय शिक्षण केंद्रे सुरू करावीत हा विचार लॉर्ड बेटिंगने स्वीकारला नाही व 'युरोपीय साहित्य व विज्ञान यांचा भारतीय समाजात प्रसार करणे हाच भाग ब्रिटिश सरकारचा प्रमुख हेतू असला पाहिजे,शिक्षणासाठी निर्धारित केलेला सर्व निधी फक्त इंग्रजी शिक्षणावरच खर्च करणे योग्य ठरेल,' असे मत व्यक्त केले.या विधानावरून बेटिंगच्या अहवालाचे महत्व पुढीलप्रमाणे—

अ. ब्रिटिश शासनाचे ध्येय भारतीय लोकांना ज्ञान, विज्ञान व युरोपीयन साहित्य शिकविणे हा आहे.

ब. ईस्ट इंडिया कंपनीने दरवर्षी खर्च करावयाचे एक लाख रूप्ये हे ज्ञान विज्ञान व युरोपीय साहित्य शिकविणाऱ्या संस्थांना देण्यात यावे.

क. भारतीय भाषेतील पुस्तकांची छपाई करण्यासाठी पैशाचा अपव्यय करू नये.

ड. भारतीय शिक्षण संस्था बंद न करता त्यांना अर्थसहाय्य, वेतन आणि शिष्यवृत्ती द्यावी तसेच शिक्षणाची पदे लोकशिक्षण समितीच्या सल्ल्यानुसार भरण्यात यावी.

वरीलप्रमाणे भारतीय शिक्षणामध्ये पाश्चिमात्य शिक्षणाला महत्व देणारा बेटिंगचा अहवाल

समारोप :—

वरिल प्रमाणे स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षण या विषयी माझे विचार हे श्ब्दबध्द करण्यात आले.यामध्ये सांगत असताना स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील शिक्षणाच्या संदर्भात कशा पध्दतीने शिक्षण दिल्या जात असत/किंवा स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील शिक्षणाची आवस्था कशा प्रकारची होती हे आपण वरिल लेखामध्ये पाहितले तसेच स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील सनदी कायदा,लॉर्ड मेकॅलेचा जाहिरनामा व बेटिंगचा अहवाल या विषयी थोडक्यात विचार मांडण्याचे काम प्रस्तुत लेखा मध्ये करण्यात आले आहे.

संदर्भ ग्रंथ :—

१. शिक्षण संक्रमण
२. भारतीय शिक्षणाचा इतिहास
३. भारतीय शिक्षण सद्यस्थिती समस्या आणि उपाय:
४. जिवन शिक्षण

# बौध्द तत्वज्ञानाची आजच्या शिक्षणप्रणालीस गरज : एक अभ्यास

महेंद्र अच्युत आल्टे
सहायक प्राध्यापक,
इंदिरा कॉलेज ऑफ एज्युकेशन
विष्णुपूरी नांदेड.

प्रस्तावना :

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. प्रत्येक व्यक्तीची जडणघडण ही या समाजातच होत असते, ही जडणघडण होत असताना त्याच्या व्यक्तिमत्वाचा देखील विकास होत असतो. म्हणजेच प्रत्येक व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक, बौध्दीक विकासात समाजाची भूमिका ही महत्वाची असते अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या मुलभूत गरजा आहेत तसेच शिक्षण ही देखील माणसाची मुलभूत गरज झालेली आहे. कारण शिक्षणाने माणसाला माणुसपण येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, मनुष्याच्या सर्व सामाजिक दुखण्यांवर शिक्षण हेच एकमेव औषध आहे. मनुष्याला समाजात जीवन जगताना स्वत: बरोबरच कुटूंबाचा व राष्ट्राचा विकास करावयाचा असेल तर शिक्षणाची कास प्रत्येकाने धरावयास हवी भारतीय संस्कृती आणि भारतीय विचारांनी जगाला मोहिनी घातली आहे. कारण ही संस्कृती जोपासण्याचे कार्य येथील शिक्षण पध्दतींनी केलेले आहे या संस्कृतीच्या विकासासाठी शिक्षण हेच एकमेव माध्यम आहे. आजच्या सद्य परिस्थितीत शिक्षण हक्क अधिनियम २००९ अन्वये शिक्षण हा प्रत्येक भारतीयांचा मुलभूत अधिकार झालेला आहे त्याचप्रमाणे राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर शिक्षणविषयक कार्य करणाऱ्या युनो, युनेस्को, युनिसेफ या सारख्या संघटनांनी शिक्षणाचा पुरस्कार करून शिक्षण मनुष्याची एक नितांत गरज आहे हे मान्य केलेले आहे.

शिक्षण ही एक निरंतर आणि सतत चालणारी प्रक्रिया असल्यामुळे या शिक्षणात काळानुरूप बदल हा झालेला आहे. वैदिक शिक्षण, बौध्दकालीन शिक्षण, मुस्लिमकालीन शिक्षण या तीन काळात शिक्षणाची संकल्पना, शिक्षणाची ध्येय, अध्यापन पध्दती, गुरू–शिष्य संबंध, अभ्यासक्रम, स्त्रीशिक्षण यामध्ये फरक असलेला दिसून येतो. इसपुर्व सहावे शतक हे भारताच्या अनेक दृष्टीने महत्वाचे मानले जाते कारण याच काळामध्ये भारतात नवीन धर्माचा उदय झाला. वैदिक काळात चातुर्वण्य व्यवस्थेमुळे समाजात असमानतेचे वातावरण निर्माण झाले होते. वैदिक धर्मात यज्ञसंस्थेला अवास्तव महत्व होते. भाषेची क्लिष्टता, अनिष्ट रूढी व परंपरा यावर अधिक भर या सर्व कारणामुळे धार्मिक क्षेत्रात वैचारिक संघर्ष सुरू झाला व याच काळात न्याय, स्वातंत्र्य, समतेवर आधारित आणि मानवाला सर्वोच्च स्थान देणाऱ्या बौध्द धम्माचा आणि बौध्द तत्वज्ञानाचा उदय झाला. तथागत गोतम बुध्द यांनी बौध्द तत्वज्ञानाच्या प्रचार आणि प्रसारासाठी संपूर्ण आयुष्य व्यतीत केले. गोतम बुध्दांनी जे तत्वज्ञान सांगितले त्याचा स्वत:देखील स्वीकार त्यांनी केला. तथागत जसे बोलतात तसे करतात आणि जसे करतात तसेच बोलतात. म्हणजेच ते 'यथावादी तथाकारी, यथाकारी तथावादी' होते. म्हणूनच त्यांना तथागत ही बिरूदावली यथार्थ शोभून दिसते.

उद्देश :

१) बौध्द तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.

२) बौध्द तत्वज्ञानाची आजच्या शिक्षणप्रणालीस गरज का आहे याचा अभ्यास करणे.

बौध्द तत्वज्ञान :

भारतामध्ये आणि भारताबाहेर क्रांती घडवुन आणणारा बौध्द धम्म इसपूर्व सहाव्या शतकात उदयास आला वैदिक धर्मातील कर्मकांड यज्ञ, जातीव्यवस्था व क्लिष्ट धार्मिक तत्वज्ञानापेक्षा मानवतावादी बौध्द धम्माचा उदय झाला. बुध्दांच्या निर्वाणानंतर त्यांच्या शिकवणीबाबत काही विवाद निर्माण झालेले होते. या विवादाचे समर्थन करण्यासाठी एक परिषद मगध जवळील राजगृह येथे भरली बुध्दांविषयी असलेल्या श्रध्दा, विश्वास व बुध्दाची शिकवण यांचे संकलन इसपु २४१ च्या तिसऱ्या परिषदेमध्ये करण्यात आले या संकलनास पिटक असे म्हणतात. हे पिटक तीन प्रकारचे आहेत.

पिटक

अभिधम्म पिटक | विनय पिटक | सुत्त पिटक

अभिधम्म पिटकामध्ये बुध्दांचा दृष्टीकोन स्पष्ट केलेला आहे. तर विनय पिटकामध्ये बुध्दांनी शिस्तविषयक सांगितलेले नियम आहेत. तसेच सुत्त पिटकामध्ये बुध्दांनी सांगितलेल्या जातक कथा यांचा समावेश केलेला आहे. बुध्दांनी सांगितलेली त्रिरत्ने बौध्द तत्वज्ञनात दिसून येतात ती पुढील प्रमाणे.

त्रिरत्ने

प्रज्ञा | शील | करूणा

प्रज्ञा, शील आणि करूणा हा आष्टांगिक मार्गाचा गाभा आहे. म्हणून यास त्रिरत्ने असे म्हणतात. प्रज्ञा म्हणजे विधायक विद्‌वत्ता होय. शील हे प्रज्ञावंताचे लेने असते यामुळे प्रज्ञावंत हा शीलवानच असावा आणि प्रज्ञावंत व शीलवंत यांना दु:खीतांबद्‌दल दया, करूणा व सहानुभूती असली पाहिजे. प्रज्ञा, शील, करूणा हे बौध्द तत्वज्ञानाचे प्रमुख आधारस्तंभ आहेत. तथागत गोतम बुध्दांनी सांगितलेल्या चार आर्यसत्यांचे ज्ञान होणे आणि प्रेम, क्षमा, शांती, अहिंसा इत्यादी तत्वांचा अंगीकार मनुष्याने करणे गरजेचे आहे कारण यातूनच मनुष्याला सुख, समाधान आणि आनंदी मिळणार आहे. अशी तथागतांची विचारसरणी होती. बुध्दांनी दु:ख, दु:ख समुह, दु:ख निरोध, दु:ख निरोध गामिनी ही चार आर्यसत्य सांगितलेली आहेत. ही चार आर्यसत्य म्हणजेच मनुष्याच्या जीवनात दु:ख आहे,या दु:खाला कारण आहे, दु:ख मुक्तीचा मार्ग आहे आणि तो मार्ग म्हणजेच आष्टांगिक मार्ग होय. तथागतांनी या चार आर्यसत्यांवरती उपाय म्हणून आष्टांगिक मार्ग सांगितला.

बौध्द तत्वज्ञनाची आजच्या शिक्षणप्रणालीस गरज

बौध्द तत्वज्ञनाने एक नवा विचार एक नवा दृष्टीकोन आपल्या तत्वज्ञानातून समाजासमोर ठेवला. गोतम बुध्दांनी बौध्द तत्वज्ञानाच्या प्रचार आणि प्रसारासाठी भिक्खु संघ निर्माण केला होता. एखादा विचार किंवा तत्वज्ञान खुप चांगले असले आणि त्या विचारांचा जर प्रचार–प्रसार होत नसेल तर तो विचार कुजकामी ठरत असतो. म्हणून बौध्द तत्वज्ञानाचा आणि शिकवणुकीचा जगभर प्रसार होणे ही काळाची गरज बनली आहे. गोतम बुध्दांनी आपल्या स्वत:च्या आचरणातून, त्यागातून एक आदर्श अशा समाजाची निर्मिती केलेली होती. हजारो वर्षे झाले तरी देखील गोतम बुध्दांचा क्रांतिकारी विचार काळानुरूप आज जसाच्या तसा लागू पडत आहे. वर्तमान परिस्थितीत जगभर अराजकता, हिंसा, अशांतता निर्माण झालेली आहे प्रत्येक राष्ट्र एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करत आहे यामध्ये मनुष्याची जीवनमूल्ये ही पायदळीस तुडवली जात आहेत म्हणून आजच्या शिक्षणपध्दतीमध्ये अमुलाग्र बदल घडवुन आणावयाचा असेल तर आजच्या शिक्षणप्रणालीस खऱ्या अर्थाने बौध्द तत्वज्ञानाची गरज आहे असे आपणास म्हणता येईल. बौध्द तत्वज्ञानाची गरज का आहे ते पुढील मुद्दयांच्या अनुशंगाने स्पष्ट करता येते.

न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता प्रस्थापित करण्यासाठी :

भारतीय संविधानाने सर्वांना समान हक्क आणि समान अधिकार बहाल केलेले आहेत. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेवर आधारित समाज आणि राष्ट्राची निर्मिती करावयाची असेल तर बुध्दांच्या आष्टांगिक मार्गाची तसेच पंचशील तत्वांचा शिक्षणामध्ये आग्रह धरणे आवश्यकच आहे. बौध्द तत्वज्ञाचा अंगीकार जर आजच्या विदयार्थ्यांनी केला तर ते वाईट मार्गाला जाणार नाहीत एक आदर्श विचार त्यांच्यामध्ये रूजेल असे मला वाटते. तसेच समाजातील सर्वच घटकांना यामध्ये सामावून घेतले जाईल कारण ही मूल्ये सर्वांचाच विचार करतात. कोणताच भेदभाव केला जात नाही. बौध्द तत्वज्ञानाने समतेची पेरणी ही सतत केलेली आहे ही समता आज शिक्षण पध्दतीत प्रस्थापित होणे गरजेचे आहे.

जीवनातील दु:खापासून मुक्ती मिळविण्यासाठी :

आजच्या युगात प्रत्येक मनुष्य हा दु:खी आहे. लोभ, मोह, माया, क्लेष, आसुया, ही मनुष्य दु:खी असण्याची कांही कारणे आहेत. तसेच मनुष्य ऐहिक सुखामागे धावताना दिसून येतो त्यामुळे त्याचे जीवन दु:खमय झालेले आहे मनुष्याला विविध प्रकारची तृष्णा आहे ही तृष्णाच मुळात मनुष्याच्या दु:खाचे प्रमुख कारण आहे म्हणून दु:खापासून मुक्ती मिळविण्यासाठी आत्मिक समाधान महत्वाचे आहे. मनुष्याच्या दु:ख मुक्तीचा मार्ग तथागत गोतम बुध्दांनी आपल्या आष्टांगिक मार्गातून सांगितलेला आहे. या मार्गाचा अवलंब करून आपले जीवन प्रत्येक मनुष्याने व्यतीत करणे गरजेचे आहे या सर्व बाबींचा उहापोह आजच्या शिक्षणप्रणालीतून होणे गरजेचे आहे.

चारित्र्याची योग्य जडणघडण करण्यासाठी :

बौध्द तत्वज्ञान सांगते की, मनुष्याच्या अंगी केवळ विद्‌वत्ता असणे पुरेसे नाही तर विद्‌वत्ता असलेला मनुष्य चारित्र्यसंपन्न असणे गरजेचे आहे. कारण चारित्र्याच्या दागिण्याने विद्‌वान मनुष्य हा सुंदर दिसतो. म्हणून बुध्दांनी मनुष्याच्या चारित्र्याला अणण्यसाधारण महत्व दिले होते अशा या चारित्र्याची जडणघडण झाली तरच खऱ्या अर्थाने शिक्षणाची ध्येये साध्य होतील. बौध्दकाळात देखील विद्‌वान अशा गुरूंनी आपल्या चारित्र्यातून शिष्यांसमोर एक आदर्श निर्माण केलेला होता.

विविध विषयातील तज्ञ निर्माण करण्यासाठी :

बौध्दकाळात नालंदा आणि तक्षशिला या जगविख्यात विद्यापीठांतून उच्चशिक्षणाबरोबरच धनुर्विद्या, वैद्यकशास्त्र, धर्मशास्त्र, राजनीतीशास्त्र, आयुर्वेदशास्त्र, शिल्पविद्या, अर्थशास्त्र, अश्वविद्या तसेच ज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्र, भूगोल, नक्षत्रविद्या, शल्यशास्त्र, कृषि, विज्ञान, व्याकरण, गणित, दर्शन इत्यादी विषयांचेही अध्यापन येथे होत असे जुन्या आणि नवीन विषयांवर संशोधन कार्यही या विद्यापीठात केले जात असे तसेच हे वेगवेगळे विषयांचे तज्ञ त्यावेळी नालंदा आणि तक्षशीला विद्यापीठात होते. काळानुरूप शिक्षणपध्दती ही बदललेली आहे पण ज्या प्रमाणात वेगवेगळया विषयातील तज्ञ शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ स्तरावर निर्माण व्हायला हवे होते तेवढया प्रमाणात झालेले दिसत नाहीत म्हणून विविध विषयातील तज्ञ निर्माण करण्यासाठी बौध्द तत्वज्ञनाची आजच्या शिक्षणप्रणालीस गरज आहे.

चिंतन, मनन या प्रक्रियांच्या विकासासाठी :

शिक्षीत मनुष्य खरे खोटे, चांगले वाईट यातला फरक चांगल्या प्रकारे करू शकतो. जीवनातील दु:खाचे कारण जाणुन घेण्यासाठी बुध्दांनी ग्रंथांचे वाचन करावे असे म्हटले आहे. तसेच कोणत्याही शास्त्रावर किंवा भ्रामक कल्पनांवर विश्वास न ठेवता स्वत: तर्क करून जे आपल्या तर्कावर टिकेल आणि बुध्दीला योग्य वाटेल त्याचाच स्वीकार करावा हा बुध्दांचा विचार मनुष्याला स्वातंत्र्य बहाल करणारा मुलगामी स्वरूपाचा आहे. म्हणून आजच्या विदयार्थ्यात तर्क पध्दतीचा विकास होणे गरजेचे आहे.

स्त्री–पुरूष समानतेसाठी :

'ढोल गवार पशु नारी, ये सब ताडन के अधिकारी' ही परंपरागत चातुर्वण्य व्यवस्थेने स्त्रियांची केलेली कुचंबना बुध्दांनी झिडकारली आणि बुध्दांनी विहारामध्ये स्त्रियांना मुक्त प्रवेश देवून क्रांतिकारी निर्णय घेतला. पिढयांनपिढयांपासून दास्यगुलामीत जीवन जगणाऱ्या स्त्रियांना यातून मुक्त करण्याचे काम बुध्दांनी केले होते. आम्रपाली, संघमित्रा, क्षुभा, अनुपमा अशा कितीतरी स्त्रियांना मानाचे स्थान दिले गेले होते. तसेच स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली करून पुरूषांच्या बरोबरीने स्थान दिले होते. सद्य स्थितीत देखील स्त्री–पुरूषांना समान हक्क आणि अधिकार देण्यात आलेले असले तरी त्यांना संधी देवून मानाचे आणि सन्मानाचे जीवन बहाल करणे गरजेचे आहे.

विश्वबंधुत्वाची भावना निर्मितीसाठी :

आज जगाला युध्दाची गरज नसुन बुध्दांच्या शांततामय आणि विश्वबंधुतेच्या विचारांची गरज आहे. कारण सद्य स्थितीत जगामध्ये जी अशांतता आणि असहिष्णुता निर्माण झालेली दिसून येते. त्याला कारणीभूत आजची शिक्षणप्रणाली आहे. या शिक्षणप्रणालीत अमुलाग्र बदल होणे आवश्यक आहे. प्रत्येक राष्ट्रांनी शांततेचा पुरस्कार करून अनेक देशांतर्गत शांततामय करार झालेले आहेत. म्हणजेच सर्वच देशांना शांतता हवी आहे. बुध्दांचे तत्वज्ञान हे

शांततामय मार्गाचा पुरस्कार करते तसेच मनुष्याचे कल्याण केंद्रीभूत मानते. म्हणून आजच्या शिक्षणप्रणालीतून विश्वबंधुत्वाची भावना निर्माण होणारे विद्यार्थी घडविण्यासाठी बौध्द तत्वज्ञानाची गरज आहे.

पर्यावरण जाणीव जागृतीसाठी :

नालंदा आणि तक्षशिला विद्यापीठाची जागा अत्यंत प्रशस्त होती. नालंदा विद्यापीठ विहाराच्या आवरातच विस्तीर्ण बागा होत्या या बागेमध्ये फळाफुलांनी बहरलेली वृक्ष व वेली होत्या आणि अत्यंत रमणीय असे सरोवर देखील होते. तसेच या ठिकाणी आम्रवाटीका आणि नीलकमल यांनी बहरलेला विद्यापीठ परिसर होता. म्हणजेच पर्यावरणाच्या सानिध्यात आणि निसर्गरम्य वातावरणाची निर्मिती विद्यापीठ परिसरात बुध्दांनी केलेली होती. म्हणजेच पर्यावरणवादी दृष्टीकोन विद्यार्थ्यांत निर्माण व्हावा हा बुध्दांचा विचार पर्यावरणास पूरक आहे ही जाणीव सद्यकालीन शिक्षणात निर्माण झाली पाहिजे.

विज्ञाननिष्ठ समाज निर्मितीसाठी :

भारतीय समाज मनावर अनेक वाईट चालीरितींचा तसेच रूढी परंपराचा पगडा दिसून येतो. प्रत्येक मनुष्याने या वाईट चालीरितींपासून अलिप्त राहून जीवन व्यतीत करणे गरजेचे आहे. कारण मनुष्याने अनिष्ठ रूढी, परंपरा यांना गुरफटुन बसता कामा नये. डोळस दृष्टी ठेवून मार्गक्रमण करणे गरजेचे आहे. खगोलशास्त्र, भूगोल, नक्षत्रविद्या, शल्यशास्त्र, विज्ञान या विषयांच्या माध्यमातून विज्ञानवादी दृष्टीकोन निर्माण करण्याचे कार्य बुध्दांनी केले याच विचारांची कास धरून पुरोगामी व विज्ञानवादी दृष्टीकोन आज प्रत्येक विद्यार्थ्यांत रूजणे आवश्यक आहे.

समारोप :

बौध्द कालीन शिक्षणाचे तत्वज्ञान इतके मुलगामी आणि व्यापक स्वरूपात आहे की या तत्वज्ञानाचा स्वीकार जगाने केलेला आहे. बौध्द तत्वज्ञान आजच्या शिक्षण पध्दतीने स्वीकारणे क्रमप्राप्त झाले आहे. आजच्या शिक्षणपध्दतीनुसार जर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करावयाचा असले आणि भारतास महासत्ता बनण्याच्या दृष्टीने एक पाउल पुढे घेवून जावयाचे असेल तर बौध्द तत्वज्ञानाची आजच्या शिक्षणपध्दतीत प्रभावीपणे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे असे मला वाटते.

संदर्भ ग्रंथ :

१) डॉ.आ.ह.साळुंखे, सर्वोत्तम भूमिपुत्र:गोतम बुध्द, लोकायत प्रकाशन सातारा, नववी आवृत्ती सप्टेंबर २०१४
२) डॉ.मोहन जाधव,प्रा.आरती भोसले, प्रा.प्राची सरपोतदार, भारतीय शिक्षणाचा विकास,फडके प्रकाशन कोल्हापूर, चौथी आवृत्ती आक्टोबर २००७
३) डॉ. संघमित्रा गोणारकर, बौध्द शिक्षण प्रणाली, निर्मल प्रकाशन नांदेड,प्रथमावृत्ती जानेवारी २००९
४) डॉ.सौ.किरण नागतोडे, भारतीय शिक्षण पध्दतीचा विकास, विद्या प्रकाशन नागपूर,प्रथमावृत्ती ऑगस्ट २००७

Aayushi International Interdisciplinary Research Journal ISSN 2349-638x www.aiirjournal.com

# महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य : एक अभ्यास

- राहुल गंगाधर वाघमारे
सहाय्यक प्राध्यापक
वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय , शिरूर ताजबंद ता.
अहमदपूर जि. लातूर

**प्रस्तावना :-**

जगाच्या इतिहासात 1848 हे वर्ष महान क्रांतीकारकच म्हणावे लागेल. कारण याच वर्षी कार्ल मार्क्स यांनी 'कम्युनिस्टांचा जाहीरनामा' हा प्रबंध प्रसिद्ध केला, अमेरिकेत स्त्रियांच्या उद्धारासाठीची चळवळ न्युयॉर्क येथील वेल्सियन चर्च येथे सुरु झाली. तर भारतात हजारो वर्षापासून गुलामगीरीच्या बंधनात अडकलेल्या स्त्रियांच्या मुक्तीचा दरवाजाही याच वर्षी स्त्री शिक्षणाच्या श्रीगणेशाने महात्मा फुलेंनी उघडला आणि एका झटक्यात स्त्रियांच्या भविष्यातील कित्येक पिढ्या या नरकातून बाहेर काढल्या. आधुनिक भारतातील ही घटना म्हणजे मोठी क्रांतीकारीच होती. विषमतेने बरबटलेल्या या समाजावर गौतम बुध्दानंतर महात्मा फुलेंनी जो घणाघात केला त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. बुद्धांची न्याय, समता, बंधुता ही जीवनमूल्ये पेरणारा तो खरा महात्मा होता. येथून पुढे जन्मणाऱ्या प्रत्येक स्त्रिचा तो महान उद्धारकर्ता होता. अशा या महान उद्धारकर्त्याच्या जीवनाचा परिचय थोडक्यात पुढील प्रमाणे सांगता येईल.

**जीवन परिचय —**

महात्मा ज्योतीबा फुले यांचा जन्म इ. स. 1827 मध्ये पुणे येथे झाला. त्यांचे मुळ गाव साताऱ्यातील कटगुण होते पण कामानिमित्ताने पुण्याला येवून त्यांचे आजोबा पुण्यातच स्थायीक झाले होते. महात्मा फुलेंच्या वडीलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. महात्मा फुले लहान असतानाच त्याच्या आईचे निधन झाले. तत्काळात ब्राम्हणेतरांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता तरीही गोविंदरावांनी लहानग्या जोतीला शाळेत घातले ही गोष्ट खरच धैर्यद्योतक व प्रशंसनियचं म्हणावी लागेल. अल्पावधीतच लहानग्या जोतींनी अभ्यासात चांगलीच प्रगती केली. अशातच जोतींच्या विरोधात त्याने शिक्षण घेवू नये म्हणून सनातनवाद्यांनी गोविंदरावांचे कान फुंकले म्हणून गोविंदरावानी जोतीरावांची शाळा बंद केली व अल्पावधीतच म्हणजे जोतीराव तेरा वर्षाचे झाले तेंव्हा पुण्याजवळीलच धनकवडी गावातील झगडे- पाटील यांची आठ वर्षांची मुलगी सावित्रीबाई हिच्याशी त्यांचे लग्न झाले. दरम्यानच्या काळात त्यांचे शिक्षण बंद असले तरी त्यांची शिक्षणाची ओढ कमी झाली नाही ही बाब लक्षात आल्याने गफार बेग मुन्शी व लिजीट साहेब यांनी गोविंदरावांना पटवून दिले व पुन्हा एकदा जोतीरावांचा बंद पडलेला शिक्षणाचा प्रवाह सुरू झाला.

**महात्मा फुले पूर्वीची शैक्षणिक परिस्थिती -**

महात्मा फुले पूर्वीच्या शिक्षण पद्धतीचा जर आपण विचार केला तर आज आपण जी आधुनिक शिक्षण पद्धती म्हणतो ती शिक्षण पध्दती अस्तित्वातच नव्हती. शिक्षण घेण्याच्या अधिकार फक्त वरीष्ठ वर्गालाच होता. समाजातील कनिष्ठ वर्ग व स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. जे शिक्षण मिळत असे तेही तुटपुंजेच होते. मुलांना शिक्षण देण्यासाठी जे शिक्षक होते त्यांना 'पंतोजी' असे म्हणत असत. पण पंतोजीला पगार नव्हता शिवाय जी दक्षिणा मिळायची ती फार- कमी होती त्यामुळे शिक्षण देण्याएवजी इतर उत्पन्न देणाऱ्या व्यवसाय करण्याकडेच त्यांचा कल असायचा. अभ्यासक्रमामध्ये व्यवहार्यते ऐवजी पोथ्या व देवदेवतांच्या कथांचाच जास्त समावेश होता. याशिवाय अंकगणित देखील अभ्यासक्रमात होते. इतिहास व भूगोल सारखे विषय तर नावाला देखील नव्हते, धर्मशास्त्र, संस्कृत व्याकरण, न्याय,वैदयकशास्त्र, ज्योतिष, वेदांत, अलंकार हे विषय अस्तित्वात होते. ब्राम्हणाशिवाय इतर जातीतील मुले क्वचितच शिकत असत, शाळा आस्तीत्वात नव्हत्या, बहुदा पंतोजीच्या घरीच शिक्षण चाले.

1821 मध्ये चाप्लीन या इंग्रज अधिक-याने काढलेल्या संस्कृत पाठशाळेत केवळ ब्राम्हणांनाच प्रवेश होता. दरम्यानच्या काळात इंग्रजांनी शिक्षण व्यवस्थेत हस्तक्षेप केला होता त्यामुळे ब्राह्मणेत्तरांना शिक्षणाचे दरवाजे थोड्या का प्रमाणात होईना

खुली झाली व त्यामुळेच जोतीरावांना त्यांच्या वडिलांच्या पुढाकाराने शिक्षण घेता आले. 1819 सालीही हिंदु मुलींसाठी पहिली शाळा कलकत्त्यात अमेरिकन मिशनने सुरु केली. तसेच 1840 मध्येही पुण्यात शाळा काढली. पण या शाळा चालू शकल्या नाहीत. म्हणून मुलींची शाळा काढून ती चालवणारे महात्मा फुले हेच पहिले भारतीय ठरतात.

**महात्मा फुले यांचे शैक्षणिक योगदान –**

महात्मा फुले यांनी शिक्षणात जे योगदान दिले त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. स्त्री शिकली तर समाजाची उन्नती होते हे ओळखूनच त्यांनी स्त्री शिक्षणाला महत्व दिले त्यासाठी त्यांनी मुलींची पहिली शाळा 1848 च्या ऑगस्ट महिन्यात काढली. ज्या पुण्यामध्ये सनातनवाद्यांचे वर्चस्व होते त्याच पुण्यात महात्मा फुले यांनी बुधवार पेठेतील भिडे वाड्यात ही शाळा उभारली. शाळा चालवण्यासाठी त्यांना अनेक अडचणी आल्या त्यातील एक आर्थिक अडचण होती. त्यासाठी सखाराम परांजपे, सदाशिव हाटे व सदाशिवराव गोवंडे यांनी आर्थिक सहाय्य केले. तत्कालिन समाजात मुलींना शिक्षण देणे मोठे पाप समजले जाई पण महात्मा फुलेंनी याचा विचार न करता आपल्या ध्येयावर ते ठाम राहिले एवढ्यावरच ते थांबले नाही तर मुलींना शिकविण्यासाठी कोणी महिला मिळत नव्हती म्हणून या महामानवाने स्वत:च्या पत्नी सावित्रीबाई यांना शिकवून पहिली महिला शिक्षिका होण्याचा मान मिळवून दिला. या घटनेमुळे सनातनवाद्यांचा तिळपापड झाला नाही तर नवलच म्हणावे लागेल हाच राग मनात धरुन गोविंदरावांना महात्मा फुले यांच्या विरोधात भरवून त्यांना घराबाहेर काढण्यास भाग पाडले. अशा बिकट प्रसंगात आपले ध्येय सोडले तर तो महापुरुष कसला. याही प्रसंगात ते तसूभरही ढळले नाहीत व यासाठी त्यांना मोलाची साथ दिली ती त्यांची पत्नी सावित्रीबाई यांनी. या दोन्ही महामानवानी न डगमगता स्त्री शिक्षण व शुद्रातिशूद्रांचे शिक्षण देण्याचे पवित्र कार्य चालूच ठेवले. कारण शिक्षणावर त्यांचा अतोनात विश्वास होता. शिक्षण हेच जीवनातील अंधार दूर करण्याचे एकमेव साधन आहे यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. म्हणूनच ते म्हणतात

*'विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली*
*नीतीविना गती गेली । गती विना वित्त गेले*
*वित्तविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविदयेने केले*

यावरून अविदया किती घातक आहे हे महात्मा फुलेंनी ओळखले होते म्हणूनच त्यांनी आपले हे पवित्र कार्य चालूच ठेवले व या पवित्र कार्यासाठी त्यांना साथ दिली ती त्यांची सहचारिणी सावित्रीबाई यांनी. यासाठी त्यांना अतोनात कष्ट सहन करावे लागले. अनेक प्रकारच्या निंदेलाही सामोरे जावे लागले तरीही या माऊलीने आपला निर्धार जराही ढळू दिला नाही व शेवटपर्यंत ती आपल्या पतीच्या सत्कार्याची भागीदार राहीली. 1848 मध्ये पहिली शाळा काढल्यानंतर 3 जुलै 1851 रोजी बुधवार पेठेतच अण्णासाहेब चिपळूणकर यांच्या वाड्यात मुलींची शाळा काढली त्यात आठ मुली होत्या नंतर ती संख्या 48 झाली, आपल्या संस्थेच्या विद्यमाने महात्मा फुले यांनी १७ सप्टेंबर 1851 रोजी रास्तापेठेत आणि 15 मार्च 1852 रोजी वेताळ पेठेत मुलींची शाळा काढली. मुलींसाठीच शाळा काढून महात्मा फुले थांबले नाहीत तर 3 जुलै 1852 रोजी अस्पृश्य मुलांसाठी वेताळ पेठेतच शाळा सुरू केली.

**हंटर कमिशन व महात्मा फुले -**

भारतातील शिक्षणविषयक प्रश्नासंबधी सुधारणा सुचविण्यासाठी सरकारने 1882 मध्ये विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले होते. या कमिशनने ज्या साक्षी घेतल्या त्यात गरीब , ग्रामीण लोकांच्या हिताचा विचार नव्हता. शिवाय वरीष्ठ लोकांना शिक्षण देवून ते कनिष्ठ लोकांपर्यंत झिरपत जाईल हा जो विचारप्रवाह होता या दोन्ही बाबींना महात्मा फुलेंनी विरोध केला. 'सरकारने कनिष्ठ लोकांच्या शिक्षणाची आबाळ केली आहे' असे सरकारला निक्षून सांगणाऱ्यापैकी महात्मा फुले हे एकमेव महापुरुष होते. खेड्यातील बहुसंख्य सामान्य जनतेला शिक्षण देवून त्यांना नैतिक व भौतीकदृष्टया सुधारल्याशिवाय देशाचा उद्धार होणार नाही. असे महात्मा फुलेंचे स्पष्ट मत होते. शिक्षणाच्या संदर्भात प्राथमिक शिक्षणाकडे सरकारने विशेष लक्ष देवून प्राथामिक शिक्षण सक्तीचे करावे असे मत मांडले.

**माध्यमिक शिक्षणाबाबत विचार –**

माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत महात्मा फुले म्हणतात आज जे शिक्षण दिले जात आहे ते सर्वसामान्याच्या जीवनाच्या दृष्टीने अव्यवहार्य व अयोग्य आहे कारण त्यात व्यवहार्यपणा नाही. विद्यार्थांच्या भावी स्वतंत्र जीवनास समर्थ करणारे ते शिक्षण

नाही. माध्यमिक शिक्षण सर्वांना घेता यावे असेच असावे याशिवाय नियमानुसार चालणाऱ्या शाळांना आर्थिक सहाय्य करावे. पण हे सहाय्य दरवर्षी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणातच असावे. नगरपालिकांनी आपल्या निधीमधून हे अनुदान द्यावे व तसा कायदा सरकारने पास करावा असे मत मांडले.

**शिक्षकाबाबत महात्मा फुलेंचे विचार -**

प्राथमिक शिक्षण हे पक्क्या आणि समाधानकारक पायावर उभारले पाहिजे यासाठी शिक्षक भरतीचे नियम करावेत तसेच शिक्षकांना चांगले वेतन द्यावे. शिक्षक भरती करण्यासाठी अध्यापनाची परीक्षा घ्यावी व ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवाराचीच शिक्षक म्हणून भरती करावी. बहुजन समाजातून शिक्षक भरती करावी. व विशिष्ट जातीची शिक्षण देण्याची मक्तेदारी नष्ट करावी. कारण बहुजन समाजातील शिक्षक असतील तर ते कनिष्ठ वर्गातील मुलांना योग्य न्याय देतील असे ठामपणे आपले मत मांडले.

**महात्मा फुले यांच्या शाळेतील अभ्यासक्रम –**

अभ्यासक्रम हा व्यवहारोपयोगी असावा असे महात्मा फुले यांचे स्पष्ट मत होते. त्याच्या शाळेमध्ये मोडी-बालबोध लेखन वाचण, शब्दांचे व्याकरण, वजाबाकी , भूगोल, मराठयांचा इतिहास , आशिया, युरोप व भारताच्या नकाशाची माहिती, तसेच हिशोब, कृषी, नीती, आरोग्य या विषयाचा समावेश होता.

**शिष्यवृत्तीबाबत विचार -**

ज्या वर्गातील लोकांची शिक्षणाची प्रगती झाली नाही व ज्यांची शिक्षण घेण्याची आर्थिक परिस्थिती नाही अशा लोकांची शिक्षणातून उन्नती व्हावी व त्यांना शिक्षण घेता यावे. यासाठी शिष्यवृत्तीची योजना करावी असा विचार मांडला.

**समारोप –**

अशा पध्दतीने महात्मा फुले यांनी शेतकरी व बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचाराची मांडणी केली व भारतातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली, महात्मा फुले यांनी महिलाच नाही तर इथल्या दलित, पददलित व शेतकरी बांधवाच्या उद्धारासाठी व उन्नतीसाठी आयुष्यभर झटत राहिले. त्यासाठी शाळा काढल्या, वृत्तपत्रे चालविली,सत्यशोधक समाजाची स्थापना केली त्यांच्या या योगादानामुळेच ते आधुनिक भारतातील पहिले मुख्याध्यापक व सावित्रीबाई फुले या पहिल्या मुख्याधीपिका ठरतात. खऱ्या अर्थाने ते महात्मा आहेत. अशा या महान महात्म्याचा मृत्यू 28 नोव्हेंबर 1890 रोजी झाला.

**संदर्भ ग्रंथ –**

१) कीर , धनंजय (१९६८), महात्मा जोतीराव फुले, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई.
२) गोणारकर, संघमित्रा (२००९), शैक्षणिक विचारवंत, निर्मल प्रकाशन, नांदेड.
३) डॉ. कठारे , अनिल (२००७), फुले-शाहू-लोकहितवादी, पूनम प्रकाशन, कंधार.
४) डॉ. घोरमोडे, के. यू. व डॉ. कला घोरमोडे (२००६), शैक्षणिक विचारवंत, विद्या प्रकाशन, नागपूर.

Aayushi International Interdisciplinary Research Journal ISSN 2349-638X www aiirjournal.com

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या जडणघडणीत शहाजीराजे व जिजामातेचे योगदान

**Dr. Venkat K.Kadam**
Vasantrao Naik B.Ed. College Shirur Tajband
Tq.Ahemdpur dist.Latur

**प्रास्ताविक**

मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास हा भारताचा इतिहास बनला तो केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थपनेमुळे, महाराजांनी केवळ मुद्यलांशी किंवा मुस्लीम सत्तेशी लढाया केल्या नाहीत तर जगावर राज्य करणा-या ब्रिटिशांना पण या उपखंडावर सार्वभौमत्व प्रस्थापीत करण्यासाठी झगडायला लावले.मराठी सत्ता व शिवाजी महाराजांची खरी ओंळख जगाने नोंद ठेवावी अभ्यासकाने, इतिहासकाराने अभ्यासावी अशी आहे. मराठयांनी भारताच्या इतिहासावर आपले अधिराज्य एका शतकाहून अधिक काळ सन्मानपूर्वक जगाला प्रेरणा देणारी घटना म्हणून प्रस्थापित केली आहे. मराठी सत्तेबद्दल दुजाभाव करणा-या इतिहासकारांना पाश्चात्य इतिहास काराच्या लेखनातुन परिचय करून दिलेला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य व स्वराज्य स्थापना हा काही योगायोग नाही, कोणती दैवी शक्ती नाही तर एखादी चाकोरी नाही, राजे-रजवाडे सनावली, युध्द, लढाचा यांचा प्रपंच आधुनिक भारताच्या निर्मितीला आकार देणारी बहुआयामी व्यवस्था सत्ता आहे. अशा सत्तेचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या जडणघडणीत आई वडिलाचा मोलाचा वाटा आहे, योगदान आहे. ते योगदान अभ्यासण्याचा अल्पसा प्रयत्न

**उद्दिष्टये**

१. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जडणघडणीचा अभ्यास करणे.
२. हिंदवी स्वराज्य स्थापनेतील संस्कृतज्ञ शहाजीराजे भोसले यांचे योगदान अभ्यासणे.
३. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जडणघडणीतील राजमाता जिजाबाई यांचे योगदान अभ्यासणे.

**विषय विवेचन**

महाराष्ट्रात स्वराज्याची स्थापना ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या हातून पार पडलेली असामान्य कागीरी होय. येथे असा विचार कारायला हवा की, एखादी अशी घटना महाराष्ट्राला नव्हे तर भारताच्या इतिहासात नोंद घेण्याचे नवल काय तर स्वराज्य स्थपनेची घटना जगाच्या इतिहासात नोंद झाली. कारण पाश्चात्य विचारवंत महाराजांच्या कामगीरीवर आधारीत ग्रंथ प्रकाशित करतात. म्हणजेच सदर ग्रंथ शिवकाळात नोंद होत असावा असाच होतो. तत्कालीन परिस्थितीत महाराष्ट्रातील जनता परकीयांच्या जुलमात होरपळली जात होती. महाराजांच्या पूर्ण परीवाराने या गोष्टी जवळून पाहीलेल्या होत्या ज्यांचा संस्कार महाराजावर केला गेला ज्यांचा परिणाम म्हणजेच महाराजांच्या हातून पार पडलेली असामान्य कामगीरी स्वराज्याची स्थापना होय.

महाराज ज्या परिवारात वाढले. त्या परीवारातील प्रत्येक व्यक्तीचा वाटा आहेच पण त्यांच्या जडण घडणीत संस्कारात माता पित्याचा वाटा तितकाच मोलाचा पहायला मिळतो, येथे त्यांच्या योगदानाचा विचार करण्यात आलेला आहे तो पुढीलप्रमाणे.

**संस्कृतज्ञ शहाजीराजे भोसले :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जडणघडणीत सर्वात प्रभावी व्यक्ती शिवाजी महाराजांचे वडील शहाजी राजे भोसले होत. भोसले घराण्याची प्रतीसत्ता नावलौकीक व शौर्याची परंपरा यांचा वारासा महाराजांना शहाजी राजाकडून प्राप्त झाला होता. शहाजी राजांच्या काळात दक्षिण भारताच्या कर्नाटक प्रांतात आदिलशही, निजामशाही व कुतुबशाही या तिन्ही शाहया, लहानमोठे नायक म्हणून उभा होत्या अस्तित्वासाठी एकमेकांवर स्वारी करणे, प्रदेश जिंकणे साम्राज्य विस्तार करणे, सुरू असताना एकीकडे मोगल सत्ता मात्र स्वत:च्या महत्वकांक्षेसाठी नेहमी चाल करीत होती. मुत्सद्देगीरीचा वारसा शिवाजी महाराजांना वडीलांकडून मिळला होता सर्वच सत्ता शहाजी राजांना स्वत:कडे निमंत्रीत करीत असत. शहाजीराजे मोठे चतुर सेनानी होते. त्यांनी कधीच कोणत्याच सत्तेला अपल्या मनी असलेला ठिकाणा लागू दिला नाही. 'शककर्ते शिवराय' या ग्रंथात विजय देशमुख म्हणतात की शहाजींच्या मनात स्वराज्याचे स्वप्न घोळत होते व त्यादृष्टीने त्यांनी काही धाडसी पावलेही टाकली होती. शिवाजी महाराजांनी बालपणी बेंगलोरला असताना शहाजी महाराजांच्या नेतृत्वात न सत्तेचा वापर करण्याची पध्दती पाहिलेली होती, युध्द शास्त्र जवळून प्रात्याक्षिक स्वरूपाने शिकलेले होते. तसेच लढाईतील डावचेच हा गुण अंगी

येण्यास वडिलांच्या नेतृत्वाचा मोठा वाटा होता. एकूण शहाजी महाराजांच्या कृतुत्वाचा प्रभाव शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेकडे घेवून जाण्यास प्रेरणादायीच म्हणवा लागेल.

शिवाजी महाराजांच्या संस्कार वयातील त्यांचे व्यक्तिमत्व घडविण्यात शहाजी महाराजाचा सहवास महत्वाचा ठरला होता.बेंगलोरला आसताना गतकाळातील विजनगरच्या भव्य साम्राज्याच्या राजघराण्याचे भग्न अवशेष पाहून शिवाजी महाराजाचे कुतूहल जागे झाले होते. असे विविध प्रसंग शिकून महाराज संस्काराने परिपूर्ण होऊनच आपल्या मातोश्रीसह महाराष्ट्रात परतले. महराष्ट्रात येताच त्यांनी स्वराज्य स्थापनेच्या धोरणाकडे वाटचाल केलेली होती. अनेक गडे, कोटांच्या भेटी अंती शहाजी महाराजांच्या सल्याने त्यांनी राजधानी म्हणून रायगडाची निवड केलेली होती.

भोसले घराण्याची प्रतिष्ठा, नावलौकिक, शौर्याची परंपरा यांचा वारसा शहाजीकडून मिळाला हे विर्वाद सत्यच म्हणावे लागेल, शहाजी राजांची प्रशसनात पकड होती त्यांचा जबरदस्त वारसा, त्यांची पुणे जहागीर, अनुभवी स्वामिनीष्ठ अधिकारी फौजफाटा, साधन साहित्य या गोष्टी सोबत वडीलांच्या चरित्रावरून घेतलेला धडा शहाजी राजांच्या शेकडो लढाया जिंकताना आपल्या पराक्रमाणे मुत्सुद्देगीरीने दक्षिणेतील शाहयांना धास्ती भरवली होती. मनात असेल ती शाही सत्तेवर आणण्याची धमक शहाजी राजे यांच्यात होती. सर्व शाहयांनी दिलेला फटका सहन करीत कित्येक वेळा कैद नशिबी घेवुन त्यांनी शाही तख्तांचे रक्षण केलेले होते. या सर्व गोष्टी शिवाजी महाराजांच्या जडण घडणीत भरलेल्या होत्या.शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याचा मार्ग चोखाळला होता मर्ग खडतर आहे. घोण्याचा आहे जमले तर बरं नाहीतर सर्वस्व गमावले जावू शकते आणि यश मिळाले तर मराठी सत्तेची इतिहासात नोंद होणार होती.आणि संपूर्ण हिंन्दूस्थानच्या इतिहासाला नवी ओळख निर्माण होणार होती. तेच खरे ठरले शिवशाही अवतरली.

**राजमाता जिजाबाई:**

जिजाबाई देवगीरीच्या यादव घराण्याचे वंशज असलेला शिंदखेडच्या लखुजी जाधवराव यांची कन्या होती शिसोदीया घराण्याचे वंशज असलेल्या मालोजी भोसले यांचे जेष्ठ पुत्र शहाजी यांच्याशी निवाह झाला दोन घराण्यातील 'भातवडीच्या' लढाई पूर्वीच्या हत्ती उथळलेल्या प्रसंगावरून वाद विकोपाला गेला दोन घराण्यातील वितुष्ठ जिजाबाईने सहन केलेले होतो पण वडीलपेक्षा पती श्रेष्ठ समजत जिजाबाने याचा कोणताच वाईट परिणाम होवू दिला नाही. पूढे निजामाच्या हातून वडील लखुजी जाधवाची हात्या व त्याच्या सोबत घराण्यातील दोन मुलांची झालेली हात्या मनावर वज्राघात करणारी होती. कर्तबगार व महत्वाकांक्षी शहाजी राजांचे जीवन संघर्ष व धामधुमीचे राहिले १६३० - १६३६ हा काळ या घराण्यासाठी धवपळीचा होता स्वरक्षणासाठी वेळोवेळी गढ किल्ले बदलून वास्तव्य करावे लागत होते. या सर्व घटना जिजाबाईच्या समोर घडत होत्या सतत संकटे असल्याने संकटावर मात करण्याचे कसब या कुठुबाला प्राप्त झाले होते.

वाटयाला आलेल्या संस्काराचे चटके सहन करणा-या जिजाबाईना वीरकन्या, वीरपत्नी व वीरमाता आशा तीन्ही भुमिका पार पाडाव्या लागल्या तसे सौभाग्य जिजाबाईनी पार पाडले ज्याचा परिणाम महाराष्ट्रात स्वराज्य स्थापन झाले तत्कालीन काळात सुलतानी राजवटी विषयीचा तिरस्कार पराकोटीला पोहचला होता. जिजाबाईना कौटूंबिक आडचणी सोबत समाजाच्या एकूण राजकीय गुलामगिरीची पण जाण होती. वेळोवेळी शहाजी राज्याच्या पराक्रमाला प्रत्येक शाहीने शेवटी मनस्तापाचे बक्षीस दिलेले होते.पती शहाजी राजे यांनी दुस-यासाठी स्थापन केलेल्या तख्ताप्रमाणे शिवाजी राजांनी न राबता आपले स्वतंत्र राज्य स्थापन करावे ही जिजाबाईची प्रचंड इच्छा,महत्वकांक्षा होती.तसे शिवाजी रूपाने स्वप्न साकार झाले.ज्यामुळे मराठयांचे छत्र धारण केलेला छत्रपती ,पातशाहा,पाहण्याचे स्वप्न साकार झाले.शिवरायावर संस्कार करणा-या या पराक्रमी स्त्रीचा वाटा मोलाचा होता.ती एक शहाजी राजा सारखा धीर,गंभीर उदार पराक्रमी पुरूषाची पत्नी होती.त्यामुळे तीची धीर, गंभीर, उदार वृत्ती भारतभर पसरायला वेळ लागला नाही.जीजाबाईने जितके शिवाजी महाराजांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले तीतकेच पुणे, सुपे प्राताची व्यवस्था पाहिली गोरगरीबांना आश्रय दिला अशा महान मातेचा इतिहास जितका लिहीला गेला तोपण तिच्या कृतत्वाच्या पुढे ठेंगणे दिसणे हे साहजीकच आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा सर्व उद्योग विचार आई जिजाबाईच्या अशिर्वादाने केलेला होता.धोकेबाज सत्तेसोबत युध्द खेळताना साहसी कार्य करताना वेळोवेळी त्या राजमाता म्हणुन पाठीमागे खंबीर थांबल्या तर संस्कार करताना महाराष्ट्राच्या मातीतली प्रथम माता म्हटल्या गेल्या ख-या अर्थाने जिजाबाईच्या प्रशासकीय कौशल्याची खरी कसोटी म्हणावे लागेल जिजाबाईने कित्येक प्रसंग पचविलेले होते ज्यामुळे शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्वात असामान्यपणा प्रखर शौर्य नितांत धैर्य निर्माण झालेले होते.मातेच्या या गुणाचा संस्कार शिवाजी महारजामध्ये पक्का रूजला होता.स्वराज्याची व एक माता म्हणुन शिवाजी महाराजांची गरज लक्षात घेवुन जिजाबाईने सती जाण्याचा विचार रद्द केला होता एखादया योग्याला लाजवेल अशी बुध्दमत्ता शिस्त घेवुन एका मातेने मुलाचे संगोपण करताना.मुलाच्या अंगी तसे गुण पेरण्याचा प्रयत्न केलेला होता. शिवाजी महाराजावर संस्कार करताना रामायण, महाभारत,भागवत इ.इतिहास पुराणातील

कथा बालशिवाजीला सांगितल्या होत्या ज्यामुळे महाराज अपूर्व धाडसी, स्वाभीमान, विशुध्द चारित्र्यनिष्ठा, व साधुसंता विषयी असीम श्रध्दा संस्कारीत महापुरूष घडलेले होते.

**सारांश :-**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवाजी महाराजांच्या अप्रतिम शौर्याचा अर्क ज्यांनी पाजला त्या महापुरूषांच्या यादीत साधुसंता इतकेच स्थान राजे शहाजी महाराज व जिजाबाई या आईवडीलांना जाते.आई म्हणुन संस्कार व प्रसंगाने तावून सुलाखुन निघालेल्या जिजाबाई व शौर्याने आजचा महाराष्ट्र नव्हे तर तत्कालिन तिन्ही शाहयांना आपल्या कार्याची चुनुक शहाजी महाराजांनी दाखविली होती.मनात येईल तेव्हा कोणतीही शाही सत्ताधिश बनविन्याची हातोटी त्यांना मिळाली होती. असा आई वडीलांचा वारसा कमी मुलांना मिळतो ते भाग्य छत्रपती शिवाजी महाराजांना नशिबात होते. आणि महाराष्ट्रातल्या गोर गरीब माणसाला स्वराज्यात राहण्याचा बहुमान मिळणे हे इतिहासाला न पेलणारे होते कारण तत्कालिन परिस्थिती तशी तयार झालेली होती. असे आई वडील की ज्यांना आपले डोळे मिटण्यापूर्वी आपला पुत्र आपल्या देशाचा राजा म्हणुन डोलाने सिहांसनावर बसलेला व अजिंक्य धर्मरक्षक असल्याचे पाहण्याचे भाग्य मिळाले.

**संदर्भग्रंथ :-**

(१) पवार, जयसिंगराव, (२००७), *शिवछत्रपती एक मागोवा* , कोल्हापूर : समेरू प्रकाशन.
(२) कुलकर्णी, अ, श, (२००८), *महाराष्ट्र समाज आणि संस्कृती*, पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.
(३) धाये, राजेंद्र, व टकले , सखाराम, (२००८), *मराठ्यांचा इतिहास*, औरंगाबाद : चिन्मय प्रकाशन.
(४) कुलकर्णी, अ, रा, (२००७), *मध्ययुगीन महाराष्ट्र*, पुणे : डायमंड पब्लीकेशन
(५) आचार्य, धनंजय, (२००७), *मराठा सत्तेचा उदय*, नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# पर्यावरण शिक्षण - काळाची गरज

**डॉ जयश्री लक्ष्मणराव भोसीकर**
सहाय्यक प्राध्यापक,
सहयोग सेवाभावी संस्थेचे अध्यापक महाविद्यालय,
विष्णूपुरी, नांदेड

**प्रस्तावना:**

मुलांच्या विकासात पर्यावरण आणि आनुवंशिकता या दोन्हींचा मोठा वाटा आहे. मुलाचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करणे हा शिक्षण प्रक्रियेचा मुख्य उद्देश आहे आणि या दिशेने योग्य वातावरण तयार करणे आवश्यक आहे. आजच्या भौतिकवादात मानव आपल्या सोयीसाठी पर्यावरणाचा ऱ्हास करत असताना निसर्गाच्या समतोलाला धोका पोचवत आहे. महात्मा गांधी म्हणायचे की "निसर्गाकडे प्रत्येकाच्या गरजा भागवण्यासाठी पुरेशी संसाधने आहेत पण लोभ भागवण्यासाठी नाहीत." राष्ट्रीय शिक्षण धोरण 1986 मध्ये पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन पर्यावरण शिक्षण हे अत्यंत खालच्या स्तरापासून विद्यापीठ स्तरापर्यंत सुरू करावे, असा विचार व्यक्त करण्यात आला आहे. "पर्यावरण शिक्षण" हे आधुनिक शिक्षण आणि शिक्षणाचा एक नवीन आयाम आहे. पर्यावरणीय शिक्षणाचा मुख्य भर पर्यावरणाच्या शक्यता, वैशिष्ठ्य, समस्या आणि आव्हाने ज्ञान, कौशल्य आणि मूल्यांच्या पातळीवर अशा प्रकारे आणणे आहे की व्यक्ती त्याचा शारीरिक, सामाजिक, मानसिक विकास करा आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक वातावरणात सुसंवाद प्रस्थापित करण्यासाठी, या क्षेत्रातील उपलब्ध विकृती आणि प्रदूषण परिस्थिती समजून घेऊन आणि त्यांचे परिणाम कमी करण्यासाठी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणाच्या माध्यमातून योग्य शिक्षण देण्यावर आणि समज निर्माण करण्यावर असणे आवश्यक आहे.

**पर्यावरणाच्या ऱ्हासाचा परिणाम :**

पर्यावरणाच्या ऱ्हासाचा थेट परिणाम परिसंस्थेवर होतो. परिणामी परिसंस्थेमध्ये असंतुलन निर्माण होते. पर्यावरण आणि मानवी हस्तक्षेपांमध्ये असमतोल आहे. जेव्हा मानव पर्यावरणीय संसाधनांचे अतिशोषण करून पर्यावरणाचा नाश करतो, तेव्हा पर्यावरण आणि मानव या दोघांवरही त्याचे विपरीत परिणाम होतात. पर्यावरणाच्या ऱ्हास प्रक्रियेला नैसर्गिक आणि मानवी असे दोन्ही घटक जबाबदार आहेत. परंतु आजच्या अतिरेकी मानवी हस्तक्षेपांमुळे पर्यावरणाची अधिक हानी होत आहे, ज्याचा परिणाम पूर, दुष्काळ, भूकंप, प्रदूषण इत्यादी विविध नैसर्गिक विकृतींच्या रूपात आपल्याला दिसून येतो. तंत्रज्ञान आणि उद्योग क्षेत्रात आपण अत्यंत उल्लेखनीय प्रगती करत असलो तरी ही प्रगती कुठेतरी आपल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचेही शोषण करत आहे, त्यामुळे पर्यावरणाच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत ज्या मानवजातीसाठी आणि इतर सजीवांसाठी घातक ठरत आहेत. त्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करावा, नैसर्गिक साधनसंपत्तीच्या पर्यायांवर भर द्यावा, प्रदूषण, मातीची धूप यासारख्या समस्या सोडवण्यासाठी स्थानिक पातळीवर आवश्यक ते प्रयत्न करावेत, नैसर्गिक आपत्तींवर नियंत्रण ठेवावे, याची जाणीव लोकांना करून देण्याची गरज आहे. यासाठी सतत प्रयत्न करणे आणि तंत्रज्ञान आणि उद्योग क्षेत्रातील विकासाचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे, जेणेकरुन नैसर्गिक संसाधनांचे शोषण होणार नाही. त्यासाठी शालेय व उच्च शिक्षण स्तरावर पर्यावरण शिक्षणाची केवळ सक्ती न करता सुव्यवस्थितपणे अंमलबजावणी आवश्यक आहे.

**पर्यावरण शिक्षण :**

पर्यावरण शिक्षण ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये व्यक्ती पर्यावरणीय समस्यांशी परिचित होते, त्यांचा बारकाईने अभ्यास करते आणि त्या सोडवण्यासाठी योग्य ती कृती करून पर्यावरण सुधारण्याचा प्रयत्न करते. परिणामी, व्यक्तीला पर्यावरणीय समस्यांची सखोल माहिती होते आणि त्यावर माहितीपूर्ण आणि जबाबदार निर्णय घेण्यासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात होण्यास मदत होते. पर्यावरणीय शिक्षण ही एक शिकण्याची प्रक्रिया आहे जी पर्यावरण आणि त्याच्याशी संबंधित

आव्हानांबद्दल लोकांमध्ये जागरूकता वाढवते, या आव्हानांना तोंड देण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान, कौशल्ये, अभिवृत्ती आणि हेतू विकसित करते सोबतच माहितीपूर्ण निर्णय आणि जबाबदारी स्वीकारण्यास सक्षम होते.

**'पर्यावरण शिक्षण' आणि 'पर्यावरण विज्ञान' :**

पर्यावरणीय शिक्षणाचे स्वरूप समजून घेण्यासाठी 'पर्यावरण शिक्षण' हे 'पर्यावरण विज्ञान' पेक्षा वेगळे कसे आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे. व्यापक अर्थाने, पर्यावरण विज्ञान हे स्थलीय, वायुमंडलीय, जैविक आणि मानववंशशास्त्रीय वातावरणातील जटिल संबंधांचे विज्ञान आहे. यामध्ये रसायनशास्त्र, जीवशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र आणि मानववंशशास्त्र यासारख्या विषयांचा समावेश आहे जे या परस्परसंबंधांवर प्रभाव टाकतात किंवा त्यांचे वर्णन करतात. त्याच वेळी, पर्यावरणीय शिक्षणात पर्यावरण विज्ञानाच्या मूलभूत घटकांचा समावेश असतो जो विशेषत: लोकांना पर्यावरणीय चर्चांबद्दल जागरूक करतो आणि त्यांच्यात आवश्यक ज्ञान, कौशल्ये, पर्यावरणीय समस्या वैयक्तिकरित्या किंवा एकत्रितपणे सोडवण्याची वृत्ती आणि मूल्ये विकसित करतो.

पर्यावरण शिक्षण केवळ पर्यावरणाच्या भौतिक आणि जैविक वैशिष्ट्यांचाच अभ्यास करत नाही, तर त्यात पर्यावरणावर परिणाम करणाऱ्या मानवाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांचाही समावेश होतो. त्याचा आपल्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनावर कसा परिणाम होतो आणि आपल्या वैयक्तिक आणि सामाजिक कृतींचा परस्परसंवादांवर कसा परिणाम होतो हा घटक सुद्धा पर्यावरण शिक्षणाचा महत्वाचा अभ्यास विषय आहे . पर्यावरण. हे लोकांना स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अस्तित्वात असलेल्या विविध पर्यावरणीय समस्यांबद्दल जागरूक करते आणि या समस्या सोडवण्यासाठी चालू असलेल्या कार्यक्रम, प्रकल्प आणि धोरणांबद्दल त्यांना माहिती देते जेणेकरून ते पर्यावरणाच्या संरक्षणासाठी जागरूक आणि संवेदनशील होतील.

आज पर्यावरण रक्षणाचा प्राधान्यक्रम लक्षात घेऊन शिक्षणाच्या विविध स्तरांवर पर्यावरण शिक्षण अनिवार्य करण्यात आले आहे. स्थानिक आणि प्रादेशिक स्तरावर तयार केलेल्या पाठ्यपुस्तकांमध्ये प्रादेशिक किंवा स्थानिक स्तरावर अस्तित्वात असलेल्या पर्यावरणीय समस्यांना विशेष स्थान दिले जाते. पर्यावरणीय शिक्षण गंभीर विचार, समस्या सोडवणे आणि प्रभावी निर्णय घेण्याची कौशल्ये वाढवते आणि पर्यावरणीय प्रवचनाच्या विविध पैलूंचा विचार करून त्यांना माहितीपूर्ण आणि जबाबदार निर्णय घेण्यासाठी तयार करते. पर्यावरण शिक्षण कोणत्याही व्यक्ती, समूह किंवा समाजाच्या दृष्टिकोन किंवा कृतीचे समर्थन करत नाही, परंतु ते लोकांना समस्येच्या विविध पैलूंचा अभ्यास करण्यास आणि समाजातील सर्व घटकांसाठी सर्वात योग्य आणि फायदेशीर निर्णय घेण्यासाठी तयार करते.

**UNESCO आणि पर्यावरण शिक्षण :**

UNESCO ने पर्यावरण शिक्षणासाठी खालील सूचना दिल्या आहेत

1. पर्यावरणीय शिक्षणाचा प्राथमिक ते पदव्युत्तर स्तरापर्यंत समावेश करणे अनिवार्य आहे.
2. पर्यावरणीय शिक्षणाने आंतर-विषय दृष्टीकोन लागू केला पाहिजे ज्यामध्ये पर्यावरणाच्या सर्व भौतिक, रासायनिक, जैविक आणि सामाजिक-सांस्कृतिक पैलूंचा समावेश आहे. ते विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि समाज यांच्यातील सेतूचे काम केले पाहिजे.
3. पर्यावरणीय शिक्षणामध्ये पर्यावरणीय समस्यांच्या ऐतिहासिक दृष्टिकोनावर विशेष भर दिला पाहिजे.
4. पर्यावरण संरक्षणाने शाश्वत विकासाच्या गरजेवर आणि महत्त्वावर भर दिला पाहिजे, म्हणजेच पर्यावरणाला हानी पोहोचवू नये अशा आर्थिक विकासावर भर द्यावा.
5. पर्यावरणीय शिक्षणाने पर्यावरणीय समस्या, विशेषत: जागतिक स्तरावर अस्तित्वात असलेल्या समस्या सोडवण्यासाठी आंतरराष्ट्रीय भागीदारीच्या गरजेवर भर दिला पाहिजे.
6. पर्यावरण शिक्षणामध्ये, व्यावहारिक आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित उपक्रमांना विशेष स्थान दिले पाहिजे.

**पर्यावरण शिक्षणाची क्षेत्रे** :

पर्यावरण शिक्षणातील घटक लक्षात घेऊन आपल्याला असे म्हणता येईल की,

- पर्यावरण शिक्षणाचे क्षेत्र हे हवा, पाणी, माती, जंगल, पायाभूत सुविधा आणि जमिनीची उपयुक्तता यासारख्या विविध घटकांचा अभ्यास असू शकतो.
- पर्यावरण आणि मनुष्य यांच्यातील परस्परसंवाद आणि त्याच्या परिणामी उद्भवलेल्या पर्यावरणीय समस्या यांचा अभ्यास.
- पर्यावरणीय समस्यांच्या परिणामांचे मूल्यांकन, या समस्या मानवाकडून किती प्रमाणात उद्भवतात आणि इतर सजीवांसाठी हानिकारक किंवा घातक असू शकतात यांचा अभ्यास.
- पर्यावरणीय समस्या सोडवण्यासाठी प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चालू असलेले प्रकल्प आणि कार्यक्रम, पर्यावरण आणि वन्यजीव संरक्षणाशी संबंधित कायदे आणि उपाययोजना, स्थानिक ज्ञान आणि पर्यावरणीय समस्या सोडवण्यात आदिवासी समुदायांची भूमिका.
- पर्यावरण व्यवस्थापन मानके, एजन्सी आणि नियोजन, गुंतवणूक आणि प्रकल्प किंवा योजनेची अंमलबजावणी इत्यादी.

पर्यावरणीय शिक्षणांतर्गत, नैसर्गिक संसाधने आणि परिसंस्थेचा वापर, पर्यावरणीय समस्या आणि त्याचे प्रतिबंध, पर्यावरण व्यवस्थापन इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे. सरकारी आणि गैर-सरकारी संस्था आणि सामान्य जनतेला त्यांच्या कृती/ हस्तक्षेपांमुळे उद्भवणाऱ्या संभाव्य पर्यावरणीय परिणामांबद्दल माहिती देते आणि पर्यावरण संरक्षणातील त्यांची भूमिका देखील स्पष्ट करते.

**समारोप**:

पर्यावरण शिक्षण पर्यावरणाला भेडसावत असलेल्या समस्यांचा शोध घेण्यास आणि त्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यास मदत करते. पर्यावरणाचे सखोल आकलन पर्यावरणीय समस्यांना कार्यक्षमतेने हाताळण्यात मदत करेल. तसेच निसर्गाला चालना देण्यासाठी आणि टिकवण्यासाठी धोरणे तयार करणे यासाठी देखील पर्यावरण शिक्षणाचा मदत होते. यामुळेच शालेय अभ्यासक्रमात पर्यावरणीय शिक्षणाचा परिचय करून देणे अत्यावश्यक आहे कारण त्यांच्यामध्ये हीच मूल्ये रुजवली जातात.

**संदर्भ**:

1. https://www.theasianschool.net/blog/what-are-the-benefits-of-environmental-education/
2. गोयल, एम.के. (1995), अपना पर्यावरण, आगरा, विनोद पुस्तक मंदिर
3. पाण्डेय, के.पी. एवं भारद्वाज अमिता (2014), पर्यावरण शिक्षा एवं भारतीय सन्दर्भ, वाराणसी, विश्वविद्यालय प्रकाशन
4. वर्मा, जी. एस. (2005), पर्यावरण अध्ययन, मेरठ, इंटरनेशनल पब्लिशिंग हाउस
5. अग्रवाल, अनिल एवं अन्य (1982), दी स्टेट ऑफ़ इण्डिया एनवायरनमेंट सेंटर फॉर द स्टडी ऑफ़ एनवायरनमेंट, दिल्ली
6. शर्मा, आर. ए. (2005), पर्यावरण शिक्षा, मेरठ, आर. लाल बुक डिपो